

# असे नेते, अशा अनुयायी

## स्वातंत्र्यलढ्यातील सहभागी महिला

डॉ. रोहिणी गवाणकर



# अनुक्रमणिका


**निवेदन ........ 2**

**1857 च्या स्वातंत्र्यसंग्रामातील महिला ........ 4**

*बेगम हजरत महल (1820–1879) ........ 5*
*हुतात्मा मैनावती पेशवे........ 7*
*माता तपस्विनी (1835–1907) ........ 10*

**भाग 1: महात्मा गांधींची महिला नीती........ 16**

म. गांधींच्या प्रभावाने स्वातंत्र्य चळवळीत आलेल्या महिला........ 24
*अवंतिकाबाई गोखले (1882–1949) ........ 24*
*पद्मावतीबाई हरोलीकर (1892–1989) ........ 28*
*महाराष्ट्राच्या ठक्करबाप्पा जानकीबाई आपटे (मृत्यू: 1962) ........ 33*
*डॉ. इंदुमती नाईक (1890–1974) ........ 38*

म. गांधींच्या प्रभावाने स्वातंत्र्य चळवळीत आलेल्या पारशी महिला........ 43
*गांधीवादी विधायक कार्यकर्ती मीठूबेन पेटिट (1892–1973)........ 43*
*पेरीनबेन कॅप्टन (नौरोजी) (1888–1958) ........ 49*
*जेठीबेन (1906–1978)........ 53*

म. गांधींच्या प्रभावाने स्वातंत्र्य चळवळीत आलेल्या मुस्लीम महिला........ 57
*भारतप्रेमी सोफिया खान (1916–1961)........ 61*

म. गांधींच्या प्रभावाने स्वातंत्र्य चळवळीत आलेल्या पाश्चात्य महिला........ 67
*मार्गारिट कुझिन्स (1878–1954) ........ 68*
*मेडलिन उर्फ मीराबहन (1892–1982) ........ 71*
*म्युरिअल लेस्टर (1883–1968) ........ 73*
*कॅथरीन हिलमन उर्फ सरला बहेन (1901–1982)........ 75*

**भाग 2: पं. नेहरूंची महिला नीती........ 78**

**भाग 3: नेताजी सुभाषचंद्र बोस यांची महिला नीती........ 82**

**भाग 4: डॉ. लोहियांची महिला नीती ........ 90**

**भाग 5: डॉ. आंबेडकरांची महिला नीती ........ 94**

**आमच्याबद्दल: अभिव्यक्ती........ 102**

# निवेदन

15 ऑगस्ट 2022 रोजी भारताचा हीरक स्वातंत्र्य महोत्सव (भारतीय स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव) संपन्न झाला. हा दिवस आपल्या स्वातंत्र्याच्या स्वप्नांची पूर्ती होण्याचा दिवस. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी लक्षावधी लोकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्याचप्रमाणे कारागृहाच्या भिंतीआड शिक्षा भोगताना मरण यातना सोसल्या या बाबतीत गांधी युगापासून महिलांची संख्याही वाढत गेली. त्यांनी भोगलेल्या यातना तर अनेकींच्या अब्रूच्या संदर्भात होत्या म्हणून त्या अधिकच यातनामय होत्या.

इ.स. 1856–57 साली आपापली खालसा राज्ये परत मिळवण्यासाठी उत्तरेकडे झांशी, अवध या राज्यांनी धडपड केली. दुसऱ्या बाजीरावाने तर वसईचा तह करून 1818 सालीच राज्य अर्पण केले. त्यांनी त्यांचे पेशवे पद रद्द करून उत्तरेकडे कानपूर जवळ बिठूर या गावी नेऊन ठेवले. त्यावेळी हिंदुस्थानात राज्ये वंशपरंपरेने चालत. बाजीरावांच्या मुलाला नानासाहेबांना वाटले की, आपल्याला बाजीरावाकडे असलेले उरले-सुरले अधिकार मिळतील, इंग्रजांनी ते ही नाकारले म्हणून ते ही पेटून उठले. वंशपरंपरेने मिळणाऱ्या अधिकारांची प्रजेलाही सवय झाली असल्यामुळे त्यांची प्रजाही त्यांच्या बरोबर होती. हिंदुस्थानी लोक एक आहेत, एका संस्कृतीचे आहेत ही भावना अजून लोकात रुजू झाली नव्हती. इंग्रजांकडे नव्या बंदुका, तारेची व्यवस्था आणि सैन्यात प्रचंड शिस्त या जोरावर उरल्या-सुरल्या सर्व राज्यांना आपल्या दावणीस बांधण्यात इंग्रज यशस्वी झाले. कंपनी सरकारचे राज्य ब्रिटिश पार्लमेंटच्या एका ठरावाने ब्रिटिश साम्राज्याला जोडलेले असे. राणी व्हिक्टोरियाच्या नावाने द्वाही (दवंडी) फिरली. राणीने एक जाहीरनामा काढून त्यात सर्व देशभर धर्मस्वातंत्र्याचा एकच कायदा असे आश्वासन दिले. आसेतू हिमाचल एकच राज्य ‘इंडिया’ नावाने जगाच्या नकाशावर विराजमान झाले ते ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग म्हणून.

ज्यांच्या लक्षात हे सर्व आले त्यांनी कधी आपल्या ताकतीवर विरोध करायचे प्रयत्न केले. एका खंडप्राय देशात ते चिरडून टाकण्यास इंग्रजांना काही क्षणच पुरले. काँग्रेसची स्थापना सर एलेन ह्यूम यांनी केली. त्याचे सदस्यत्व घेतलेल्या लोकांकडून राज्य कारभाराला मदत होईल अशी त्यांची अपेक्षा होती. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात सरकारने बंगालचे विभाजन करण्याचे योजले. विभाजनाला काँग्रेसची सैद्धांतिक मान्यता होती. मात्र हे विभाजन लोकसंख्येवर न होता ते प्रादेशिक तत्वावर व्हावे अशी मागणी काँग्रेसने लावून धरल्यामुळे त्यातून वंगभंगाच्या चळवळीने पेट घेतला. ठिकठिकाणी घातपाती कृत्ये, त्यावर सरकारी अत्याचाराचा धुमाकूळ माजला. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली लोक हळूहळू संघटित होऊ लागले. वंगभंगाच्या चळवळीने तर बंगाल मध्ये वणवा पेटला. खूप लोक मारले गेले तर अनेकांवर खटले भरले गेले. या स्वातंत्र्यसैनिकांचे कारागृहात जे

हाल झाले त्याला इतिहासात तोड नाही.

स्वातंत्र्याच्या लढ्याला देशव्यापी स्वरूप आले ते महात्मा गांधींच्या असहकाराच्या चळवळीमुळे. गांधीजी नुकतेच दोन-तीन वर्षांपूर्वी म्हणजे 1915 मध्ये हिंदुस्थानात आले होते. असहकाराचा लढा मागे घेतल्यावर गांधींचा दुसरा देशव्यापी लढा म्हणजे सविनय कायदेभंगाची चळवळ. या चळवळीने देशाला शिस्तबद्ध सत्याग्रहाची शिकवण मिळाली. तिसरा आणि शेवटचा लढा गांधीजींनी दिला तो 1942 मध्ये 'चले जाव'चा.

असहकाराच्या लढ्यात तुरळक स्त्रिया असल्या तरी त्यांच्या मध्ये जागृती झाल्याचा देशाला अनुभव आला. नेहरूंनी लाहोरच्या काँग्रेसमध्ये स्त्रियांच्या या लढ्याबद्दल खूप कौतुक आणि अभिनंदन केले. महात्मा गांधींबरोबर नेहरू आणि सुभाषचंद्र बोस यांचा यात सिंहाचा वाटा होता. या तिघांनी स्त्रियांची दु:खे जाणून त्यांना, 'तुम्ही दुर्बल नाहीत सबल आहात' अशी शिकवण दिली. स्त्रियांना या तिघांनी दाखविलेला मार्ग, त्यांच्या शक्तीची त्यांना करून दिलेली जाणीव यालाच स्त्री अभ्यासक त्यांची 'नीती' मानतात. 1942 सालचा लढा चालू असतानाच डॉ. लोहियांचा उदय झाला. या चौघांनी स्त्रियांना जे मार्गदर्शन केले त्यालाच स्त्री अभ्यासक महात्मा गांधी, पंडित नेहरू, सुभाष बाबू आणि लोहिया यांची महिला नीती म्हणतात. ह्या चार राजकीय नेत्यांचे विचार या पुस्तकात मांडले आहेत.

तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार मांडल्याशिवाय हे पुस्तक पूर्ण होऊ शकत नाही. प्रामुख्याने दलित स्त्रियांबद्दलची त्यांची महिला नीती भाग 5 मध्ये मांडली आहे.

महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव जसा भारतीय स्त्रीवर्गावर पडला. तसाच, तो अल्पसंख्य वर्गाच्या म्हणजेच पारशी, मुसलमान आणि ग्रामीण स्त्रियांवरही पडला. त्यांची माहिती यात दिली आहे. पाश्चिमात्य स्त्रियांनाही महात्मा गांधी आपले वाटले. त्यांपैकी काहींनी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतला. तुरुंगवास भोगला, आश्रम स्थापन केले. शेवटपर्यंत त्यांनी आपले आचार-विचार हे गांधींच्या विचारांवर आचरले. नेते आणि कार्यकर्ते यांचा एकमेकांवर झालेला परिणाम दाखविण्याचा छोटासा प्रयत्न किंवा तोंड ओळख करून देण्याचा प्रयत्न या दृष्टीनेच या पुस्तकाकडे पाहिले जावे, असे वाटते.

– डॉ. रोहिणी गवाणकर



*1942 च्या 'चले जाव' चळवळीत महिलांचा अभूतपूर्व सहभाग*

# 1857 च्या स्वातंत्र्यसंग्रामातील महिला

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची एकूण माहिती तरुण पिढीला कमीच आहे आणि त्यातल्या त्यात स्वातंत्र्यलढ्यामध्ये गरिबांपासून गर्भश्रीमंत स्त्रियांपर्यंत अनेक प्रकारच्या स्त्रियांनी केलेल्या कामगिरीबद्दल तर अज्ञानच आहे.

खरं म्हणजे भारताचा पहिला स्वातंत्र्यलढा 1857 मध्ये झाला. 1857 चे स्वातंत्र्ययुद्ध म्हटले की आपल्याला फक्त झांशीची राणी आठवते. पण अजीजन नावाची कलावंतीण, नानासाहेब पेशव्यांची कन्या मैनावती, फुलकारी नावाची एक दलित महिला, बादशहा बहादूरशहा जाफर यांची पत्नी झीनत महल अशा अनेक आहेत. 1857 च्या स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेणाऱ्या आणि सर्वस्वाचे समर्पण करणाऱ्या काही शूर महिलांचा हा अल्प परिचय.

## बेगम हजरत महल (1820–1879)



19 व्या शतकाच्या उत्तरार्धात कंपनी सरकारने हिंदुस्थानात आपले हात पाय चांगलेच पसरले होते. झांशीची राणी लक्ष्मीबाईने 'मेरी झांशी नही दूंगी' ही गर्जना करत इंग्रजी सत्तेला विरोध करण्याचा प्रयत्न केला. तिला उत्तरेकडील कोणत्याही राज्यकर्त्याने मदत केली नाही. उलट आपापली राज्ये त्यांनी भराभर इंग्रजांच्या टोपीत टाकून दिली. स्वराज्य, देशाभिमान आणि अटकेपार झेंडे लावणाऱ्या मराठ्यांचा स्वाभिमान जागृत ठेवण्याचे कार्य करणाऱ्या झांशीची राणी लक्ष्मीबाईने सर्व राजांना पत्रे लिहिली. एकजूट करून आपण इंग्रजांना हटवू शकतो, असा तिने घोषा चालवला.

बेगम हजरत महलची गोष्ट याच काळातील आहे. चार पाच वाक्यांशिवाय या स्वातंत्र्य सैनिक बेगमच्या हाती इतिहासाने काहीही दिले नाही. म्हणून तिच्या महत्त्वाच्या कामाचा परिचय करून देण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.

उत्तरेतील राजांनी कंपनी सरकारच्या हातात आपापली राज्ये सोपवून त्याच्या बदल्यात कंपनी सरकारकडून दरमहा काही वेतन घेणे ही लाचारीही पत्करली. या मार्गावर भराभर छोटी राज्ये कंपनी सरकारच्या हातात जात राहिली. उत्तरेकडे इंग्रजांच्या या राजनीतीला विरोध करणाऱ्या दोन राज्यकर्त्या स्त्रिया होत्या. एक आपल्याला माहीत आहेच, झांसीची राणी आणि दुसरी होती अवध प्रांताच्या नबाबाची बेगम. तिचे खरे चरित्र लोकांसमोर आणण्याचे काम झाले नाही. तिचे नाव होते — बेगम हजरत महल. नवाब वाजिद अली शाह या अवधच्या नबाबाची तरुण पत्नी. वाजिद अली शाह हा कलासक्त नबाब होता. आता ब्रिटिश राज पूर्ण भारतभर पसरले होते. कंपनी सरकारने अवधचे राजा वाजीद अली शाह ह्याला अटक करून अवध सोडून कलकत्ता येथे सामान्य नागरिकाप्रमाणे त्याच्या कुटुंबकबिल्या बरोबर राहायला पाठवले. कोणतीही अट न घालता नबाबाने राज्य कंपनी सरकारच्या टोपीत टाकले. हजरतने त्याच्याबरोबर न जाता अवधलाच राहण्याचे ठरवले. आपण स्वतंत्र आहोत असे जाहीर केले. लोकांना संघटित केले. कंपनी सरकारला त्याच्याच भाषेत उत्तर देऊन एक नवा मार्ग शोधला. तिचीच ही गोष्ट.

तिचे (आधीचे नाव: मुहम्मदी खानुम) अप्रतिम सौंदर्य आणि नृत्य कलेतील तिचे प्राविण्य पाहून नबाब मोहित झाला. त्याने तिच्याशी निकाह (लग्न) केला. 1845 मध्ये त्यांनी एका मुलाला जन्म दिला. मुलगा (कादर) 7 वर्षाचा होतो न होतो तोच कंपनी

सरकारने त्यांचे राज्य खालसा केले. अजून युवराज कादर अल्पवयीन होते. हजरतने तत्काळ कादरच्या नावाने द्वाही (दवंडी) पिटवली. त्याला गादीवर बसवून, बेगम हजरत महल ह्यांनी राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हातात घेतली. कादर नवाब कादर शाह झाला. त्याची आई राज्यकारभार बघू लागली. ती राज्यकारभार पाहू लागल्यावर ना कुठला दुजाभाव होता, ना कुठला धर्मभेद. तिने सैन्यात सर्व धर्मियांना सारखेच अधिकार दिले. झांशीची राणी लक्ष्मीबाई प्रमाणे सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी ती स्वतः युद्ध स्थळी जाऊ लागली. आपण स्वतंत्र आहोत आणि इंग्रजांना आपल्या कामात ढवळाढवळ करायला देणार नाही असेही बजावले. आपल्या जवळच्या फौजफाट्याला इंग्रज प्रशिक्षक नेमून इंग्रजी फौजेच्या तोडीस तोड अशी फौज तयार केली. ही फौज भाडोत्री नसून देशसेवेच्या आणि अवधच्या स्वातंत्र्यासाठी बांधील होती.

हजरत महलने हिंदी लोकांचे नेमके कुठे चुकते? याचा विचार केला. तिला लोकांच्या देशप्रेमाविषयी आणि अवधवरच्या प्रेमावर पूर्ण विश्वास होता. अभाव होता तो त्यांच्यामध्ये देशप्रेमाची ठिणगी टाकून त्यांना शिस्तशीर लष्करी शिक्षण देण्याचा. त्यात तिला यश आले. आत्तापर्यंत इंग्रज प्रशिक्षकांना नोकरीला ठेवताना त्यांच्यावर अटी घालून त्यांना कायद्याने बांधून ठेवले. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये या विषयावर खडाजंगी होऊन कंपनी सरकार हे खासगी आहे या मुद्यावर तिने ते बंद केले. तोपर्यंत अवधबाहेरच्या बंडखोरांनीही आपले अनेक प्रयोग चालू ठेवले होतेच. इंग्रजांनी अत्यंत क्रूर रित्या ते बंड चिरडले.

त्यावेळची इंग्लंडची राणी व्हिक्टोरियाच्या नावाने संबंध हिंदुस्थानचे राज्य इंग्रजांनी आपल्या ताब्यात घेतले. आपण हिंदुस्थानात काय काम करू इच्छितो, याचा राणी व्हिक्टोरियाच्या नावाने एक जाहीरनामा (जवळ जवळ 12 ते 14 मुद्यांचा) प्रसिद्ध केला. जवळपास सर्व हिंदी राजांची संस्थाने खालसा झाली. त्यांना त्यांच्या राज्याची देखभाल करण्यासाठी म्हणून मासिक भत्ता सुरू केला. बेगम हजरत महल सोडून सर्व राज्यकर्त्यांनी तो हसतमुखाने स्विकारला.

बेगम हजरत महलने तो जाहीरनामा वाचून घेतला आणि त्यातील प्रत्येक मुद्याला तिने मुद्देसूद उत्तरं दिली. राज्यकारभारात ती जनतेचे मन जाणून घेऊ लागली होती. हे ही हिंदुस्थानच्या इतिहासातले तसे पहिलेच उदाहरण म्हणावे लागेल. आपल्यावर लवकरच हल्ला होणार हे तिला कळून चुकले होते. तसा तो झालाही. बेगम हजरत महल अत्यंत स्वाभिमानी आणि महत्त्वाकांक्षी होती. इंग्रजांच्या मोठ्या फौजेपुढे आपला निभाव लागत नाही, हे लक्षात घेऊन ती आपला कुटुंबकबिला घेऊन नेपाळच्या हिंदू राजाकडे आश्रयाला गेली. (नेपाळचा राजा आजही हिंदूच आहे.) त्याने तिला आश्रय म्हणून एक मोठे जंगल दिले. त्याच जंगलात आजही बेगमच्या नातेवाईकांचे संसार आपली संस्कृती आणि परंपरा जपत राहत आहेत. या राजघराण्यातल्या स्त्रियांचे पती असले तरी अवधमध्ये पुरुषांचा राजघराण्यात जो दर्जा होता तसाच आजही आहे. बायका राजघराण्यातल्या म्हणून पती त्यांना आजही आधी जेवण देतात मग त्याच ताटात स्वतः नंतर जेवतात. हा हिंदी

पुरुषांच्या अस्मितेला बसलेला तडाखाही तिथेच अनुभवला. या स्वातंत्रसैनिकेबद्दल इतिहासात कुठेही नोंद नाही. संजीवनी खेर या लेखिकेने लिहिलेले तिचे सुंदर चरित्र मी वाचले. एक स्त्री आणि ती ही अहिंदू, त्यामुळे ती इतिहासात फक्त चार ओळींची धनीण झाली. तिच्याबद्दल अधिक काही माहिती मिळाली नाही. तरीही, आपण तिची राजकीय बुद्धी आणि डावपेच त्यातही मुख्य म्हणजे इग्लंडच्या पार्लमेंटने बनवलेल्या जाहीरनाम्याला तिने दिलेले सडेतोड उत्तर यामुळे बेगम साहेबांचे कौतुक झाले. 'कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' (काळ अनंत आहे आणि पृथ्वी अफाट आहे.) बेगम साहेब आपल्याला हिंदी स्त्रियांचे कोटी कोटी प्रणाम!

■ ■

## हुतात्मा मैनावती पेशवे



1857 च्या बंडाचा काळ, बंडाचा वणवा उत्तर भारताइतक्या मोठ्या प्रमाणात दक्षिण भारतात पेटला नव्हता. या बंडाचे नेतृत्व मात्र नानासाहेब पेशवे आणि तात्या टोपे यांनी केले. याच काळातील कर्तव्यकठोर, सहृदय मैनावतीची कथा. मैनावतीबद्दल एक पानभर मजकूर एका हिंदी पुस्तकात वाचायला मिळाला होता. ते पुस्तक उत्तरेकडच्या स्वातंत्र्यसैनिकांच्या माहितीचा कोश होता. त्यानंतर आणखी एका हिंदी भाषिक लेखिकेने तिच्याबद्दल थोडासा मजकूर लिहिलेला वाचनात आला. मराठ्यांच्या इतिहासाबद्दल अभ्यास असणाऱ्या अनेकांना मैनावतीबद्दल विचारले. पण कुणालाच अशी कुणी मुलगी / बाई 1857 च्या वणव्यात विद्युल्लतेप्रमाणे कडाडून अमर झाल्याची माहिती मिळाली नाही. गेली 4–5 वर्षे मी माहिती मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. माझ्या मानगुटीवर स्त्री अभ्यासाचे भूत बसलेले आहे व ते मी बाजूला करावे म्हणजे नसलेली मढी उकरू नयेत, असा उपदेशवजा सल्ला मला मिळत राहीला. पण मैनावतीला मी माझ्या मनातून बाहेर काढू शकले नाही आणि अचानक तात्या टोपे यांचे नातू विनायकराव टोपे मु. बिठूर यांनी संपादित केलेली 'क्रांती का संक्षिप्त परिचय' ही पुस्तिका हाती आली. या पुस्तिकेत मैनावतीची कथा आहे. आशारानी व्होरा यांनी आपल्या पुस्तकात केलेले उल्लेख उत्तर भारतीय स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश, विनायकराव टोपे यांच्या पुस्तिकेतील मैनावतीची माहिती यांचे धागेदोरे मी विणत गेले आणि वाटले की टोपे कुटुंब हे पेशवे कुटुंबाशी (दुसऱ्या

बाजीराव पेशव्यांच्या) जवळचे कुटुंब होते. त्यांच्याबरोबरच टोपे कुटुंबही उत्तरेकडे आले होते. त्यामुळे विनायकराव टोप्यांची माहिती दंतकथेवर आधारलेली असण्याची शक्यता कमी आहे. कोश आणि टोपे यांच्या मजकुरावरून स्पष्ट दिसते की, मैनावतीची कथा ही सत्यकथा आहे. त्यावर संशोधन करून भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात तिला तिचे मानाचे पान मिळायलाच हवे.

नानासाहेब पेशवे यांना एकुलती एक मुलगी होती. मुलीला मैनावती हे आजीचे नाव ठेवले. मैनावतीची आई लवकरच गेली. आजी तर त्यापूर्वीच गेली होती. मैनावतीला पेशवे घराण्याच्या रितीप्रमाणे लिहिणे, संक्षिप्त वाचणे, पत्रे तयार करणे इत्यादी गोष्टी शिकवल्या असणारच. धार्मिक ग्रंथांची पारायणे ही गोष्ट त्यात आलीच. नानासाहेबांचे आपल्या मुलीवर जिवापाड प्रेम होते. आईविना मुलगी म्हणून तसे ते शक्य होतेच तसेच, परक्याच्या घरी जाणाऱ्या या मुलीला आपल्याला वेळ देता येत नाही या विचारामुळेही ते अधिक होते. नानासाहेब पेशवे आणि इंग्रज यांचे सुरुवातीचे संबंध बरे होते (इति टोपे). त्यामुळे इंग्रज अधिकाऱ्यांच्या बरोबर प्रसंगपरत्वे उठबस होत असावी, मैनावतीचेही इंग्रज मुलींच्या बरोबर संबंध होते. त्यामुळे त्यांच्या सहवासात तिला कामचलाऊ इंग्रजी समजू लागले आणि बोलताही येऊ लागल्याचे टोप्यांच्या माहितीवरून कळते.

मैनावतीची कथा सुरू होते, ती पेशव्यांच्या कानपूर विजयापासून. शिपायांनी कानपूर लुटले. बिबिका घर, सतीचौरा ही ठिकाणे जाळली. इंग्रज बायका-मुले यांना कैद केले. हे कैदी नानासाहेब पेशव्यांसमोर हजर करावे की, कानपूरच्या इतर इंग्रजांप्रमाणे त्यांनाही येशूकडे पाठवावे, असे शिपायांनी नानासाहेबांना विचारले. त्यांच्या आज्ञेप्रमाणे इंग्रज बायका-मुलांचा निकाल लावायचा असे ठरवून शिपाई नानासाहेबांच्या आज्ञेची वाट पाहू लागले. शिपायांचा मानस कळल्यावर नानासाहेबांना वाईट वाटले. मराठ्यांच्या इतिहासात शत्रूच्या बायका–मुलांची कत्तल कधीच झाली नव्हती. शिपायांचे असे वर्तन हे मराठ्यांना शोभणारे नाही. त्यामुळे ‘इंग्रज बायका-मुलांना सन्मानाने बिठूरला पोहचवावे, त्यांची व्यवस्था आपण जातीने करू’ असा उलटा खलिता नानासाहेब पेशव्यांनी पाठवला. इंग्रजांचा कुटुंबकबिला त्यांनी मैनावतीच्या स्वाधीन केला. त्या सर्वांचा दोन दिवस पाहुणचार करून त्यांना इंग्रजांच्या फौजेत परत पाठविण्याचा आपला बेत त्यांनी मैनावतीला सांगितला. इतकेच नाही तर ते सर्व सुरक्षित पोहोचण्याची जबाबदारीही मैनावतीवर सोपवली. त्याकरिता त्या कबिल्याबरोबर मैनावतीला जातीने सोबत करावयास सांगितले. मैनावती बरोबर असल्यामुळे त्यांचा प्रवास निर्धोक पार पडेल याचा नानासाहेबांना विश्वास होता. या प्रवासात पहिला इंग्रज फौजेचा जथ्था जिथे भेटेल तिथे इंग्रज बायाका-मुले त्यांच्या स्वाधीन करून मैनावतीने परत फिरावे, असा आदेश मैनावतीला होता. मैनावतीच्या सोबतीमुळे इंग्रज कुटुंबे सुखरूप प्रवास करू शकली. रस्त्यातील दंग्या-धोप्यांच्या त्यांना त्रास झाला नाही. आपल्याला सुखरूपपणे आपल्या लोकांच्या हवाली केल्याबद्दल त्यांना मैनावालीबद्दल कृतज्ञता वाटली असेल तर यात

नवल नाही. मैनावती ही नानासाहेबांची मुलगी आहे हे त्या इंग्रज बायकांना माहीत होते की नव्हते, की त्यांनाही, मैनावती सुरक्षित घरी पोहोचण्यासाठी तिचे नाव गुप्त ठेवणे योग्य वाटले असावे हे कळायला मार्ग नाही.

मैनावती बिठूरला पोहोचण्यापूर्वी नानासाहेबांनी बिठूर सोडले होते. कारण शिपायांनी जिंकलेले कानपूर परत इंग्रजांनी हिसकावून घेतले होते व ते बिठूरच्या दिशेने निघाले होते. बिठूरला येऊन इंग्रजांनी पेशव्यांचा किल्लेवजा वाडा लुटला. पेशवे कुटुंबातील फक्त मैनावती आणि नोकर-चाकर व आश्रयदाते वाड्यात होते. मैनावती सोडून सर्व पळून गेले. वाडा बेचिराख करण्याकरता त्यावर तोफा डागण्याचा हुकूम दिला. तोफांची हलवाहलव मैनावतीच्या कानी पडली. ती तडक वाड्याच्या बाहेर येऊन उभी राहिली. तिला तिथं उभी असलेली पाहताच इंग्रज सेनापती थॉमसला आश्चर्य वाटले. कारण वाडा लुटताना तिथे चिटपाखरुही आढळले नव्हते. तिला पाहता क्षणीच थॉमसने तिला ओळखले. मैनावतीने त्याला इंग्रजीत पण नम्रपणे विचारले, “ज्या वाड्याला आपण बेचिराख करायला निघाला आहात त्या वाड्याने आपले काय वाकडे केले आहे? तो तर आश्रयदाता आहे. त्याने आपला असा कोणता अपराध केला आहे?” थॉमसने उत्तर दिले की, वाडा न जाळण्याची परवानगी मला व्हाईस रॉयकडून तार करून मागवावी लागेल. त्यांनी परवानगी दिली तर वाडा जाळणार नाही. तार लंडनला पोहोचली. लॉर्ड सभेत चर्चा झाली. काही लॉर्डांनी एक विचित्रच सूर लावला. थॉमसचे मैनावतीवर प्रेम बसले असावे म्हणून तो वाडा तोफांच्या साहाय्याने उडवायला हिचकीच करतो आहे. वाडा तर उद्ध्वस्त झालाच पाहिजे पण थॉमसच्या समोरच (मैनावतीकडून नानासाहेबांचा पत्ता विचारून) मैनावतीला जिवंत जाळली पाहिजे. लॉर्ड सभेचा हा अजबच न्याय होता!

मैनावतीने विद्रोही सैनिकांच्यापासून इंग्रज अधिकाऱ्यांच्या बायका–मुलांना वाचवले होते. त्यांना प्रथम वाड्यात ठेवून घेऊन सुरक्षितपणे इंग्रजांच्या गोटात पोहोचवले होते. अशा मैनावतीला ही शिक्षा देणाऱ्या इंग्रज लॉर्डांची सभ्य संस्कृती किती बेगडी होती हे लक्षात येते. आठव्या शतकात हिंदुस्थानच्या उत्तर सीमेवर आलेल्या रानवट मुसलमानांच्या टोळ्यांनी केलेल्या कृत्याइतकेच ते भीषण होते. थॉमसची मुलगी मैनावतीची मैत्रीण होती. मैनावतीचे मोठेपण व तिने इंग्रज कुटुंबांना विद्रोही सैनिकांपासून वाचविले ही गोष्ट म्हणजे इंग्रज अधिकाऱ्यांवर असलेले उपकारच आहेत असे ती परत परत ओरडून सांगत होती. मैनावतीच्या देखतच तिचे राहते घर तोफांच्या भक्ष्यस्थानी पडले, तिला कैद्यासारखी वागणूक देत कानपूरला इंग्रज कमिशनरसमोर उभे केले. नानासाहेबांचा ठावठिकाणा विचारण्यासाठी तिचा खूप छळ केला, मैनावतीने छळ सहन केला पण काहीही बोलण्यासाठी तोंड उघडले नाही ते नाहीच, मैनावतीचे वय त्यावेळी 14–15 वर्षांचे असावे. मैनावतीचा छळ करूनही ती काहीच माहिती देत नाही याचा कानपूर कमिशनरला खूप संताप आला. त्यांनी तिला झाडाला बांधून पेटवून देण्याची आज्ञा दिली. हा भीषण प्रसंग बघण्याकरता कानपूर शहरवासीयांना मुद्दाम हजर राहण्यास सांगितले होते. दहशत

बसविण्याचा तो एक मार्ग होता, मैनावती जळत होती, लोक अश्रू ढाळत होते. पण मैनावतीने तोंडाने जराही आवाज केला नाही आणि या देशाच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धात एक स्वातंत्र्यसैनिक म्हणून पंचत्वात विलीन झाली.

मैनावतीने नानासाहेबांचे नाव न सांगितल्यामुळे तिला जाळून मारली यात टोपे व आशाराणी व्होरा यांचे एकमत आहे. तपशिलात थोडा फरक आहे. टोपे यांच्या म्हणण्याप्रमाणे कानपूरमधून प्रसिद्ध होणाऱ्या 'बखर' नावाच्या वर्तमानपत्रात तत्कालीन इतिहासकार महादेव चिटणीस यांनी नानासाहेबांच्या एकुलत्या एक कन्येच्या जिवंत जाळण्याची आणि तिने शांतपणे मरणाला कवटाळण्याची बातमी दिली होती. तिला शांतपणे जळताना पाहून हिंदवासीयांना ती देवतास्वरूप वाटत होती. मैनावती ही हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्यात आहुती देऊन अमर झाली. एका स्त्रीचं हे कर्तव्यकठोर रूप. त्यासाठी आगीचा दाह सहन करण्याची सोशिकता, इंग्रजांच्या बायका-मुलांना सुखरूप पोहोचवण्यामागची ममता, त्यासाठी संरक्षक कवच म्हणून जाण्यातलं साहस, पत्ता गुप्त ठेवण्यासाठीची कणखरता, मृत्यू कवटाळण्यातलं धाडस एका स्त्रीचं हे बहुआयामी लखलखीत रूप, एक स्त्री काय करू शकते हे दाखवणारे.

■■

## माता तपस्विनी (1835–1907)



माता तपस्विनीचे मूळ नाव सुनंदा. कर्नाटकातल्या बेलूर संस्थानच्या राजाची ही मुलगी. त्या काळच्या प्रथेप्रमाणे तिचे लग्न वयाच्या आठव्या वर्षीच झाले आणि लग्न झाले आहे म्हणजे काय झाले आहे हे समजण्यापूर्वीच ती विधवाही झाली. बेलूरचे राजे नारायणराव यांना हा धक्का सहन झाला नाही इतक्या लहान मुलीचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त झाले, या कल्पनेने तो पिता दुःखी झाला. त्या काळच्या हिंदू विधवांना जे व्रतस्थ जीवन जगावे लागे त्यात आपली कोमल, सुंदर मुलगी होरपळून निघणार हे कुठल्या बापाला आवडेल?

कुणाला आवडो वा न आवडो, समाजाचे नियम पाळणे हे बंधनकारक होते. त्यामुळे सुनंदालाही जपजाप्य करणे, संयमाने वागणे ह्या गोष्टीची शिकवण वयाची 10 वर्षे पूर्ण होण्याआधीच दिली जाऊ लागली. पहाटे उठून पूजा, ध्यान व मातृशक्तीची आराधना करावी. दिवसभर संस्कृत भाषेचा अभ्यास, पुराणे, उपनिषदे यांचे अध्ययन यात दुपार संपे.

संध्याकाळी योगाभ्यास, घोडेस्वारी आणि शस्त्रांचा वापर करायला शिकण्यात वेळ जाई. सुनंदा इतर कुठल्याही घराण्यात जन्माला आली असती, तर तिचे जीवन खरेच कठीण होते; पण राजघराण्यातला जन्म झांशीची राणी लक्ष्मीबाईशी जवळचे नाते, नारायणरावांचे पुत्रीप्रेम यामुळे सुनंदाचे मर्दानी खेळ खेळणे म्हणजे घोडेस्वारी किंवा तलवार चालविणे, दांडपट्टा खेळणे याच्या विरोधात काही बोलणे, किंवा तिच्या राहणीमानावर टीका करणे हे उघडपणे झाले नाही. सुनंदा जसजशी तारुण्यात पदार्पण करू लागली तसतशी तिच्या मनात इंग्रजांच्या भारतभर पसरणाऱ्या सत्तेबद्दल चीड उत्पन्न होऊ लागली. मुलीच्या मनातील अशी घालमेल नारायणरावांना कधी समजलीच नाही, पण आपली मुलगी जे काही करते त्यामुळे ती आनंदित राहते हेच त्यांच्यासाठी खूप होते.

नारायणरावांच्या मृत्यूमुळे अगदीच तरुणवयात संस्थानाच्या कारभाराची जबाबदारी सुनंदावर येऊन पडली. इंग्रजांच्या जुलूम-जबरदस्तीच्या कथा तिच्या कानावर येत. आपल्या जहागीर संस्थानातील प्रजेला याचा त्रास होऊ नये ही तिची इच्छा. पण त्याचबरोबर कर्नाटकातील इंग्रजी सत्तेला हाकलून द्यावे ही तिची इच्छा होती. त्यासाठी तिने बेलूरच्या किल्ल्याची दुरुस्ती सुरू केली. आपल्या छोट्या लष्करात नवीन भरती सुरू केली. शिपायांना इंग्रजी पद्धतीचे लष्करी प्रशिक्षण सुरू केले. त्यांच्या प्रशिक्षणावर आणि कवायतींवर सुनंदा जातीने लक्ष देई, प्रशिक्षणात जराही ढिलाई किंवा कसूर होता कामा नये म्हणून ती दक्ष राही. तिच्या मनाला एकच ध्यास होता तो म्हणजे कर्नाटकातील मराठ्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या तंजावर राज्यामधून इंग्रजांची हकालपट्टी करणे. हळूहळू सुनंदाचे वागणे, तिचा कारभार याबद्दलच्या बातम्या इंग्रज शासनाच्या कानावर गेल्या. एक विधवा तरुण मुलगी करून करून काय करणार? 4 दिवस कैदेत ठेवले की, येईल ताळ्यावर असा गोड गैरसमज इंग्रजांनी करून घेतला. तिला फक्त धाक बसावा म्हणून कैद करून त्रिचनापल्लीच्या किल्ल्यात नजरकैदेत ठेवले. कैदेत असताना सुनंदाराणीने आपले वाचन, अध्ययन, पूजापाठ हा कार्यक्रम चालूच ठेवला. योगाभ्यास चालू ठेवून शरीराचा काटकपणा कायम राहील याचीही काळजी घेतली.

सुनंदा राणीबद्दल इंग्रज अधिकाऱ्यांना रोज खबर मिळत होती. राणी अगदी निरुपद्रवी आहे. इश्वरभक्तीत आणि वाचन, चिंतन, मननात मग्न आहे वगैरे वगैरे. अंदाज खरा ठरल्याचे पाहून इंग्रज अधिकारी खूश झाले. एकूण सुनंदा राणी आपल्या वैराग्याच्या दिशेने चालत आहे. तिचा आता गर्वही जिरलेला दिसतो. दात काढलेल्या या सर्पिणीला आणखी इतमामात पोसण्यापेक्षा तिला सोडून दिलेले बरे असे इंग्रज अधिकाऱ्यांना वाटले. राणी सुनंदाला त्यांनी नजरकैदेतून मुक्त केले. या कारावासात सुनंदाने आपण सुटलो की काय काय करायचे याची निश्चित रूपरेषा मनाशी तयार केली होतीच. सुटल्यावर परत संस्थानात न परतता ती नैमिषारण्यात अध्यात्माचा अभ्यास करण्यासाठी निघून गेली. तिथे संत गौरीशंकरांचे शिष्यत्व घेतले. इंग्रज अधिकाऱ्यांना वाटले, ‘आणले की नाही बाईचे डोके ठिकाणावर?’ आता हिच्यापासून कसलाच धोका नाही. आपली ताकद ही ताकद

नाहीच. त्यामुळे या ताकदीवर त्यांच्याशी टक्कर देता येणार नाही, म्हणून तिने तपस्वी जीवनाचा आधार घेऊन जनजागृती करावयाचे ठरवले असावे. आपण तपस्वी जीवन जगतो आहे, हे कळल्यावर इंग्रज आपल्याकडे ढुंकूनही पाहणार नाहीत याची सुनंदाला खात्री होतीच. तिने निवडलेला हाच मार्ग असा होता की, श्रद्धाळू भोळ्याभाबड्या आम जनतेशी तिचा संबंध येणार होता. प्रवचने, भक्तांच्या भेटी यांतून तिला हवा तो संदेश ती पोहोचवू शकणार होती. सुनंदा प्रथम शक्तीची उपासना करत असे. नैमिषारण्यात ती शक्तीबरोबरच शिवाचीही उपासना करू लागली. शिवलिंगावर बेल वाहता वाहता ती गंभीर स्वरात तांडव स्तोत्राचा पाठ म्हणू लागली. अन्यायाचा प्रतिकार करणाऱ्यांचे उपास्य दैवत शिव आणि शक्ती. सुनंदा आता फक्त शिवशक्तीची उपासक मानली जाऊ लागली. याच विचारप्रणालीला घेऊन ती आपल्या पुढच्या योजनांना आकार देऊ लागली.

हळूहळू नैमिषारण्याच्या बाहेरही सुनंदाची महती लोक गाऊ लागले. आजूबाजूच्या गावातील लोक तिच्या दर्शनाला येऊ लागले. अरण्यात येऊन तप करणारी; पण मुळात राजघराण्यातील स्त्री म्हणून लोक तिला 'राणी तपस्विनी' म्हणून संबोधू लागले. राणी तपस्विनी नाव हे तसे धोकादायक होते. कारण अशा नावाच्या बाईच्या दर्शनाला जर हजारो लोक जात असतील, तर इंग्रज अधिकारी तिची चौकशी करण्याकरता तिथे येऊन पोहोचण्याची शक्यता होती. सुनंदा व राणी तपस्विनी ही एकच आहे हे इंग्रज अधिकाऱ्यांना कळणे म्हणूनच इष्ट नव्हते. म्हणूनच भक्तांकरवीच राणी या उपाधीऐवजी 'माता' या उपाधीचा जाणूनबुजून प्रचार करावा लागला. लवकरच ती माता तपस्विनी नावाने ओळखली जाऊ लागली. माता तपस्विनीच्या दर्शनाकरता येणाऱ्या भक्तांना आध्यात्मिक मार्गदर्शनाबरोबरच देशभक्तीचाही उपदेश करू लागली. साधूंचा एक मोठा गटही तिने तयार केला. हे साधू गावोगाव हिंडत. कोणताही साधू कुठल्याही गावात गेला, तरी गावकरी त्याच्या दर्शनाला जात. त्यांना शिधा देत. ही भारतात पद्धतच होती. फकीर, बैरागी, साधू यांना कुठे आडकाठी नसे. त्यामुळे मध्ययुगीन इतिहासात या लोकांनी गुप्तहेराचे काम केले असल्याची उदाहरणे आहेत. हे साधू लोकांना सांगत, 'इंग्रजांनी आपला देश जवळ जवळ घशात घातला आहे.' आता आपला धर्मही ते भ्रष्ट करत आहेत. हळूहळू ते आपणा सर्वांना ख्रिस्ती बनवतील. तुम्हाला गंगामाईची शपथ आहे. तुम्हाला माता तपस्विनीची शपथ आहे. उठा, जागा व देशातून इंग्रजांना हाकलून द्यायला तयार व्हा. या साधूंना लाल कमळाच्या द्वारे जनतेला संदेश पोहोचविण्याची प्रेरणा माता तपस्विनीची होती, असे त्यांच्यावर संशोधन करणाऱ्या आशारानी व्होरा यांनी मांडले आहे.

1857 चा वणवा पेटल्यावर माता तपस्विनी नैमिषारण्यातून बाहेर पडली. गावोगाव आपली प्रवचने करू लागली. अमोघ वक्तृत्व व तळमळ यामुळे तिच्या बोलण्याची छाप लोकांवर पडे. श्रद्धावान श्रीमंत व जहागीरदार तिला पैशांची थैली भेट देत. त्या पैशातून हत्यारांची खरेदी होई. गावोगाव लोक देशासाठी आपले सर्वस्व अर्पण करण्याची शपथ घेऊ लागले. साधू व बैराग्यांना छावणीपर्यंत पोहोचणे कठीण नसे. लोकांच्या धार्मिक

भावनांचा उद्रेक होऊनच सैनिकांनी बंड केले होते. माता तपस्विनीला मानणाऱ्या साधू, बैराग्यांनी क्रांतीचा संदेश सर्वत्र पसरवण्यात मोठीच मदत केली आहे. दळणवळणाच्या साधनांच्या अभावी हे घडून येणे जवळ जवळ अशक्यच होते. आशारानी व्होरांच्या मते, क्रांतीचा संदेश पोहोचविण्याची माता तपस्विनीची सुनियोजित योजना होती. लाल कमळ हे छावणीत दिले जाई व सामान्य माणसांना भाकरीतून संदेश दिला जाई. ह्या भाकऱ्याही एकाकडून दुसऱ्याकडे फिरवल्या जात. ही दोन्ही प्रतीके माता तपस्विनीच्या नावे वापरली जात.

युद्धाच्या वेळी माता तपस्विनी घोड्यावर बसून सगळ्या व्यवस्थेचे निरीक्षण करत असे. तिने साधूंचेच एक छापामार (छापा मारणारे) पथक तयार केले होते. इंग्रजांच्या छोट्या छोट्या छावण्यांवर हल्लेही ती चढवत असे, तिच्या पथकातले लोक भजन, पूजनाचा देखावा करत. झोळीत आणि कफनीत मात्र शस्त्रे लपवलेली असत. तळहातावर शीर घेऊन लढणारे ते देशभक्त साधूंच्या रूपात वावरले नसते, तर कधीच उडविले गेले असते. माता तपस्विनी अशा वेषधारी साधूंना व लढू इच्छिणाऱ्या तरुणांना गीतेचा संदेश सोप्या भाषेत समजावून देई, 'शरीर नश्वर आहे, पण आत्मा अमर आहे.' त्यामुळे नश्वर शरीर चांगल्या कामाकरताच वापरले पाहिजे. आपण जिंकलो तर आपल्या पद्धतीप्रमाणे आपले राज्य करूच; पण युद्धात मेलो तर पुण्यकर्म केल्याबद्दल स्वर्गलोकी जाऊ.'

माता तपस्विनीने खूप मेहनत घेऊन छापामार करणारी पथके तयार केली; पण त्याला एक संघटित रूप देण्याइतका वेळ माता तपस्विनीला मिळाला नाही. त्यामुळे ही साधूंची पथके आपल्या कुवतीप्रमाणे, मनाप्रमाणे इंग्रजांच्या छावणीवर तुटून पडत. परिणामी इंग्रजांच्या शिस्तबद्ध कवायती सैन्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही. विद्रोही साधू पकडले गेले. दहशत बसवण्यासाठी कित्येकांना मारून झाडावर उलटे टांगले, तर कित्येकांना तोफेच्या तोंडी दिले. माता तपस्विनीचे कर्तृत्व आता इंग्रजांच्या लक्षात आले होते. इंग्रजांचे जासूस आता तपस्विनी मातेच्या शोधार्थ निघाले. मात्र इंग्रजांच्या हातात माता तपस्विनी आली नाही. ती ज्या ज्या गावात गेली त्या गावातल्या लोकांनी तिला जिवाच्या आकांताने संरक्षण दिले. पुढच्या मुक्कामावर तिला सुखरूप पोहोचविले. जनता तिच्या मागे भक्कपणे उभी राहिली. बंड हळूहळू पूर्ण थंड पडले. या बंडाची नायिका बेगम हसरत महल नेपाळ नरेशाच्या आश्रयाला गेली. त्यानंतर माता तपस्विनीही नेपाळला निघून गेली; पण हसरत महलसारखी माता तपस्विनीची कथा इथेच संपत नाही.

नेपाळमध्येही माता तपस्विनी शांत बसली नाही. तिच्याबरोबर स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेल्या हाताच्या बोटावर मोजता येतील अशा सहकाऱ्यांशी तिचा संबंध होता. त्यांच्यामार्गे तिचा संदेश भारतात येत राहिला, "तुम्ही घाबरू नका, महिषासुरासारखा इंग्रजी राजवटीचाही नाश होईल. क्रांतिरूपी दुर्गा पुन्हा प्रकट होईल", नेपाळमध्ये तिने मंदिरे बांधून घेतली. या मंदिरात हळूहळू धर्मचर्चेबरोबरच क्रांतीचे संदेशही दिले जाऊ लागले. एकदा तपस्विनी पशुपतिनाथाच्या* दर्शनाला गेली असता नेपाळ नरेश महाराज

धीर समशेरजंग बहादूर यांच्या दृष्टीला पडली. तपस्विनीचे अप्रतिम सौंदर्य व शालिनता यातून तिचे घरंदाजपण व्यक्त होतच होते. त्यामुळे महाराजांनी तिला आपल्याकडे येऊन राहण्याची विनंती केली. कारण अशा स्त्रिची सुरक्षिततताही महत्त्वाची होती. तपस्विनी नेपाळ नरेशाच्या आश्रयाला राहू लागली. पुढे महाराजांचा खून झाल्यामुळे नेपाळमध्ये राहणे त्यांना प्रशस्त वाटेना. मायदेशी परत फिरून आपल्या ध्येयाच्या दृष्टीने काही हालचाल करावी या उद्देशाने माता तपस्विनीने नेपाळ सोडले. दरभंगामार्गे त्या कलकत्त्याला पोहोचल्या. कलकत्त्यात त्यांनी 'महाकाली संस्कृत पाठशाला' ही संस्था स्थापन केली. त्यात फक्त मुलींना प्रवेश होता. 1900 सालाच्या प्रारंभी लोकमान्य टिळक व त्यांचे स्नेही, पुणे चित्रशाळेचे संचालक वासुकाका जोशी यांचा कलकत्त्यात काही दिवस मुक्काम होता. या मुक्कामात त्यांनी महाकाली संस्कृत पाठशाळेला भेट दिली. त्याच्या संस्थापक 'माताजी' यांची ओळख झाल्यावर त्या टिळकांशी अस्खलीत मराठी बोलू लागल्या. टिळकांनी अधिक चौकशी केल्यावर माताजींनी 'आपण बेलूरच्या अधिपती नारायणराव यांची कन्या सुनंदा असल्याचे', सांगितले. आपला सुनंदा ते माता तपस्विनी हा प्रवास कसा झाला हे ही सांगितले. सुनंदा, राणी लक्ष्मीबाई झांशीकर यांची अगदी जवळची नातेवाईक असल्याचेही टिळकांना कळले. टिळक नेपाळला जाऊ इच्छित होते. नाव पशुपतिनाथाच्या दर्शनाचे पण अंतरात दुसराच उद्देश होता. टिळक बहुतेक राजद्रोहासंदर्भात शिक्षा भोगून भारतात परत आले होते. नेपाळला जाण्याचा त्यांचा हेतू वेगळाच असणार असा संशय सरकारला येणे साहजिकच होते. त्यामुळे त्यांना प्रवेशाचा परवाना नाकारला गेला, अशा वेळी माता तपस्विनी उर्फ माताजी आणि लोकमान्यांची भेट झाली. नेपाळबद्दल माताजींना पूर्ण माहिती होती. समशेरजंग बहादूर यांच्या तिच्यावरील कृपादृष्टीमुळे त्या नेपाळच्या राजकीय वर्तुळातही सर्वांना परिचित होत्या. नेपाळला राजा असला, तरी खरी सत्ता पंतप्रधान चंद्रसमशेरजंग बहादूर यांच्या हाती होती. पंतप्रधानांचे चुलतभाऊ कुमार नरसिंहराणा यांच्याशी माताजींची चांगलीच ओळख होती. त्यांच्यामार्फत नेपाळ दरबारशी संधान बांधणे शक्य असल्याचे माताजींनी टिळक व जोशी यांना सांगितले. पण नेपाळला जाण्याचा परवानाच न मिळाल्यामुळे नाराज होऊन मार्च 1900 मध्ये टिळक माघारी परतले. येताना ते कलकत्त्याहून सरळ मुंबईकडे न येता बनारस, अलाहाबाद व जबलपूर या मार्गाने आले. जबलपूरच्या मुक्कामात त्यांची भेट हणमंतराव कुलकर्णी-कोल्हापूरकर यांच्याशी झाली. हणमंतरावांची बहीण पशुपतिनाथाच्या देवळाच्या पुजाऱ्याची बायको होती. हा धागा पकडून टिळकांनी नाटककार कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांना विटांचा कारखाना काढण्याचे निमित्त सांगून नेपाळला पाठवले.

खाडिलकरांनी नेपाळचे सेनापती चंद्रसमशेरसिंग याच्या मदतीने जर्मन फर्म कृप्सच्या साहाय्याने विटा बनवण्याचा कारखाना उभारला; परंतु प्रत्यक्षात मात्र इथे विटा न बनता

**पशुपतिनाथाचे पुजारीपण हे गेली दोन–तीन शतके महाराष्ट्रातील कऱ्हाडे ब्राह्मण जातीतीलच पुजाऱ्याकडे असते. ती परंपरा अजून नेपाळला चालू आहे.*

हत्यारे, बंदुका वगैरे तयार होत होत्या. नेपाळ, बंगाल सीमेवरून ही हत्यारे व बंदुका बंगालमध्ये पोहोचवली जात. खाडिलकरांनी आपल्या वागण्याबोलण्याने आजूबाजूच्या संबंधित लोकांचे मन जिंकले होते. नेपाळी उच्चपदस्थांबरोबर चांगले संबंध जोडले होते; पण एके दिवशी त्यांच्याबरोबरच्या एका फितूर सहकाऱ्याने विटांऐवजी कारखान्यात काय काय बनते? त्याची बातमी पोलिसांना कळविली. त्यामुळे पोलिसांनी कारखान्याला गराडा घातला, आतील सर्वच्या सर्व सामान जप्त केले. हा सर्व कारखाना उभारण्यात माता तपस्विनीची खूपच मोठी मदत झाली होती. ते तिचे एक स्वप्न होते. पण खाडिलकरांना सोजिरांनी खूप त्रास दिला; तरही त्यांनी माता तपस्विनीबद्दल एक अक्षरही काढले नाही. त्यामुळे इंग्रजांना माता तपस्विनीचा संशयही आला नाही. मनाने खचलेल्या माता तपस्विनींनी शाळेचे काम सुरू ठेवले. अशा तऱ्हेने माताजींनी प्रथम महाराष्ट्र आणि बंगालमध्ये संपर्क जोडला व त्यानंतर बंगाल आणि नेपाळ यांचा संबंध जोडून दिला.

माता तपस्विनी वृद्ध होत व थकत चालली. अंतिम क्रांतीची तिची योजना असफल झाल्यामुळे शेवटी ती अगदी मोडून पडली होती. आपलेच लोक पाळत ठेवून बातम्या मिळवतात व पोलीस विभागाला पुरवतात. पोलिसांच्या हाती सापडलेल्या लोकांचे अत्यंत हाल केले जात. अशा बातम्या ऐकल्या की, माताजींचे हृदय पिळवटून निघायचे. विश्वासघातक्यांमुळेच क्रांतिकारकांच्या योजना निष्फळ होत. नाहीतर हजारो साधू, बैरागी देशभर फिरत असता यश मिळणार नाही असे होणे शक्यच नव्हते. टिळक व जोशी यांच्याशी संबंध आल्यामुळे व त्यांचे स्वतःचे वास्तव्यही बंगालमध्येच असल्यामुळे त्यांनी 1905 मध्ये वंगभंगाच्या चळवळीतही सक्रिय योगदान केले. माता तपस्विनी आता खूपच वृद्ध झाल्या होत्या; पण उत्साह मात्र तरुणीला लाजविणारा होता. विदेशी वस्तूंवर बहिष्कार आंदोलनाची प्रेरणा त्यांनी साधू संन्याशांच्या जथ्याला दिली. बंगालमध्ये त्यांच्यातर्फे स्वदेशीचा प्रसार केला. माता तपस्विनीने अध्यात्माचे अध्ययन व अध्यापन करता करता क्रांतीचा संदेश पसरवण्याचे काम आयुष्यभर केले. त्यांचा जन्म 19 व्या शतकाच्या पूर्वार्धाच्या शेवटी झाला असावा. साधारणपणे मृत्युसमयी त्यांचे वय 65 ते 70 वर्षे असावे, असा अंदाज येतो. 1907 मध्ये कलकत्त्यात त्यांचा मृत्यू झाला. सन 1857 चा उठाव अयशस्वी झाल्यावर बराच वेळ मिणमिणती का होईना क्रांतिज्योत तेवत ठेवण्याचे काम माता तपस्विनीने केले. टिळक आणि वासुकाका जोशी माता तपस्विनींना अचानक भेटले. वासुकाका जोशी यांचे चरित्र मामा देवगिरीकरांनी लिहिले आहे. त्यात नेपाळ प्रकरणाचे उल्लेख आहेत. पुढे काकासाहेब खाडिलकर यांच्यामुळेच नेपाळ प्रकरणाची अधिक माहिती मिळाली. या दोन्ही ग्रंथांत माताजींच्या मदतीचे उल्लेख आहेत. मराठीत डॉ. य. दि. फडके यांनी आपल्या 'नाही चिरा नाही पणती' मध्ये माताजींची जुजबी माहिती दिली आहे. त्यामुळे इतर संशोधकांचेही लक्ष आता माताजींच्या कार्याची अधिक माहिती मिळवण्याकडे लागले आहे. आज या घटकेला मात्र माताजींची कहाणी अपूर्णच आहे.

■ ■

# भाग 1

# महात्मा गांधींची महिला नीती



नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी गांधीजींना 'राष्ट्रपिता' या नावाने प्रथम संबोधले. 'महात्मा' ही पदवी 1920 च्या असहकाराच्या चळवळीत त्यांना भारतीय लोकांनी दिली. या दोन्ही पदव्यांनी आज गांधीजींची ओळख आहे. या राष्ट्रपित्याचे देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटणे एवढे एकच काम नव्हते. आफ्रिकेतून मायदेशी परतल्यानंतर एतद्देशीय समाजातील दबलेल्या आणि दबल्या जाणाऱ्या जनसमुदायाच्या विकासासाठीही ते आयुष्यभर झटले. त्या जनसमुदायाला त्यांनी मंत्रमुग्ध आणि गंडमुक्त केले. त्यात स्त्रिया आणि दलित हे दोन वर्ग प्रमुख होते. या दोन्ही वर्गांची योग्यता आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांचे महत्त्व त्यांना जाणवून दिले, 'आपणही काहीतरी करू शकतो', हा विश्वास त्या दोन्ही वर्गांमध्ये निर्माण केला. गांधीजींसंबंधी लिहिताना सी. एफ. अँन्ड्रू नावाचे लेखक म्हणतात, 'गांधीजींनी भारतात आल्यावर आपण ज्यांना अबला म्हणतो त्या स्त्रिया अबला नसून सबला आहेत हे प्रथम सांगितले. हा अनुभव त्यांना आफ्रिकेतील कामामुळे अनुभवता आला होता. सर्व दुर्बल घटक भारतात जेव्हा शक्तिमान होतील तेव्हाच या देशाचे स्वातंत्र्य लवकर मिळेल. हे स्वप्न फक्त लोकांना दाखवण्याचा आशावाद नव्हता. यासाठी ते आयुष्यभर झटले, झगडले.'

महात्मा गांधींना स्त्री शक्तीची प्रथम जाणीव आफ्रिकेत झाली. आफ्रिकेतील सत्याग्रहाचे नेतृत्व करताना त्यांनी स्त्रियांना पाहिले. ते पहात असता त्यांच्या लक्षात आलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुस्तकी विद्येने नव्हे तर विश्वास आणि सहनशक्ती यातून निर्माण झालेले कणखर मन या दोनच गोष्टी नेतृत्वासाठी गरजेच्या आहेत. आफ्रिकेत स्त्रियांच्या चळवळीमुळे त्यांना त्या दिसून आल्या. हिंदुस्थानातील स्त्रिया तर शेकडो वर्षे दाबल्या गेल्या आहेंत. स्त्रिया ह्या देशाची अर्धी शक्ती आहे. हिंदुस्थानात ही शक्ती निष्प्रभ झाली आहे, ती सामाजिक बंधनांमुळे. तिला दडपून ठेवून पुरुषांनी आपल्या पायातली

दासी बनवली. हे सर्व त्यांनी जाणून बुजून आपल्या फायद्यासाठी केले.

स्त्रियांमधील सहनशक्ती, सेवाधर्म हे गुण कुटुंबाकडून वापरून घेतले जातात. तो कुटुंबाचा हक्क आहे या गैरसमजुतीमुळे हे घडते. स्त्रियांनी कुटुंबासाठी झटावे ही गोष्ट गांधीजी अमान्य करत नव्हते. त्यांनी ते लहानपणापासून आपली आई पुतळीबेन आणि दाई रंभाबेन यांच्या वर्तनातून ओळखले होते. स्त्रियांनी जर असे वागले पाहिजे तर पुरुषांनी तसेच का वागू नये? स्त्रियांनी जर सीता-सावित्रीचा आदर्श समोर ठेवला पाहिजे तर पुरुषांनी स्वतः राम आणि सत्यवान यांचा आदर्श का ठेवू नये?, असे गांधींना वाटे. स्त्रीवर या गोष्टी करण्यासाठी तिला भरडून का काढली जाते? तिला स्वतःचा विचार करायला संधी का दिली जात नाही? यासाठी समाजात आपल्या मनाप्रमाणे मिसळण्याची बंदी का केली जाते? ही परिस्थिती बदलली पाहिजे. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाही देशाच्या कार्यात आल्याच पाहिजेत असे ते आपल्या भाषणातून आणि लेखनातून मांडत असत. ते म्हणत, 'स्त्रिया समाजाच्या सांस्कृतिक जीवनाच्या कणा आहेत. उदात्तता, सहनशीलता, दुसऱ्याला समजून घेणे, एकात्मकता आणि अध्यात्मिक शक्ती हे स्त्रियांचे गुण आहेत. या गुणांमुळेच त्यांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा आहे. आर्थिक स्वातंत्र्य हे त्यांच्याच नव्हे तर समाजाच्या स्वास्थ्यासाठीही आवश्यक आहे.' यासाठीच स्त्रियांना त्यांनी सूतकताई आणि कुटीरोद्योगाचे शिक्षण देणे महत्त्वाचे मानले. त्याकरिता निरनिराळे विधायक कार्यक्रम आखून दिले. हे सर्व करत असताना त्यांच्या डोळ्यांसमोर दोनच वर्ग होते. एक स्त्रिया आणि दुसरा वंचित समाज. या सर्वत्र उपेक्षित समाजांना शिक्षणापासून हेतूतः दूर ठेवले होते. त्यांनी खास त्यांच्यासाठी मुलोद्योग शिक्षण पद्धती सुरू केली.

गांधी आश्रमातून आणि त्याच तत्वांवर चालणाऱ्या आश्रमातून ही शिक्षण पद्धती सुरू केली. गांधी भारतात आल्यावर त्यांचे लक्ष सामाजिक कार्याकडे विशेषतः स्त्रियांच्या प्रश्नाकडे वळले असे नाही. आफ्रिकेतील स्त्रियांचे सत्याग्रहातील काम, तसेच त्यांच्या स्टेनो टायपिस्टने ते कारागृहात असताना त्यांच्या सर्व जबाबदाऱ्या अंगावर घेऊन उत्तमरितीने केलेले काम पाहून ते भारावून गेले होते. या शिवाय त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील एक प्रसंग कारणीभूत झाला. एकदा कस्तुरबा आणि गांधीजी यांच्यामध्ये संडास सफाई वरून मतभेद झाले. गांधीजींचा पारा चढला आणि त्यांनी कस्तुरबांना घराबाहेर काढले. कस्तुरबांनी बाहेरून ओरडून सांगितले, "मला तुम्ही घराबाहेर काढू शकत नाही, हे घर माझेही आहे, मी तुम्ही दार उघडण्याची वाट पहाते आहे" या कस्तुरबांच्या ठणकावण्याने गांधीजींना अंतर्मुख केले.

आफ्रिकेतून कायमचे स्वदेशी आल्यावर मुंबई–पुणे अशा प्रमुख गावांमध्ये त्यांचे सत्कार आयोजित केले होते. पुण्याला किर्लोस्कर थिएटर मध्ये झालेल्या सत्काराला हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या स्त्रिया हजर होत्या. त्यांच्याकडे वळून ते म्हणाले, "भगिनींनो, तुम्ही राष्ट्राची अर्धी शक्ती आहात. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी तुमचे योगदान हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तुम्ही त्यासाठी समर्थ आहात. तुमची शक्ती जागृत झाली की,

तुमच्यात सामर्थ्य येईल. आपला देश आपण स्वतंत्र करू शकू. पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना पुरुषांपेक्षा अधिक निष्ठेने आणि जिद्दीने काम करण्याची शक्ती तुमच्यात आहे." त्याकाळी स्त्रियांना हे विचार नवे होते. खरंच असं होईल का? अशी शंकाही मनात आली. घरोघरी स्त्रिया आपल्या पुरुषांच्या पायाची दासी म्हणून वागत होत्या. विधवा, केशवपन हेच निमूटपणे सहन करणे आपले जीवन आहे हा विचार मान्य केलेल्या स्त्रियांना हा नवविचार एक दिवास्वप्न वाटत होते.

गांधीजी विवाहाकडे जीवनातील एक शिस्तबद्ध भागीदारी घेण्याचा पवित्र संस्कार असे मानीत. केवळ शारीरिक संबंधांकरता सामाजिक परवाना म्हणून विवाहाकडे पाहणे त्यांना अयोग्य आणि चुकीचे वाटे. आदर्श विवाह म्हणजे शारीरिक संबंधातून अध्यात्मिक संबंध प्रस्थापित होणे होय. अध्यात्मिक विकास, सेवा, सामाजिक न्यायामध्ये मनाची गुंतवणूक आणि प्रेम या चार गोष्टी विवाहाकरिता अटी असाव्यात. स्त्री ही पुरुषाची सहचारिणी आहे, दासी नाही. स्त्रीला जर आपली बाजू न्यायाची वाटत असेल तर तिच्या आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला विरोध करण्याचा तिला अधिकार आहे. विवाह समारंभ श्रीमंतीचे प्रदर्शन न करता साधेपणाने करावेत, ही पद्धत फक्त सांगून ते थांबले नाहीत. आपल्या धाकट्या मुलाचे लग्न त्यांनी याच पद्धतीने केले. मुलगी सून म्हणून आपल्या घरी येते. त्यामुळे लग्न हे मुलाच्या घरी मुलीचे स्वागत करून झाले पाहिजे. आपल्या मुलाच्या लग्नात गांधीजींनी आणखी एक क्रांतिकारक घोषणा केली. "मुलगा किंवा मुलगी या दोघांपैकी एक हरिजन असेल तरच मी लग्नाला हजर राहीन." हे तत्व त्यांनी आजन्म पाळले. समाजाच्या ऐक्यासाठी सवर्ण आणि हरिजन यांच्यामध्ये विवाह होणे त्यांना आवश्यक वाटे. अशा विवाहांना लोक 'गांधी विवाह' म्हणू लागले. गांधीजींच्या अनेक कार्यकर्त्यांनी असा विवाह करून पुढचे पाऊल टाकले.

समाजातील कुप्रथांच्या उच्चाटणासाठी त्यांनी कार्यकर्त्यांना चार नियम सांगितले.

- *आपल्या मुलीचे वय 15 वर्षे पूर्ण झाल्याशिवाय तिचे लग्न करू नका. आपल्या आजूबाजूच्या लोकांनाही अशा विचारांपासून परावृत्त करा.*
- *लग्नानंतर पहिल्याच वर्षी मुलीचा नवरा वारला तर तिचा पुनर्विवाह लावून द्यावा.*
- *15 वर्षांपेक्षा लहान वयात विधवा झालेल्या मुलीचा कुटुंबाने पुनर्विवाह करून द्यावा.*
- *प्रत्येक कुटुंबाने आपल्या घरातील विधवेला सन्मानाने वागवावे, तिला ज्ञानोपासना करणे किंवा शाळेत जाऊन शिकायला प्रोत्साहन द्यावे.*

वरील नियम वगळता आणखीही काही गोष्टी त्यांनी विधूर पुरुषांसाठी सांगितल्या. विधुरांनी पुनर्विवाह करताना शक्यतो विधवेशीच करावा. ती स्त्री त्यांच्या वयाशी शोभणारी असावी. याबाबतीत गांधीजींचे म्हणणे असे होते की, स्त्री पुरुषाच्या शुद्धतेबद्दल आग्रह धरू शकत नाही पण पुरुष तो धरतो. कुणी दिला त्याला तो अधिकार, कुणी या गोष्टीला मान्यता

दिली? पुनर्विवाहाच्या अधिकाराबरोबरच स्त्रीला घटस्फोटाचाही अधिकार मिळाला पाहिजे.

स्त्री-पुरुष समानता, गरीब आणि श्रीमंत यांतील दरी, अस्पृश्यांचा प्रश्न हे राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या मार्गात मोठे अडसर आहेत. देशभर या सामाजिक परिस्थितीच्या विरुद्ध आवाज उठत राहिला तर राजकीय स्वातंत्र्य मिळविणे सुलभ होईल असे ते आपल्या भाषणातून आणि लेखनातून सातत्याने सांगत.

मुसलमान स्त्रियांशी बोलताना ते पडदा प्रथेवर बोलत. पडदा प्रथेपासून त्या मुक्त होणे आवश्यक आहे. तशी मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे असा त्यांचा आग्रह होता. सर्व कार्यकर्त्यांनी त्यासाठी झटले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. मुसलमान कार्यकर्त्यांना ते सांगत की, तुम्ही तुमच्या घरापासून त्याची सुरुवात करावी. जनाब हसरत मोहाजी यांची बेगम त्यांच्याबरोबर काँग्रेसमध्ये काम करत होती. सुरुवातीला ती बुरख्यातच वावरे आणि बुरख्यातच भाषण करी. लवकरच तिने बुरखा घालणे बंद केले. स्वातंत्र्य लढ्यातील प्रसिद्ध अली बंधूंची आई बी.अम्मा यांनीही बुरखा वापरणे बंद केले. या सर्व खानदानी महिला होत्या. त्यांनी स्वतः बुरखा घालणे सोडले आणि त्याचा प्रसारही केला. त्या काळात अनेक सामान्य कुटुंबातील स्त्रियांनी बुरखा त्याग केला तो, गांधीजींच्यामुळेच.

गांधीजींनी काँग्रेस कार्यकर्त्यांसमोर स्त्रियांची मुक्ती हे प्राथमिक आणि मूलभूत कार्य म्हणून ठेवले होते. कार्यकर्त्यांना उद्देशूनच ते म्हणतात, “जर तुमचा विश्वास स्वातंत्र्य हा प्रत्येक राष्ट्राचा तसेच, व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच या विधानावर आहे; तर तुम्ही तुमच्या घरातल्या स्त्रियांना प्रथम अनिष्ट चालीरीती आणि प्रथा यांपासून मुक्त केले पाहिजे. मुलींची लहानपणापासूनच सर्वांगीण वाढ आणि प्रगती कशी होईल याचा विचार केलाच पाहिजे.”

गांधीजींच्या या विचारांचा परिणाम म्हणूनच की काय स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणारी दांपत्ये दिसतात. उदाहरणार्थ पुण्याचे विनायक नारायण आपटे आणि सारजाबाई, येवल्याचे आपटे गुरुजी आणि राधाबाई, विदर्भातील श्रीधर हरी थत्ते आणि मालतीबाई, पुण्याचे न.वि. गाडगीळ आणि आनंदीबाई, खान्देशचे दास्ताने वकील आणि वारूबाई, नानासाहेब ठकार आणि पार्वतीबाई, मुंबईचे वि.स. सोहनी आणि त्यांची पत्नी ही दांपत्ये डोळ्यांसमोर येतात.

गांधीजींचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केवळ भारतीय राजकारणात बदल घडवून आणला असे नाही. त्यांनी स्त्रियांच्या स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याचा संपूर्ण दृष्टीकोनातच बदल घडवून आणला. अहिंसक मार्गाने देशाच्या राजकारणात त्यांचा प्रवेश झाल्याचा आश्चर्यकारक परिणाम स्वातंत्र्य लढ्यावर दिसून येऊ लागला. एका बाजूला स्त्रियांना आपल्या ताकदीची आणि कुवतीची जाणीव झाली आणि दुसऱ्या बाजूला अहिंसेच्या मार्गाने मानवी आणि नैतिक मूल्ये राजकारणात आली. गांधीजींचा आपल्या मार्गावर पूर्ण विश्वास होता. ते आपल्या भाषणात म्हणत, “अहिंसा हा जर आपल्या अस्तित्वाचा प्रश्न असेल तर

आपलं भवितव्य हे स्त्रियांबरोबरच असेल." राजकारणातील स्त्रियांच्या सहभागाबद्दल गांधीजी म्हणतात, "स्त्रियांनी माझा कधीच अपेक्षा भंग केला नाही."

गांधीजींच्या विचारांचा परिणाम समाजाच्या सर्व थरातील स्त्रियांवर दिसून येऊ लागला. जसे, शिक्षित-अशिक्षित, ग्रामीण-नागरी, भारतीय-विदेशी इत्यादी. सरोजिनी नायडू, अनुसया बेन साराभाई, विजयालक्ष्मी पंडित, मीराबेन, लक्ष्मी मेनन, सुशीला नय्यर, राजकुमारी अमृतकौर या उच्चशिक्षित आणि सधन घरातल्या. डॉ. इंदुमती नाईक, पद्मावतीबाई हरोलीकर, जानकीबाई आपटे, महालसा भांडारकर या मध्यम वर्गीय स्त्रियांची इथे काहीच उदाहरणे देत आहे. गांधीजींनी स्त्रियांच्या मनात स्वातंत्र्य मिळविण्याचा नुसता अंगार फुलवला नाही तर त्यांनी स्त्रियांना आत्मोद्धाराचीही प्रेरणा दिली.

इ.स. 1919 ते 1930 पर्यंतच्या काळात स्त्रियांना प्रत्यक्ष सत्याग्रहात सामील करून घेतले नव्हते. दांडीयात्रेतील सत्याग्रहात जी 75 स्वयंसेवकांची यादी जाहीर झाली त्यात एकाही स्त्रीचे नाव नव्हते. सरोजिनी नायडूंच्या नेतृत्वाखाली स्त्रियांनी आपल्या शिष्टमंडळाला गांधींबरोबर चर्चा करण्यासाठी पाठवले. सरोजिनी देवी गांधींना म्हणाल्या, "आम्ही घरदार सोडून देशाच्या स्वातंत्र्यासाठी होणाऱ्या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी आलो. प्राण गमावण्याची भीती आम्हाला नाही. आम्हाला आपण सांगता की, सत्याग्रहात भाग घेता येणार नाही म्हणून? का अडविता आम्हाला? आमचा हा अधिकार आपण नाकारता म्हणून आम्ही त्याच्या विरोधात आपल्या समोरच पहिला सत्याग्रह करतो." स्त्रियांची ही तयारी पाहून गांधीजींनी आनंद व्यक्त केला. परिणामी मीठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह इत्यादी सत्याग्रहात शेकडो स्त्रियांनी भाग घेतला. काहींनी समाज जागृतीसाठी, स्वतःसाठी मार्ग निवडले. उदा. यशोदाबाई भट देशभक्तीपर कीर्तने उत्तम करत. स्त्रियांची छोटी-छोटी भजनी मंडळे प्रथमच स्थापन झाली. स्वातंत्र्य लढ्यावरील पुस्तकांची विक्री, खादी विक्री, दारूच्या दुकानांवरील निदर्शने, परदेशी मालाच्या आणि कपड्यांच्या होळ्या इत्यादी कार्यक्रम स्त्रियांनी राबवले. स्त्रियांची धरपकड आणि तुरुंगवास हे नेहमीचेच झाले.



*स्वदेशी आंदोलनाचे नेतृत्व करताना अंबुजम्माल (डावीकडून पहिल्या)*

1931 साली लाहोर येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात बोलताना पंडित नेहरूंनी स्त्रियांच्या सहभागाचे खूप कौतुक केले. या स्त्रियांचे स्वातंत्र्य लढ्यातील हे काम स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात सुवर्णाक्षराने

लिहिले जाईल असे एक आश्वासन त्यांनी दिले. महर्षी धोंडो केशव कर्वेनीही स्त्रियांमध्ये गांधीजींच्या प्रयत्नाने झालेला बदल हे गांधीजींचे 'एक अभूतपूर्व कार्य' या शब्दांनी गौरवले. महात्मा गांधीप्रणीत विधायक कार्यक्रमांचे एक वैशिष्ट्य होते. ते स्त्रियांच्या मूलभूत कर्तव्याच्या म्हणजे नेटका संसार, जेष्ठांची देखभाल, मुलांचे संगोपन यांच्या आड कधी आले नाहीत. उलट गांधीजींच्या विधायक कार्यक्रमाने स्त्रीच्या पारंपरिक कामांना आणि प्रतीकांना एक नवा अर्थ दिला. उदाहरणार्थ सुतकताई आणि खादी विकणे या कामात पुरातन काळापासूनच स्त्रिया आघाडीवर होत्या. परदेशी मालाच्या आणि दारूच्या दुकानांबाहेर निदर्शने ही कामे गांधीजींनी दिलेल्या सैद्धांतिक चौकटीत बसणारी होती. घरोघरी दारूचे दुष्परिणाम कुटुंबाला भोगावे लागत होते, विशेषतः स्त्रीला. परदेशी कपड्यांमुळे हातमाग बंद पडत होते. या दोन्ही गोष्टींमुळे स्त्रियांच्या घरगृहस्थीवर परिणाम होत होता. म्हणून निदर्शने करण्यासाठी प्रचंड संख्येने स्त्रिया पुढे आल्या. या गांधीप्रणीत कार्यक्रमामुळे स्त्रियांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली. त्यांच्यातील अंगभूत गुण चकाकून उठले.

गांधीजींनी स्वदेशी चळवळीसाठी स्त्रियांना प्रोत्साहन दिले. 'परदेशी वस्तू घरी आणायची नाही', असे घरातील कर्त्या पुरुषांना बजावावे, असे आवाहन त्यांनी स्त्रियांना केले. परिणामी 'विदेशी वस्तू विकत आणल्या तर आम्ही त्या जाळून टाकू', असे घरोघरी स्त्रियांनी नवऱ्यांना बजावले. नुसतेच बजावले नाही तर ते आचरणातही आणले. विशेषतः मुंबईच्या श्रीमंत पारशी आणि गुजराथी महिलांनी आपल्या नवऱ्यांचे कपडे जाळून भस्म करून टाकले. इतर स्त्रियांना धडा घालून दिला. अशा रितीने स्त्रियांनी स्वदेशी चळवळीशी स्वतःला जोडून घेतले हा गांधीजींच्या विचारांचा विजय होता.

स्त्रियांशी बोलताना अनेकवेळा गांधीजी त्यांच्या समोर परंपरागत आदर्श नव्या स्वरूपात मांडताना दिसतात. सीता, द्रौपदी, मीराबाई या थोर स्त्रिया होत्या. ही गोष्ट भारतीयांच्या मनात खोलवर रुजली आहे. त्यात नवीन काही नाही. गांधीजींनी याच गोष्टीकडे नव्याने पाहण्याची दृष्टी दिली. 'सीता दुबळी नव्हती. अतिशय कठीण आणि गंभीर परिस्थितीत तिने नैतिक धैर्य दाखविले होते. मीराबाई असामान्य धैर्यवती होती. तिने जो विचारपूर्वक मार्ग निवडला त्या मार्गावरून सामाजिक आणि कौटुंबिक विरोधाला न जुमानता ती चालतच राहिली. म्हणूनच स्त्रियांना त्या आजही आदर्शच आहेत', अशी मांडणी ते करत असत. गांधीजींनी स्त्रियांच्या भूमिकेला नव्या स्वरूपात मांडले. स्त्रीला दुबळी मानणे हा पुरुषांनी स्त्रीवर केलेला अन्याय आहे. शक्तीचा अर्थ जर नैतिक शक्ती हा असेल तर स्त्रिया पुरुषांपेक्षा कितीतरी पटीने सशक्त आहेत. स्त्रियांची सहनशक्ती, स्वार्थत्याग आणि अतुल धैर्य हे गुण त्यांच्या सशक्ततेची उदाहरणे आहेत. स्त्रीशिवाय पुरुष अपूर्ण आहे, अशी मांडणी ते स्त्रियांसमोर करत.

स्त्रीला गुलामाचा दर्जा शेकडो वर्षे चालत आलेल्या कनिष्ठ प्रथेतून दिला गेला. सगळे कायदे पुरुषांनी केले ही परिस्थिती सुधारण्याचा स्त्रियांसमोरील एकच मार्ग म्हणजे त्यांची

आग्रही इच्छाशक्ती. आपल्याला काय हवे ते ठरवून ते प्राप्त करून घेण्याबाबत त्या सजग आणि समर्थपणे उभ्या राहिल्या पाहिजेत. त्यांनी सुखलोलूप आणि बेजबाबदार बनू नये. अंगावर सोन्या-मोत्याचे अलंकार घालून स्त्रीचे सौंदर्य खुलत नाही. उत्तम चारित्र्य, डोळ्यांतील जरब यामुळे स्त्री ही सौंदर्यवती भासते.

गांधीजींनी बालविवाह, विधवांचे दमन, जरठ कुमारी विवाह, हुंडा देणे-घेणे आणि पडदा पद्धतीला विरोध केला. हरिजनांच्या प्रश्नांशी स्त्रियांना त्यांनी तर्कशुद्ध पद्धतीनी जोडले. हरिजन आणि भंगी हे तर घाण काम करणारे लोक आहेत म्हणून अस्पर्श आहेत तर आपल्या मुलांसाठी हेच काम करणारी आई अस्पर्श आहे का? आई मुलांसाठी जे काम करते तेच काम हरिजन समाजाकरता करत असतात. मग ते अस्पर्श कसे असतील. असा युक्तिवाद करून ते स्त्रियांना म्हणतात, “पुरुषांची जातीयवादापासून मुक्तता करणे हे स्त्रियांचेच काम आहे.” ते म्हणत, “तुम्हालाच ते शक्य आहे. पुरुषांनी हरिजनांना घरात घेतले पाहिजे. हे जोपर्यंत होत नाही तो पर्यंत आम्ही घरात अन्न शिजविणार नाही. लक्षात घ्या की, आम्हीही हेच काम आपल्या मुलांसाठी युगानुयुगे करत आलेल्या आहोत.” गांधीजींच्या ह्या संदेशाने अहमदनगरच्या स्वातंत्र्य-सैनिक जानकीबाई आपटे आणि मालवणच्या महालसा (कोकणीत म्हाळसाबाई) या दोघींनी आपले आयुष्य हरिजनांच्या मुक्ती कार्याला वाहून घेतले. घरात हरिजन मुली आणून ठेवल्या. त्यांचे शिक्षण आणि लग्न कार्य वगैरे केले. हरिजनोद्धाराचे काम प्रथम गांधीजींचे शिष्य ठक्कर बाप्पा यांनी सुरू केले. त्या कामाला स्वतःला वाहून घेतले. जानकीबाई आणि म्हाळसाबाई यांनीही हेच काम केले. आधी केले मग सांगितले. स्वातंत्र्याच्या इतिहासात जानकीबाईना नगरची ठक्कर बाप्पा आणि म्हाळसाबाईना कोकणची ठाकूर बाप्पा या शब्दांनी गौरविले आहे.

स्त्रीमुक्ती हा शब्द 1975 साली भरलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेपासून रूढ झाला. ‘न स्त्री स्वातंत्र्यमर्हती’ या मनूच्या वचनावर डोळे झाकून समाजाने विश्वास ठेवला. अनेक शतके स्त्रियांवर अधिकाधिक बंधने लादली गेली. त्या शिक्षणाला वंचित झाल्या. अधिकाधिक पुरुषीसत्तेचा विळखा त्यांच्या भोवती पडत गेला. पायाची दासी, पायातली वहाण पायातच ठेवली पाहिजे, असे वाक्प्रचार घरोघरी ऐकू येऊ लागले. स्त्रियांनी पती हा परमेश्वर मानला. स्त्रियांनीही मुकाटपणे ही अवहेलना शतकानुशतके सोसली. हे सर्व आपण पचवून पुढच्या पिढीत अगदी खत घालून रुजवले आणि पक्के केले. महाराष्ट्रात ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांनी स्त्री शिक्षणाचे बीज (समाजाने केलेले घाव सोसून) पेरले. महर्षी कर्वे यांनी फुले दांपत्याने पेरलेल्या स्त्री शिक्षणाच्या बीजाचे रोपटे वाढविले आणि त्याचा वटवृक्ष केला. ही महाराष्ट्रातील स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत समाजसेवेची पार्श्वभूमी तयार केली होती. म. गांधींनी त्याला नवी दिशा दिली. स्त्रियांना त्यांच्या नैतिक शक्तीची, कर्तबगारीची, अंगभूत गुणांची ओळख करून दिली. त्याच गुणांचा उपयोग करून घेऊन त्यांना देशाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीकडे आकर्षित केले. त्यातच वंद्य असलेल्या पौराणिक आणि ऐतिहासिक स्त्रियांचा नव्याने अर्थ सांगितला.

■ ■

# म. गांधींच्या प्रभावाने स्वातंत्र्य चळवळीत आलेल्या महिला

## अवंतिकाबाई गोखले (1882–1949)



गांधीजींच्या पट्टशिष्या असलेल्या अवंतिकाबाई गोखले. मराठीबरोबर इंग्रजी भाषेवरही प्रभुत्व असलेल्या अवंतिकाबाईंनी चंपारण्यातील सत्याग्रहापासून गांधीजींना साथ दिली. स्त्रियांच्या व्यक्तिविकास व सबलीकरणासाठी त्यांनी गिरगावात 'हिंद महिला समाजा'ची स्थापना केली तसेच गिरणी कामगार स्त्रियांच्या सोयीसाठी भारतात प्रथमच पाळणाघरे सुरू केली. याशिवाय अस्पृश्य समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठीही प्रयत्न केले. 1930 व 32 सालच्या मिठाच्या सत्याग्रहात मुंबईतून शेकडो स्त्रिया सामील झाल्या. त्याचे श्रेय बाईंनाच जाते. एक नि:स्पृह, स्पष्टवक्ती, अनुशासनप्रिय कार्यकर्ती म्हणून स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात त्यांना मानाचे स्थान आहे.

भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात गांधींची पहिली भारतीय शिष्या म्हणून अवंतिकाबाई गोखले ओळखल्या जातात. गांधीजींची व अवंतिकाबाईंची ओळख त्या वेळचे प्रसिद्ध तत्त्वज्ञ व विचारवंत श्रीनिवास शास्त्री यांनी करून दिली होती. ही बाई सामान्य नाही हे गांधीजींनी ओळखले. आपण हिंदुस्थानात दलित व स्त्रिया यांच्याकरिता जे काम करू इच्छितो त्यासाठी हीच कार्यकर्ती आपल्याबरोबर हवी, असे गांधीजींना वाटले.

अवंतिकाबाईंचे लग्न नवव्या वर्षी झाले होते. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे त्यांना लिहिता-वाचताही येत नव्हते. सासरी आल्यावर त्या लिहायला-वाचायला शिकल्या. विलायतेला शिकायला गेलेल्या नवऱ्याने अवंतिकाबाईंना आपण परत येईपर्यंत इंग्रजीत लिहिणे, वाचणे आणि बोलणे न आल्यास तुला नांदविणार नाही, अशी धमकी दिली होती. त्यामुळे घाबरून अवंतिकाबाई आपल्या सासऱ्याजवळ इंग्रजी शिकल्या. 1919 पर्यंतचे त्यांचे जीवन मध्यमवर्गीय ब्राह्मण स्त्रीचे होते. त्या वर्षी त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. इचलकरंजीच्या राणीला इंग्लंडला जायचे होते. तिच्यासोबत जाण्यासाठी

समवयस्क, शिक्षित व इंग्रजी जाणणारी स्त्री म्हणून अवंतिकाबाईंची निवड झाली. विलायतेला गेल्यावर त्यांनी अनेक इस्पितळांना भेटी देऊन तिथल्या कार्यपद्धतीची माहिती करून घेतली. श्रीमंत घरातील स्त्रियांना त्यांनी स्वयंसेवी संस्थांतून काम करताना पाहिले. त्यांच्याशी त्यांचे काम व कामातील अडचणींबाबत चर्चा केली. त्यापासून स्फूर्ती घेऊन मायदेशी परतल्यावर गिरणगावात त्याच पद्धतीने त्यांनी काम सुरू केले. या भागात त्यांनी शिक्षणाचे व आरोग्याचे महत्त्व व मुलांचे योग्य पालनपोषण या बाबतीत जाणीवजागृती केली. या भागात गिरणी कामगार स्त्रियांच्या सोयीसाठी भारतात प्रथमच पाळणाघरे सुरू केली. बाई स्वत: चित्पावन ब्राह्मण. घरात खूप सोवळेओवळे. पण हे सर्व बाजूला सारत त्या अस्पृश्य समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी धडपडू लागल्या.

1916 साली लखनौ काँग्रेसमध्ये त्यांची गांधीजींशी गाठ पडली. गांधीजींनी जेव्हा बिहार चंपारण्यातील निळीची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे दु:ख ऐकले तेव्हा त्यांच्याबरोबर अवंतिकाबाईंनीही सत्याग्रहासाठी यावे अशी त्यांनी विनंती केली. चंपारण्याच्या सत्याग्रहामध्ये भाग घेण्यासाठी महाराष्ट्राच्या सत्याग्रही तुकडीत आनंदी वैशंपायन व अवंतिकाबाई गोखले या दोन स्त्रिया होत्या. बिहारमध्ये फिरून त्यांनी महिलांना आरोग्याचे धडे दिले. मुलींच्या शिक्षणाकरिता प्रचार केला. बडहरवा गावी मुलींची शाळा काढली. मुलींच्या शाळेला पुरुषांबरोबर स्त्रियांचाही विरोध होता. लिहिणे, वाचणे व त्यांच्यामध्ये स्वदेशप्रेम निर्माण करण्याचे अवघड काम अवंतिकाबाईंनी केले. चंपारण्यात त्यांनी मराठी भाषेतले पहिले गांधींचे चरित्र लिहायला सुरुवात केली. 1919 मध्ये नाशिकमधल्या एका सभेत अवंतिकाबाईंचे भाषण ऐकून लोकमान्य टिळक प्रभावित झाले आणि ते उत्स्फूर्तपणे म्हणाले, “महाराष्ट्राची सरोजिनी आता तयार झाली आहे.”

स्त्रियांची सर्वांगीण उन्नती होण्यासाठी त्यांना एकत्र आणून त्यांचा व्यक्तिविकास व सबलीकरण व्हावे यासाठी शिक्षण देणे बाईंना आवश्यक वाटले. त्यासाठी त्यांनी गिरगावात ‘हिंद महिला समाजा’ची स्थापना केली. या समाजाच्या त्या स्वत: 31 वर्षे अध्यक्ष होत्या. अवंतिकाबाईंनी या समाजात सूतकताईचे वर्ग सुरू केले. यशोदाबाई भट यांच्यातील कीर्तनाचे अंग ओळखून त्यांच्याकडून चाळीचाळीत फिरून राष्ट्रीय कीर्तने घडवून आणली. ‘स्त्रिया आणि राष्ट्र’ या विषयावर बोलण्यासाठी अखिल भारतीय पातळीवरचे बरेच नेते त्यांनी समाजात बोलावले. 1930 व 32 सालच्या मिठाच्या सत्याग्रहात मुंबईतून शेकडो स्त्रिया सामील झाल्या. त्याचे श्रेय बाईंनाच जाते. ‘हिंद महिला’ नावाचे एक साप्ताहिकही



*मिठाच्या सत्याग्रहात अवंतिकाबाई गोखले*
*(डावीकडून पहिल्या)*

सुरू केले. फैजपूरच्या काँग्रेसला हिंद महिला समाजाच्या महिलांचा मोठा गट बाईंच्या नेतृत्वाखाली गेला. या अधिवेशनात खादी विक्रीची जबाबदारी बाईंनी उचलली व अधिवेशन काळात हजारो रुपयांची खादी विक्री चार-पाच दिवसांत करण्याचा विक्रम त्यांनी केला. त्यांनी स्वत: आमरण खादीच वापरली. स्वत: सूत कातून व विणून दरवर्षी त्या गांधींना धोतरजोडीची भेट पाठवत असत. गांधीजी त्याबाबत गमतीने म्हणत की, अविबेनने मला धोतरजोडी दिली नाही तर मला लंगोटीच नेसावी लागेल.

1922 मध्ये मुंबई महानगरपालिकेने स्त्रियांचा मताधिकार व निवडणुका लढवण्याचा अधिकार मान्य केला. त्या कायद्याप्रमाणे झालेल्या निवडणुकीत सरोजिनी नायडू, बच्चूबेन लोटवाला, हॅडगिव्हसन व अवंतिकाबाई अशा चार स्त्रिया निवडून आल्या. त्यात अवंतिकाबाईंना प्रचंड मते मिळाली. परंतु काही तांत्रिक कारणामुळे त्यांची निवड रद्द झाली. बाईंना असलेला प्रचंड पाठिंबा व त्यांचे सामाजिक कार्य लक्षात घेऊन त्यांना 1 एप्रिल 1923 रोजी महानगरपालिकेत स्वीकृत सदस्यत्व मिळाले. 1931 पर्यंत त्या सातत्याने स्वीकृत सदस्य होत्या. आपल्या मतदारसंघातील प्रश्न व ठराव मांडून त्यांनी महापालिका दणाणून सोडली.

आरोग्य व शिक्षण ही दोन खाती बाईंच्या जिव्हाळ्याची. शाळेच्या आसपास अनारोग्यकारक खाद्यपेये विकली जाऊ नयेत, चौपाटीवर बसून हवा खावी, पदार्थ खाऊन कागद, द्रोण वगैरे टाकून वाळू खराब करू नये, अशा प्रकारचे ठराव त्यांनी मांडले. त्या सभागृहात मराठीतूनच बोलत. त्यांची भाषणे व युक्तिवाद विचारप्रवृत्त करणारे असत म्हणून त्यांना अध्यक्षांनी इंग्रजीत बोलायची विनंती केली. मराठीइतकेच त्यांचे इंग्रजी भाषणही प्रभावी होई. इंग्रजीच काय, पण मराठीही घरातल्या वडीलधाऱ्यांकडेच बाई शिकल्या होत्या. आपल्या कुशाग्र बुद्धीच्या जोरावर त्यांनी दोन्ही भाषांवर प्रभुत्व मिळवले होते.

1926 मध्ये बाई महापालिकेच्या स्थायी समितीवर नियुक्त झाल्या. ही समिती अत्यंत महत्त्वाची असते. त्या वेळी बैठकीला हजर राहिल्यावर 30 रुपये भत्ता मिळे. 30 रुपयांचा चेक त्यांनी विठ्ठलभाई पटेलांकडे परत पाठविला. त्यांचे म्हणणे असे की, निवडून आल्यावर बैठकीला हजर राहणे हे समिती सदस्याचे कर्तव्य आहे. त्यामुळे आपण बैठकीला हजर राहिल्याचा भत्ता घेणार नाही असे बजावले. यातील काही तांत्रिक गोष्टी विठ्ठलभाई पटेलांनी दाखवून देऊन हा भत्ता त्यांच्या आवडीच्या कार्यासाठी दान करण्याचा मार्ग दाखवला होता.

महानगरपालिकेच्या दवाखान्यात स्त्रियांची वैद्यकीय तपासणी व उपचाराची सोय त्यांनी करून घेतली. आठवड्यात संपूर्ण एक दिवस स्त्रियांसाठी राखून ठेवला. स्त्रीरोगतज्ज्ञांची नेमणूक करून आयाबायांचा दुवा घेतला. आरोग्यासाठी असलेल्या सर्व सेवासंस्थामधून त्यातील अंदाधुंदी कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी या सर्व सेवासंस्थांवर महानगरपालिकेचा प्रतिनिधी असल्याशिवाय व त्यांनी मान्यता दिल्याशिवाय त्या संस्थांना आर्थिक साहाय्य देऊ नये, असा ठराव पास करून घेतला. हे बाईंचे महत्त्वाचे कार्य.

1928 मध्ये महापौरपदासाठी त्यांचे नाव सुचवले गेले. दुसरे नाव होते, मुंबईतील प्रसिद्ध डॉ. गोपाळराव देशमुख यांचे. बाईंच्या मते, डॉक्टर सर्वतोपरी योग्य उमेदवार होते. त्यामुळे त्यांनी आपण या पदासाठी इच्छुक नसल्याचे सांगितले. नाहीतर 1928 सालीच मुंबईला पहिली महिला महापौर मिळाली असती. महानगरपालिकेत कर्मचारी व सदस्य यांना खादी वापरणे काही कारणाने शक्य नसेल तर त्यांनी स्वदेशी कपडे वापरावे हा ठराव त्यांनी पास करून घेतला. हे त्यांचे महापालिकेचे शेवटचे योगदान. 26 ऑक्टोबर 1930 ला पोलीस कमिशनरचा हुकूम मोडून बाईंनी मुंबईच्या आझाद मैदानावर झेंडावंदन केले. या झेंडावंदनापूर्वी अवंतिकाबाई महिलांचा मोर्चा घेऊन मिरवणुकीने गेल्या. कृष्णाकुमारी सरदेसाई नावाच्या 13-14 वर्षांच्या परकरी मुलीच्या हातात झेंडा होता. पोलिसांनी तिच्या हातावर लाठ्या मारल्यामुळे ती खाली पडली. पण तिने झेंडा सोडला नाही. या स्त्रियांवर घोडेस्वार सोडल्यामुळे महिला पांगल्या. अवंतिकाबाईंना दुसऱ्या दिवशी पालिका सदनात अटक होऊन सहा महिन्यांची शिक्षा झाली व त्यांचे नगरसेविकापद रद्द झाले. क्लेटन म्युनिसिपल कमिशनर असताना आपल्या भाषणात एकदा म्हणाले की, या सभागृहातील अवंतिकाबाईंचा अपवाद सोडता प्रत्येक जण माझ्याकडे शिफारशीसाठी आला आहे. अवंतिकाबाईंमुळे सभागृहातील चर्चेचे वातावरण व पातळी उंच राहते. त्यांची कामावरील निष्ठा, प्रामाणिकपणा व विचारांची स्पष्टता वाखाणण्यासारखी आहे. त्या निरनिराळ्या कामात व्यग्र असूनही कधी सभागृहात गैरहजर नाहीत. निरनिराळ्या वॉर्डात फिरून जनतेच्या सोयी, गैरसोयीची त्या दखल घेऊन सभागृहात वाचा फोडत. बाईंचे महानगरपालिकेतील काम उत्तुंग होते. नंतरच्या नगरसेविकांत हे स्थान फक्त मृणाल गोरे मिळवू शकल्या. बाईंचे हे काम लक्षात घेऊनच त्यांच्या घरावरून जाणाऱ्या रस्त्याला 'अवंतिकाबाई गोखले रोड' हे नाव महानगरपालिकेने दिले.

1930 साली सविनय कायदेभंगाच्या वेळी 7 एप्रिल रोजी झालेल्या प्रचंड सभेत बाईंचे भाषण फारच प्रभावी झाले. त्यांनी महाराष्ट्रातील वीरवृत्तीला आवाहन करून सांगितले की, या आंदोलनात भाग घेऊन महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले पाहिजे. आपण गांधीजींच्या मागे उभे राहिले पाहिजे. विलायती वस्तुंवर बहिष्कार, दारूबंदी व आगामी कायदेमंडळाच्या निवडणुकीवर बहिष्कार घातला पाहिजे.

'युद्ध समिती' नावाची एक समिती सत्याग्रहाची योजना व अंमलबजावणी करण्यासाठी नेमली होती. या समितीच्या तेराव्या तुकडीच्या प्रमुख अवंतिकाबाई होत्या. पहिल्या बारा तुकड्या गजाआड गेल्या. बाईंचे पती बबनराव यांचे दोन्ही हात निकामी होते. त्यांचे सर्व काम करावे लागे. म्हणून बाईंना गांधीजींनी सत्याग्रह करण्याऐवजी बाहेर राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करावे, असे सुचविले. पण 'युद्ध समिती'च्या प्रमुखाने सत्याग्रह न करणे हे नैतिकतेला धरून होणार नाही, असे सांगून त्यांनी सत्याग्रह करायचे ठरवले. त्यापूर्वी जमलेल्या स्त्रियांनी आपल्या हातात झेंडे घेऊन उंच फडकावले म्हणून पोलिसांनी त्यांना पकडून भांडुपच्या जंगलात सोडले व अपमानास्पद वागणूक दिली. त्याचा निषेध

करणारे एक पत्रक 27 ऑक्टोबरला काढले. त्यांच्यावर या कृत्याबद्दल खटला होऊन सहा महिने कैद व 400 रुपये दंड झाला. 1932 साली त्यांना पुन्हा दोन महिने तुरुंगवास झाला.

पती बबनराव यांना 1933 साली हृदयविकाराचा झटका आला. गांधीजींनी बाईंना आपल्या अपंग व नाजूक हृदय झालेल्या पतीकडे संपूर्ण लक्ष देण्यास सांगितले. 1937 च्या प्रांतिक स्वायत्ततेच्या कायद्यानुसार होणाऱ्या निवडणुकीला उभे राहण्यासाठी सरोजिनीदेवींनी खूप पाठपुरावा केला. पण बाईंनी अपंग पतीसाठी घरी राहायचे ठरवले. 1940 किंवा 1942 च्या आंदोलनातही त्या भाग घेऊ शकल्या नाहीत. 1933 पासून स्वत:च्या मृत्यूपर्यंत त्यांचे विधायक कार्य चालूच राहिले. 1947 च्या आसपास त्यांना कर्करोग झाल्याचे कळले. त्याच वेळी स्वातंत्र्य मिळाले. गांधीजींना पट्टशिष्येच्या या आजाराचे अतीव दु:ख झाले. त्यांनी बाईंना उल्हासित करणारे एक पत्र लिहिले. हे पत्र गांधीजींनी अवंतिकाबाईंना लिहिलेले शेवटचे पत्र.

30 जानेवारी 1948 ला गांधीजींची नथुराम गोडसेने हत्या केली. त्याचा धक्का अवंतिकाबाईंना बसला. त्यांना भास होऊ लागले. 'बापू मला बोलावीत आहेत, तुम्हीही चला', असे त्या बबनरावांना सांगू लागल्या. गांधीजींपाठोपाठ सव्वा वर्षांनी त्यांच्या या पहिल्या भारतीय शिष्येने 26 मार्च 1949 ला मुंबईत राहत्या घरी देह ठेवला. एक नि:स्पृह, स्पष्टवक्ती, अनुशासनप्रिय कार्यकर्ती म्हणून स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात त्यांना मानाचे स्थान आहे.

■■

## पद्मावतीबाई हरोलीकर (1892-1989)

पद्मावतीबाई शंभर वर्षांच्या इतिहासाच्या साक्षीदार होत्या. महात्मा गांधींच्या पहिल्याच भाषणाने प्रभावित होऊन त्यांनी स्वत:ला स्वातंत्र्य चळवळीत झोकून दिले होते. व्यंकटेश हरोलीकर या स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्त्याला महारोग झाल्यानंतर त्यांची सेवा करताना लोकांनी नावं ठेवू नयेत म्हणून त्यांच्याशी लग्न करणाऱ्या, 'तरुणांनो, खेड्याकडे चला' हा गांधीजींचा आदेश प्रत्यक्षात आणणाऱ्या, सामान्य स्त्रीला चळवळीत आणण्यासाठी 'राष्ट्रीय युवती संघ' स्थापन करणाऱ्या, 1940 मध्ये वैयक्तिक सत्याग्रहात 'महाराष्ट्रातील पहिली सत्याग्रही' म्हणून निवड झालेल्या, तत्त्वनिष्ठ स्वातंत्र्यसैनिक पद्मावतीबाई हरोलीकर या तेजस्वी शलाकेविषयी...

पुण्यात भिकारदास मारुतीजवळ राहणाऱ्या पद्मावतीबाई हरोलीकर यांना त्यांची मुलाखत घेण्यासाठी भेटले, ते साल होते 1976. माझ्या भेटीचे कारण कळल्यावर त्या म्हणाल्या, ''मुली, आलीच आहेस तर एक कप चहा पी आणि जा. मी कोणाला मुलाखत देत नाही. मी महात्मा गांधीवादी आहे. आणीबाणीवाली गांधीवादी नाही. मुलाखत मिळणार

नाही.'' मी म्हटले, ''मी स्वातंत्र्यसैनिक उषा मेहता यांची विद्यार्थिनी आहे. गांधीजी माझेही दैवत आहेत. तुम्ही मुलाखत दिल्याशिवाय मी इथून हलणार नाही. तुम्ही इंग्रजांसमोर सत्याग्रह केला, मी तुमच्यासमोर करते.'' सकाळी 10 ते 1 मी हातातले पुस्तक वाचत होते व त्या 85 वर्षांच्या बाई व घरातली माणसे आपापली कामे करत होती. दुपारी एकनंतर त्यांची जेवायची वेळ झाली. ''तू घरी जा'', त्यांनी पुन्हा सांगितले; पण मी हलले नाही. ज्या अर्थी मुलाखत देण्याचे ही आजी नाकारते त्या अर्थी ती अत्यंत तत्त्वनिष्ठ व ध्येयनिष्ठ असली पाहिजे ही माझी खात्री झाली. मी स्वातंत्र्यसैनिकांच्या कोशातून त्यांचे नाव निवडले होते. तिथे 5-6 ओळीत त्यांची माहिती होती. शेवटी त्यांनीच माघार पत्करत ''हे दोन आंबे खा व बोल बये, विचार काय ते?'', म्हणत मुलाखतीला सुरुवात केली आणि ती अपूर्व मुलाखत रंगली दुपारी साडेचार-पाचपर्यंत. हे सगळे लिहिण्याचे कारण म्हणजे गांधीवादी स्वातंत्र्यसैनिकांचे स्वभाववैशिष्ट्य वाचकांसमोर यावे.

मुंबईत टिळकभक्त पित्रे कुटुंबात पद्मावतीबाईंचा जन्म 1892 साली झाला. रमा त्रिंबक पित्रे अकरा वर्षांची झाल्यावर तिचे लग्न पुण्याच्या प्रसिद्ध कुवळेकर घराण्यातील मुलाशी झाले. दुर्दैवाने सत्यभामा नावाने कुवळेकर कुटुंबात आलेल्या या रमा पित्रेला वैधव्य आले. कुवळेकरांचे दोन्ही मुलगे गेल्यामुळे ते निराश झाले. ते नवमतवादी होते. आपल्या मोठ्या सुनेला सोवळी होण्यापासून परावृत्त करण्याचे त्यांचे प्रयत्न व्यर्थ झाले. आता सत्यभामेला रमाबाई रानडेंच्या सेवासदनात पाठवून शिकवायचेच, असे त्यांनी ठरवले. केशवपन सोडाच, पण विधवेला दागिने वापरण्याचा अधिकार नाकारणाऱ्या त्या समाजात त्यांनी आपल्या सुनेला रोज वापरत असलेले सर्व दागिने वापरण्याची उलट सक्ती केली. रमा ऊर्फ सत्यभामा केतकी रंगाची, तेजस्वी व करारी डोळ्यांची व धारदार नाकाची सुंदर मुलगी होती. 85 वर्षांच्या तेजस्वी पद्माबाई त्यांच्या तरुणपणाच्या सौंदर्याची साक्ष देत होत्या. सत्यभामा सेवासदनमध्ये इंग्रजी 6 वीत शिकत असताना महात्मा गांधींनी पुण्याला भेट दिली. 1920 साली किर्लोस्कर नाट्यगृहात झालेल्या गांधीजींच्या सभेला



*गांधींच्या सभेला मोठ्या प्रमाणात महिलांची उपस्थिती*

सत्यभामाबाई सेवासदनमधील मैत्रिणींबरोबर गेल्या होत्या. त्या सभेत जमलेल्या स्त्रियांकडे वळून गांधीजी म्हणाले, ''माझ्या सत्य व अहिंसेवर आधारलेल्या या लढ्यात भाग घेण्यास तुम्ही समर्थ आहात. यासाठी स्त्री वर्गात जागृती करण्याची शिकस्त करा.'' महात्माजींच्या या भाषणाचा सत्यभामाबाईंवर फारच खोल परिणाम झाला. सभा संपल्यावर आपल्या अंगावरचे दागिने उतरवून त्यांनी गांधीजींच्या हातात दिले. ''स्त्रीचे सौंदर्य दागिन्यात नसून तिच्या सुदृढ प्रकृतीत, करारी चेहऱ्यावर व कर्तव्यनिष्ठेत आहे'', हे गांधीजींचे विधान पटले असून आपण यापुढे दागिन्यांचा स्पर्शही शरीराला होऊ देणार नाही अशी शपथ घेतली व ती आजन्म पाळली.

महात्मा गांधींच्या भेटीनंतर त्यांनी हळूहळू गांधीप्रणीत विधायक कार्यक्रमात भाग घ्यायला सुरुवात केली. सेवासदनच्या शिक्षणात प्राथमिक परिचारिका शिक्षणही त्यांना मिळाले होते, त्याचा त्या उपयोग करत असत. त्यांनी डॉ. इंदुमती नाईक यांच्या सूतकताई वर्गात सूतकताईचे शिक्षण घेतले. आनंदीबाई जोगळेकर नावाच्या बाईंना बरोबर घेऊन सूत कमिटी स्थापन केली. त्यात शेकडो बायका सहभागी झाल्या. त्यांना सूत विकून किंवा त्याची खादी विणून कमाई करता येई. खादी प्रदर्शनात पुणे सूत कमिटीच्या सुताला पहिला नंबर मिळाला. या शंभरनंबरी सुताचे नऊवारी विणलेले लुगडे बालगंधर्वांनी स्वत:साठी विकत घेतले होते. 'मानापमान' नाटकातील गरीब वेशातील 'भामिनी'ची भूमिका करताना अनेकदा तेच लुगडे गंधर्व नेसत, असे जुनी मंडळी सांगत. सत्यभामाबाई सूतकताई कामात पूर्ण बुडून गेल्या होत्या.

1927 साली देशभक्त शंकरराव देव यांनी 'स्वराज्य' नावाचे वृत्तपत्र सुरू केले. शंकरराव स्वत: संपादक होते. मुद्रक व प्रकाशक व्यंकटेश हरोलीकर होते. त्यामधील 'निदान धर्मयुद्ध करा' या अग्रलेखावर एक संस्कृत वचन छापले होते. 'मी तुमचा रक्षणकर्ता आहे, असे सांगून जो राजा रक्षण करत नाही त्याला, पिसाळल्यामुळे अंगावर धावून येणाऱ्या कुत्र्याप्रमाणे ठार मारावे,' असा त्या वचनाचा भावार्थ होता. भारतीय दंड संहितेच्या 121 व 124 या कलमान्वये त्यांच्यावर राजद्रोहाच्या व खुनाला प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली खटला चालला. दोघांनीही वकील न देता न्यायालयात आपले लिखित निवेदन वाचून दाखवले. 1928 साली दोघांनाही दोन दोन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा झाली. तुरुंगात हरोलीकरांना कुष्ठरोग झाल्याचे आढळले. तुरुंगात योग्य ती मदत न मिळाल्यामुळे त्यांचा आजार बळावला. त्यानंतर त्यांना शिक्षा पूर्ण होण्याआधीच सोडून दिले. व्यंकटेशराव एकटेच राहत. नशिबाने एका वाड्यात एक खोली त्यांना भाड्याने मिळाली, कारण त्या काळात राजद्रोही कार्यकर्त्यांसारखे जळते निखारे घरात ठेवून घेणारा महाभाग मालक मिळणे विरळाच होते.

सत्यभामाबाईंना व्यंकटेशरावांच्या सुटकेबद्दल व आजारीपणाबद्दल काँग्रेस कमिटीत कळले. त्या त्यांना भेटायला गेल्या. व्यंकटेशराव हरोलीकर जखमा झालेले हातपाय स्वत:च साफ करून मलमपट्टी करत. स्वत: स्वयंपाकपाणी, केरवारे, स्वत:ची भांडीधुणी

स्वत: करत. सत्यभामाबाईंचे परिचारिकेचे जुजबी शिक्षण झाले होते. त्या रोज जाऊन व्यंकटेशरावांची सर्व कामे व शुश्रूषा करू लागल्या. सर्व वाडा कधी कुजबुज करून, तर कधी टोमणे मारून व्यंकटेशरावांना सतावू लागला. आठ-दहा दिवस हा प्रकार पाहून व्यंकटेशरावांनी सत्यभामाबाईंना म्हटले, ''आपण माझी सेवा केली याबद्दल मी आभारी आहे. आपण एक कुलीन विधवा आहात. आपले माझे नातेगोते नाही. अशा परिस्थितीत आपण माझी सेवा करता यामुळे आपली बदनामी होत आहे. माझ्या बदनामीला मी घाबरत नाही. तरी कृपा करून आपण उद्यापासून येऊ नये.'' दुसरे दिवशीही बाई परत आलेली पाहून हरोलीकर पुन्हा आपले म्हणणे मांडू लागले. सत्यभामाबाई म्हणाल्या, ''समजा, मी तुमची नातेवाईक असते, तर तुम्ही मला तुमचे काम करायला परवानगी दिली असती का?'' त्यांचे होकारार्थी उत्तर आल्यावर त्या म्हणाल्या, ''इतकीच अडचण असली तर तुमच्याशी लग्न करून नाते जोडायला मी तयार आहे. तुमच्यासारखा देशभक्त आणखी काही वर्ष माझ्यामुळे जगला व देशकार्य करू शकला तर त्यासारखे पुण्य काम दुसरे नाही. तेव्हा आता निदान तुमच्याशी लग्न करायला मला परवानगी द्या. माझ्या स्वत:च्या वैयक्तिक फायद्यासाठी मला संसार मांडायचा असता, तर माझ्या सासऱ्यांच्या इच्छेलाच मी मान दिला असता. तुम्ही देशाचा संसार मांडला आहे. त्यासाठी तुम्ही जगणे भाग आहे व म्हणूनच तुम्हाला जगविणे माझे कर्तव्य आहे.'' निरुत्तर झालेल्या हरोलीकरांनी सत्यभामेच्या सासऱ्यांच्या संमतीने तिच्याशी विवाह केला व सत्यभामाबाईंनी पद्मावती व्यंकटेश हरोलीकर या नावाने संसार सुरू केला. व्यंकटेशरावांना परिश्रमपूर्वक बरे केले. पुढे दोघांनी मिळून सुमारे पंधरा वर्षे चळवळीला पूर्ण वाहून घेतले. विधायक कार्यक्रम राबवला व ग्रामसुधारणेचे काम केले.

1930 मध्ये संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव सभेत वाचल्याबद्दल बाईंना दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. सुटून आल्यावर त्यांनी 'तरुणांनो, खेड्याकडे चला' या गांधीजींच्या आदेशाप्रमाणे खेड्यात जाऊन काम करायचे ठरवले. त्यासाठी त्यांनी सोलापूर जिल्ह्यातली सांगोला तालुक्यातली एखडपूर, मंगेवाडी ही खेडी निवडली. सांगोला तालुका तर कायमच दुष्काळी तालुका म्हणून नोंद होती. ग्रामसुधारणेचे काम सामान्य खेड्यापेक्षा दुष्काळी खेड्यात करणे अधिक जरुरीचे होते, तसेच अधिक मेहनतीचेही होते. सरळसोट काम कोणीही करेल. गांधीजींनी जो आदेश दिला होता तो शहराजवळची सुधारणेची वाट चटकन पकडू शकतील अशा खेड्यांपेक्षा दूरवर पसरलेल्या खेड्यातच समाज, स्वातंत्र्य, अहिंसा इत्यादी विचार पोहोचणे जरुरीचे होते. ग्रामविकास म्हणजे फक्त रस्ते, पाणी, शाळा, वीज अशा सुधारणा गावात होणे, असा मर्यादित अर्थ नाही. एक सुदृढ, समंजस, देशप्रेमी समाज बनवणे हे अधिक महत्त्वाचे होते. प्रत्येक गाव स्वावलंबी होणे इत्यादी गोष्टी ग्रामसुधारमध्ये अध्याहृत होत्या. हरोलीकर दांपत्याने एखडपूर व मंगेवाडी ही दोन्ही खेडी त्याच धर्तीवर बनवण्याचा सफल प्रयत्न केला. सामान्य स्त्रीला या चळवळीत ओढण्यासाठी त्यांनी 'राष्ट्रीय युवती संघ' स्थापन केला

होता. या युवती संघाच्या स्वयंसेविका नित्यनियमाने सूतकताई करत व निदर्शने, प्रभातफेऱ्या, व्याख्याने घडवून आणणे इत्यादी विधायक कार्यात भाग घेत.

1937 पासून व्यंकटेशरावांची प्रकृती खालावत गेली. ते अंथरुणाला खिळून होते. त्याचा परिणाम पद्मावतीबाईंच्या कामावर होणे साहजिकच होते. 1937 साली प्रांतिक स्वायत्तता कायद्यानुसार पद्मावतीबाईंना स्त्रियांसाठी राखीव जागा असलेल्या मतदारसंघाने उमेदवारी द्यावी, असे अनेक कार्यकर्त्यांनी प्रांतिक व मध्यवर्ती काँग्रेसला सुचवले; पण ही सूचना दोन्ही पातळ्यांवर फेटाळली गेली. ज्या बाईने अत्यंत निष्ठेने काँग्रेसच्या चळवळीत झोकून दिले, तिला नेत्यांनी अशी वागणूक द्यावी याचे आज आश्चर्य वाटत नाही, कारण आज तो नियमच झाला आहे. हरोलीकर दाम्पत्यासही त्याचे विशेष वाईट वाटले नाही, कारण 1920 ची काँग्रेस व 1932 ची काँग्रेस यात फारच मोठा फरक पडला होता. हळूहळू त्यात स्वत:चे महत्त्व वाढवून घेणारे व आपला स्वार्थ साधणारे लोक काँग्रेसचे दिखाऊ सभासद होत गेले व अशांचीच संख्या वाढू लागली ती आजपर्यंत. 1939 साली व्यंकटेश हरोलीकर यांचा मृत्यू झाला व पद्मावतीबाईंच्या नशिबी दुसऱ्यांदा वैधव्य आले.

पद्मावतीबाई 1921–22 साली महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या सभासद व 1923–24 साली अखिल भारतीय काँग्रेसच्या कमिटीवर निवडून गेल्या होत्या. 1930 ते 32 दोन वर्षे त्यांना कारावास घडला. 1940 मध्ये वैयक्तिक सत्याग्रहात त्यांची ‘महाराष्ट्रातील पहिली सत्याग्रही’ म्हणून निवड झाली होती. त्या सत्याग्रहात त्यांना तीन महिन्यांचा तुरुंगवास सोसावा लागला. 1942 च्या ‘चले जाव’च्या चळवळीत त्यांना दहा महिने स्थानबद्ध केले होते.

1944 पासून त्या परत सोलापूर जिल्ह्यात काँग्रेसचा कार्यक्रम राबवत होत्या. 1946 ते 1948 पर्यंत सोलापूर नगर परिषदेच्या शिक्षण समितीच्या अध्यक्ष म्हणून त्यांची कामगिरी लक्षणीय होती. स्वातंत्र्यानंतर त्या सर्वोदय गटाबरोबर काम करू लागल्या. सर्वोदयच्या माध्यमातून मुळशी तालुक्यातील शिंदेवाडी गाव सुधारण्यासाठी त्यांनी अविश्रांत काम केले. जयसिंगपूर व कोल्हापूर येथेही गांधीजींच्या विधायक कार्याचा प्रचार त्यांनी केला. वयाची 61 वर्षे झाल्यावर प्रकृतीची अस्वस्थता जाणवू लागली. विधायक कार्यासाठी लागणारे श्रम वयपरत्वे झेपेनासे झाले. त्यामुळे त्यांच्या कामाचा आवाका एकदम संकुचित झाला व ते साहजिकच होते.

1939 साली बाळासाहेब खेर मुख्यमंत्री असताना पद्मावतीबाईंना शोकसांत्वनाकरिता भेटायला गेले होते. हरोलीकरांची सर्व संपत्ती इंग्रजांनी जप्त केली होती. ती परत मिळवण्यासाठी सरकारकडे अर्ज केल्यास त्यांना परत मिळू शकेल म्हणून तातडीने तसा अर्ज करण्याची विनंती त्यांनी पद्मावतीबाईंना केली. “आर्थिक बाबतीत कुणाकडे हात पसरून माझ्या पतीने उच्च ध्येयाने प्रेरित होऊन केलेल्या त्यागाला मी कमीपणा आणणार नाही”, असे बाणेदार उत्तर त्यांनी दिले.

पद्मावतीबाई शतायुषी होत्या. त्यांनी स्वातंत्र्याची 40-42 वर्षे पाहिली. ‘चले जाव’ची

सुवर्णजयंतीही पाहिली व त्यानंतर एक महिन्यातच त्यांचे निधन झाले. स्वातंत्र्यसैनिकांची कोणतीही मानपत्रे त्यांनी स्वीकारली नाहीत. मानधनासाठी अर्जही केला नाही. आपल्या कामाची पैशात किंमत करणे त्यांना मंजूर नव्हते. पद्मावतीबाई शंभर वर्षांच्या इतिहासाच्या साक्षीदार होत्या. आणीबाणीपासून त्यांचे मन राजकारणाला पूर्ण विटले. आपल्या सभोवतालच्या कार्यकर्त्यांच्या मुलाबाळांची आईवडिलांच्या ध्येयासाठी झालेली होरपळ त्यांना खिन्न करी. गांधीजींची उच्च तत्त्वे त्यांच्याच चेल्यांनी धुळीला मिळवली, मग तरुण पाहणार तरी कुणीकडे, हा त्यांनी मला विचारलेला प्रश्न आजही कानात घुमतो आहे.

■ ■

## महाराष्ट्राच्या ठक्करबाप्पा जानकीबाई आपटे (मृत्यू: 1962)



जानकीबाई परशुराम आपटे चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण. समाजकार्यात पडण्यापूर्वी घरात भरपूर सोवळेओवळे असे. अशा जानकीबाई आपल्या मुलांच्या पंक्तीला हरिजन मुलांना जेवू घालू लागल्या. त्यांचे उष्टे, खरकटे व भांडी घासणे हेही रोजच्या कामाबरोबर करू लागल्या. त्यांनी 'हिंद सेविका संघाची' स्थापना केली. त्यात हरिजन स्त्रियांना सहभागी करून घेऊ लागल्या. हळदी-कुंकवाच्या वेळी त्यांनी यावं म्हणून स्वत: घरोघरी जाऊन हरिजन स्त्रियांना आमंत्रण देऊ लागल्या. 1938 सालापासून त्या हरिजन वस्तीत जाऊन मुलींच्या डोक्यातील उवा काढणे, मुलांना आंघोळ घालणे, बायकांना स्वच्छतेचे महत्त्व सांगणे, साक्षरता प्रसार करणे इत्यादी कामे करत. दलितोद्धाराचे काम पाहून लोकच त्यांना 'महाराष्ट्राच्या ठक्करबाप्पा' म्हणू लागले. त्यांच्याविषयी…

अंबू वासुदेव दाते. चार वर्षांची असतानाच वडील गेले. वयाच्या अकराव्या वर्षी मामांनी तिचे लग्न लावून दिले. वर होता सत्तावीस वर्षांचा एक शिक्षक. लग्न झाल्यावर जानकी आपटे या नव्या नावाने, नव्या कुटुंबात व नव्या गावात अंबू दातेने प्रवेश केला. अंबू ऊर्फ जानकी या गावाचे नाव स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात कोरेल, असे कोणी भविष्य सांगितले असते, तर त्याला वेड्यातच काढले असते. पण जानकीने, एका अशिक्षित, गरीब बाईने ते घडविले.

जानकीबाईंचे मामा गोविंदराव टिळक हे टिळकभक्त होते. लोकमान्य सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असले तर गोविंदराव टिळकांच्या घरीच उतरत. वडील गेल्यावर जानकीबाई मामाकडेच आईबरोबर राहू लागल्या. मामाचे घर देशभक्तीने भारलेले. त्यांच्या

बालमनावर खोल कुठे तरी देशभक्तीचे संस्कार होत गेले. अकराव्या वर्षी लग्न झालेली अंबू ऊर्फ जानकी परशुरामपंत आपट्यांची गृहिणी म्हणून अहमदनगरच्या बिऱ्हाडी आली. अहमदनगरचे हरिभाऊ पटवर्धन वकील हे परशुरामांचे मावसभाऊ. त्यांनी आपल्या वाड्याच्या मागच्या बाजूला असलेले दोन खोल्यांचे, पण स्वतंत्र घर आपट्यांच्या बिऱ्हाडासाठी दिले होते.

जानकीबाई बिऱ्हाडात आल्या, तेव्हा त्यांना अक्षरओळखही नव्हती. घरात दुसरे कोणीच नव्हते. जानकीबाई बघून बघून व इतर बायकांना विचारून सर्व शिकल्या. त्यांनी जुजबी शिवणकला शिकून घेतली. लहान मुलांचे त्या कपडे शिवून देत. घरातच एक शिवणवर्ग सुरू केला. हातमागाच्या नगरी साड्या मागावरून आणून घरातच लुगडी, खण व चिटे (प्रिंटेड क्लॉथ) विकू लागल्या. शिक्षकाच्या तुटपुंज्या पगारात सात मुलांचे पालनपोषण करण्यास या अशिक्षित महिलेने असा हातभार लावला. अशा या जानकीबाईंच्या आयुष्याला कलाटणी मिळण्यास कारण झाले, ते एका महिला नेत्याचे भाषण!

1930 साली मिठाच्या सत्याग्रहाच्या प्रचारार्थ अहमदनगरला गेलेल्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या कमलादेवी चट्टोपाध्याय यांचे भाषण ऐकून जानकीबाई अस्वस्थ झाल्या होत्या. सभेनंतर बेकायदेशीर मिठाची विक्री झाली. कमलादेवींच्या चळवळीला हातभार लावण्याच्या दृष्टीने स्त्रियांची संघटना बांधणे आवश्यक आहे, असे त्यांच्या मनाने घेतले. नगरचे काँग्रेस कार्यकर्ते काकासाहेब गरुड यांच्या सहकार्याने त्यांनी ‘हिंद सेविका संघाची’ स्थापना केली. महिलांमध्ये देशप्रेम व पारतंत्र्याविरुद्ध आवाज उठवण्यासाठी त्या राष्ट्रीय कार्यक्रमांचे नियोजन करू लागल्या. परिणामी मध्यमवर्गीय स्त्रिया धीटपणे प्रभातफेऱ्या, निदर्शने, सभांना हजर राहणे या कामांत पुढे येऊ लागल्या. 1936 साली फैजपूर काँग्रेसच्या अधिवेशनास स्वत:चे स्वयंसेविका पथक तयार करून घेऊन जानकीबाई गेल्या होत्या. हे पथक बनवण्यासाठी रावसाहेब पटवर्धन यांनी त्यांना मार्गदर्शन केले होते. फैजपूरमध्ये दहा दिवस कार्यकर्त्यांची व्यवस्था पाहणे, नेत्यांच्या तंबूबाहेर पहारा देणे अशी महत्त्वाची कामे या स्वयंसेविकांनी पार पाडली. त्यांची शिस्त व नेटकेपणा याबद्दल पंडित नेहरूंसह सर्व नेत्यांनी जानकीबाईंच्या नेतृत्वाची व पथकाच्या शिस्तीची प्रशंसा केली. जानकीबाईंच्या संघटनामुळे नगर व आसपासच्या स्त्रिया आपोआप काँग्रेसमध्ये येऊ लागल्या. परिणामी 1937 च्या प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ खूप स्त्रिया पुढे आल्या.

1938–39 मध्ये जानकीबाईंची काँग्रेस कमिटीच्या शहर अध्यक्षपदी निवड झाली. जानकीबाईंनी अध्यक्ष म्हणून एका पत्रकाद्वारे गुढीपाडव्याला गुढीबरोबरच तिरंगी झेंडा लावण्याचे आवाहन केले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत ही प्रथा चालू राहिली. 1940 मध्ये वैयक्तिक सत्याग्रहात रावसाहेब पटवर्धन यांना अटक झाली. या अटकेच्या निषेधार्थ झालेल्या सभेत जानकीबाईंचे भाषण फारच प्रभावी झाले. ब्रिटिश

सरकारच्या अरेरावी धोरणास शह देण्यासाठी त्यांनी महिलांना स्वयंपाकाचा मसाला लवंग न वापरता करावा असे पत्रक काढले. अशा गोष्टी दिसायला अगदी नगण्य वाटल्या, तरी हे करून आपणही काही करू शकतो, असा आत्मविश्वास स्त्रियांच्या ठायी उत्पन्न होण्यास निश्चित मदत झाली.

1940 पासून जानकीबाईंचे राजकीय क्षेत्र खूप विस्तृत झाले. त्या सर्व नगर जिल्ह्यात फिरून भाषणे देत. रूढार्थाने त्यांचे शिक्षण झाले नव्हते, पण त्या भाषण करताना समर्थक म्हणी व उदाहरणे देऊन सोप्या भाषेत बोलत. सामान्य माणसाच्या थेट हृदयास हात घालण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषणात होते. 1940 च्या वैयक्तिक सत्याग्रहात कोणी भाग घ्यायचा याची यादी ठरली होती. अच्युतराव पटवर्धन हे सत्याग्रह समितीचे अध्यक्ष होते. त्यांना अटक होऊन 15 महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाल्यामुळे त्या जागेवर जानकीबाई आपटे यांची नेमणूक झाली. हा जानकीबाईंचा फार मोठा बहुमान होता. डिसेंबर 1940 नंतर जानकीबाईंची निवड सत्याग्रहासाठी झाली. त्यांच्याबरोबर त्यांच्या सहकारी फातिमा शेख व ख्रिस्ती ताराबाई राठोड होत्या. 6 जानेवारी 1941 रोजी या तिघींनी सत्याग्रह करून मोर्चा काढला. त्यात हजारो लोक सामील झाले. युद्धविरोधी घोषणांनी नगर शहर दुमदुमले. या सत्याग्रहात दंड भरण्याचे कबूल न केल्यामुळे त्यांना तीन महिन्यांची साधी कैद झाली. तुरुंगात असताना गांधीजींनी आदेश दिलेला राष्ट्रीय सप्ताह जानकीबाईंनी वेगळ्या पद्धतीने साजरा केला. गुन्हेगार बायकांच्या बराकीत त्यांची लहान मुलेही होती. त्यांच्या अंगावर कपडे नव्हते. आपल्याबरोबर असलेल्या कार्यकर्त्या स्त्रियांच्या खादी साड्या कापून त्यांनी या मुलांना कपडे शिवले. त्यांना स्वच्छ का आणि कसे ठेवले पाहिजे, हे ही त्या स्त्रियांना समजावून सांगितले. त्यांना घेऊन रोज प्रार्थना म्हटली. या सर्वाचा परिणाम गुन्हेगार स्त्रियांवर झाला नसता तरच नवल. तुरुंगातून सुटल्यावर अनेक स्त्रियांना त्यांनी सत्याग्रहासाठी तयार केले. यानंतर त्यांच्या छोट्या दोन खोल्यांच्या घराला पक्ष कचेरीचेच स्वरूप आले. थेट रावसाहेब अगर अच्युतराव पटवर्धनांकडे जाण्याऐवजी आता लोक जानकीबाईंना प्रथम भेटत.

16 ऑगस्ट 1942 ला त्यांना येरवडा जेलमध्ये पाठवण्यात आले. येरवड्यातून त्यांना कर्नाटकातील हिंडला जेलमध्ये हलवले. तिथे त्यांना रक्तदाबाचा तीव्रतेने त्रास होऊ लागला. आजार बळावत गेला. त्यांनी पॅरोलवर सशर्त सुटका करून घ्यावी, असा आग्रह अधिकारी धरू लागले. जानकीबाईंसारखी कणखर सत्याग्रही सशर्त सुटकेला होकार देणे कालत्रयी शक्य नव्हते. शेवटी सरकारच नमले व त्यांची बिनशर्त मुक्तता झाली. त्यावेळी जानकीबाईंच्या दोन्ही मुली व सूनबाईही जेलमध्ये होत्या.

जानकीबाईंनी आपल्या कामाला सामाजिक कार्याच्या माध्यमातून सुरुवात केली होती. उच्च रक्तदाबासारखा गंभीर आजार जेलमध्ये झाल्यामुळे राजकीय कामात जी पळापळ व श्रम होतात ते होईनासे झाले. स्वातंत्र्य मिळाल्यावर त्यांनी पुन्हा विधायक कार्यालाच वाहून घ्यायचे ठरवले. 1935 साली महात्मा गांधींनी हरिजन कार्याला चालना

देण्यासाठी देशभर दौरा केला. त्यात नगरलाही त्यांनी भेट दिली. गांधीजींच्या भाषणाने प्रभावित होऊन त्यांनी हे काम आपल्या घरापासूनच करावयाचे ठरवले. जानकीबाई चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण. समाजकार्यात पडण्यापूर्वी घरात भरपूर सोवळेओवळे असे. अशा जानकीबाई आपल्या मुलांच्या पंक्तीला हरिजन मुलांना जेवू घालू लागल्या. त्यांचे उष्टे, खरकटे व भांडी घासणे हेही रोजच्या कामाबरोबर करू लागल्या. त्यांच्या हिंद सेविका संघात हरिजन स्त्रियांना सहभागी करून घेऊ लागल्या. हळदी-कुंकवाच्या वेळी त्यांनी यावं म्हणून स्वत: घरोघरी जाऊन हरिजन बायकांना आमंत्रण देऊ लागल्या.

जानकीबाई व त्यांच्या सहकारी मथुराबाई चांदकर या दोघीही ब्राह्मण कुटुंबातील बायका. 1938 सालापासून त्या हरिजन वस्तीत जाऊन मुलींच्या डोक्यातील उवा काढणे, मुलांना आंघोळ घालणे, बायकांना स्वच्छतेचे महत्त्व सांगणे, साक्षरता प्रसार करणे इत्यादी कामे करत. वस्तीतील चावडी रहिवाशांच्याच साहाय्याने दुरुस्त करून जानकीबाईंनी तिथे तिसरीपर्यंतची प्राथमिक शाळा सुरू केली. अखिल भारतीय हरिजन सेवा संघाचे सचिव पूज्य ठक्करबाप्पा नगरच्या मुक्कामात मुद्दाम जाऊन त्यांचे काम पाहून आले. जानकीबाईंची जिद्द पाहून ते थक्क झाले. ग्रामीण भागातील हरिजन मुलींसाठी वसतिगृह असेल, तरच त्या शिकू शकतील, असे ठक्करबाबा म्हणाले. जानकीबाईंनी त्यांचा हा विचार आव्हान म्हणून स्वीकारला व त्यातूनच जून 1943 मध्ये बालिकाश्रमाची स्थापना झाली. ठक्करबाबांनी स्वत: या वसतिगृहाचे उद्घाटन केले होते. बालिकाश्रमाला न्या. छागला, साने गुरुजी, इंदिरा गांधी व बालगंधर्व अशा मान्यवरांनी आवर्जून भेट दिली होती. या सर्वांनीच जानकीबाईंबद्दल व त्यांच्या कार्याबद्दल प्रशंसोद्गार काढले होते.

अस्पृश्योद्धारातील जानकीबाईंचे आणखी एक महत्त्वाचे काम म्हणजे त्यांनी सफाई कामगारांना योग्य वेतन मिळावे व त्यांच्यावरील अन्याय दूर व्हावे म्हणून केलेला संघर्ष. हरिजन वस्तीत जात असल्यामुळे भंगी, झाडूवाले यांच्याशी त्यांचा संबंध आला. त्यांनी त्यांची संघटना बांधली व त्यांच्या संघटनेचे अध्यक्षपदही भूषवले.

जानकीबाई नेहमी दलित व स्त्रिया यांच्या विचाराने झपाटलेल्या असत. एकदा शेवगावला त्या सभेला गेल्या असता 11 वर्षांची सासरच्या जाचाला कंटाळलेली व माहेरला मुकलेली शांता नावाची एक दलित मुलगी त्यांना भेटली. मागचापुढचा काहीही विचार न करता जानकीबाई शांताला आपल्या घरी घेऊन आल्या. त्या मुलीला एक चित्पावन बाई आपल्या मुलीसारखे वाढवते आहे हे पाहून समाजाने आपटे कुटुंबावर सामाजिक बहिष्कार घातला. जानकीबाई मात्र आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या. शांताचे स्वतःच्या मुलीप्रमाणे पालनपोषण, शिक्षण केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर शांतानेही आयुष्यभर आश्रमाची पर्यवेक्षक म्हणून काम केले. शांताने आपले सर्व आयुष्य बालिकाश्रमासाठी वेचले. या तिच्या कामाबद्दल महाराष्ट्र शासनाचा ‘दलितमित्र’ हा पुरस्कारही तिला मिळाला.

अहमदनगरमध्ये उच्चभ्रू स्त्रियांचा लेडीज क्लब होता, पण त्यात कनिष्ठ व

मध्यमवर्गातील स्त्रिया जाऊ शकत नसत. त्यांनाही एकत्र येण्याची गरज होती. अशा स्त्रियांना एकत्र येण्यासाठी त्यांनी माता-बालक मंदिराची स्थापना केली. रावसाहेब पटवर्धनांनी आपल्या घरच्या तबेल्यात मंदिराला जागा दिली. तबेल्याच्या शेजारी एक पटांगण नगरपालिकेच्या मालकीचे होते. हे पटांगण नगरपालिकेकडून जानकीबाईंनी मिळवले. या पटांगणाला कंपाऊंड घालून बंदिस्त करणे हे स्त्रिया व मुलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक होते. यासाठी येणाऱ्या खर्चाची उभारणी बायकांनी स्वतःच करावी, असे जानकीबाईंना वाटले. त्यांनी बायकांना एक कल्पना सुचवली, 'संक्रांत जवळ येत आहे. तुम्ही हळदी-कुंकू करून वाणे वाटता. हा खर्च जो तुम्हाला शक्य आहे तो तुम्हा सर्व जणींचा एकत्र केला, तर आपल्याला कंपाऊंडसाठी कोणाकडे हातच पसरावा लागणार नाही.' जानकीबाईंनी घरोघरी जाऊन ही कल्पना पटवली व त्या जमलेल्या पैशातून स्त्रिया व मुलांसाठी बंदिस्त जागा तयार झाली.

1936 मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेची वर्गणी फक्त 4 आणे महिना होती. या संस्थेतर्फे तिकीट लावून नाटके केली. पुरुषांच्या भूमिका स्त्रियाच करत. नगर शहरालाच नव्हे, तर महाराष्ट्रातही ही कल्पना नवीन होती. श्रावण महिन्यातील पिठोरी अमावस्येला 'मातृदिन' म्हणतात. दलित महिलांना व मुलांना मातृदिनादिवशी शाळेच्या मैदानावर बोलावून त्यांना गहू, गूळ व खाऊ वाटण्याची प्रथा सुरू केली. गोरगरिबांना गणपतीत गोडधोड खायला जमत नाही. या प्रथेमुळे दलित महिलांना आपल्याही घरात गणपतीचे गोडधोड करता येऊ लागले. दुसरे म्हणजे मध्यमवर्गीय स्त्रिया आपल्यापेक्षा कनिष्ठ दलित भगिनींशी संपर्क ठेवण्याची इच्छा धरू लागल्या. ही प्रथा आजही चालू आहे, असे समजते.

दलितांशी जवळीक साधून समाजाला जानकीबाईंनी जसा धक्का दिला तसाच एका सोवळ्या झालेल्या बालविधवेची जबाबदारी घेऊन तिचा पुनर्विवाह करूनही धक्का दिला. माया नावाची सोवळी बालविधवा जानकीबाईंच्या शिवणवर्गाला येत असे. तिला त्यांनी केस वाढवायला प्रोत्साहन दिले. तिच्या घरच्या माणसांची व तिचीही मानसिकता बदलण्यासाठी त्या सतत पाठपुरावा करत होत्या. एका सुस्वरूप तरुणाबरोबर तिचा विवाह लावून देण्यात जानकीबाईंनी पुढाकार घेतला. हे प्रस्थापित व्यवस्थेला धक्का देण्यासारखेच होते.

समाजातील सर्वच थरांतील स्त्रियांनी एकाच व्यासपीठावर यावे, विचारांची देवाणघेवाण करावी, या उद्देशाने जानकीबाईंनी नगरमध्ये दोन दिवसांची महिला परिषद आयोजित केली. या परिषदेसाठी त्यांनी विडी कामगार महिला, सफाई कामगार महिला, सार्वजनिक नळावर पाणी भरणाऱ्या महिला व यांच्याबरोबरच मध्यम-वर्गातील व उच्चभ्रू महिला यांना आमंत्रण दिले होते. तीन हजार स्त्रियांच्या या भव्य परिषदेचे उद्घाटन गांधीवादी कार्यकर्त्या प्रेमा कंटक यांनी केले होते. या परिषदेला स्वतः नगरचे कलेक्टरही जातीने हजर राहिले. 20 व 21 ऑक्टोबर 1945 ला भरलेल्या या परिषदेला प्रवेश फी फक्त एक आणा होती. त्यामुळेही तळागाळातील स्त्रिया या परिषदेला हजर राहू शकल्या व

त्यांनी आयुष्यात प्रथमच व्यासपीठावर चढून आपले मनोगत व्यक्त केले असावे.

कमलादेवी चट्टोपाध्याय, ठक्करबाप्पा व महात्मा गांधी अशा थोर लोकांच्या भाषणांमुळे जानकीबाई प्रभावित झाल्या. दलितोद्धाराचे काम पाहून लोकच त्यांना 'महाराष्ट्राच्या ठक्करबाप्पा' म्हणू लागले. दलित व स्त्रिया यांच्यासाठी त्या अहोरात्र झटल्या. 11 वर्षांत 7 बाळंतपणे, त्यातील दोघांचा मृत्यू, याचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होत होताच; पण पुढे समाजकार्य व राजकीय चळवळीत होणाऱ्या दगदगीमुळे व अतिश्रमामुळे त्यांची प्रकृती ढासळत होती. तसंच हिंडलग्याच्या तुरुंगात असताना जडलेल्या उच्च रक्तदाबामुळे पक्षघाताचा झटका आला. तशाही अवस्थेत त्या जिद्दीने आपण स्वीकारलेले कार्य करतच राहिल्या. आपल्या मागे कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली हे त्यांचे आजच्या काळात दिसून न येणारे वैशिष्ट्य आहे. नगर गावाचे भूषण असलेल्या या महाराष्ट्रकन्येने त्याच गावी 28 ऑगस्ट 1962 रोजी अखेरचा श्वास घेतला.

■ ■

## डॉ. इंदुमती नाईक (1890–1974)

1921 साली एलसीपीएसमध्ये (भारतातील त्या वेळची डॉक्टरी परीक्षा) सर्वप्रथम येणारी इंदुमती ही पहिली मराठी कन्या. त्याशिवाय मेडिसीन व सर्जरी या दोन्ही विषयांत ती सर्वप्रथम आली. पुढे महाराष्ट्रात सत्याग्रह करणारी व इतर स्त्रियांना त्यासाठी तयार करणारीही ती पहिलीच मराठी स्त्री. उच्च शिक्षण घेऊनही स्वतःला स्वातंत्र्य चळवळीत झोकून देणाऱ्या डॉ. इंदुमतीबाईंनी आपल्या घरात स्वदेशी बांगड्यांचे दुकान सुरू केले. प्रत्येक बाईपर्यंत पोहोचण्याचा तो एक यशस्वी मार्ग होता. त्या वेळी त्यांच्यावर 'डॉक्टरीण कासारीण झाली' अशी टीकाही झाली. पण त्याला न जुमानता, वैयक्तिक आयुष्यातील संघर्षांपुढे न झुकता त्यांनी स्वातंत्र्यलढा चालू ठेवला. त्या विसाव्या शतकातील आद्य मराठी स्वातंत्र्यसैनिक डॉ. इंदुमती नाईक यांचा हा रोमहर्षक लढा.

इतिहास वाचत असताना डॉ. इंदुमती नाईक या एका मराठी कन्येच्या कर्तृत्वाने लक्ष वेधून घेतलं. महाराष्ट्रात सत्याग्रह करणारी व इतर स्त्रियांना त्यासाठी तयार करणारी ही पहिलीच मराठी स्त्री असल्याचं कळलं आणि कळलं ते मरेपर्यंतचं त्याचं संघर्षमय जीवन. डॉ. इंदुमती नाईक यांनी 1921 मध्ये मुळशी धरणाविरुद्ध झालेल्या सत्याग्रहात भाग घेतला. या सत्याग्रहापासून त्या राजकारणाकडे पूर्णपणे वळल्या. डॉक्टर झालेल्या या तरुणीने आपला व्यवसाय बाजूला ठेवून देशकार्याला वाहून घेतलं त्याची ही कथा!

डॉ. इंदुमती यांचे वडील नारायणराव वीरकर. वीरकर पुण्याच्या कोर्टात वकिली करत होते. विचाराने ते नवमतवादी असल्यामुळे त्यांनी आपल्या दोन्ही मुलींची लग्ने पंधरा वर्षे पूर्ण होईपर्यंत करायचीच नाहीत, असा निश्चय केला होता. मुली हुजूरपागेत शिकत होत्या.

मोठी सुमती 15 वर्षांची झाली तेव्हा इंग्रजी सहावीत होती. हुशार असल्यामुळे तिला वर्षाला 25 रुपयांची शिष्यवृत्ती मिळत असे. अशातच डॉ. रामचंद्र नाईक या विधुराचे स्थळ सांगून आले. एक अट होती डॉक्टरांची. मुलीने पुढे शिकलेच पाहिजे. वीरकर मंडळींना व स्वतः सुमतीलाही ही गोष्ट फारच समाधान देऊन गेली. सुमती वीरकर लग्नानंतर इंदुमती नाईक झाली. डॉ. रामचंद्र हे धारवाडचे. त्यांचे चुलतबंधू काँग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यांचा भरभराटीचा धंदा काँग्रेसच्या कामात झोकून दिल्यामुळे पार बुडाला व नाईक कुटुंब भुकेकंगाल झाले. अशा परिस्थितीत डॉ. नाईक यांनी काबाडकष्ट करून व शिष्यवृत्ती मिळवून डॉक्टर ही पदवी मिळवली होती. त्या कुटुंबात ते एकटेच कर्ते व मिळवते पुरुष होते. तरीही त्यांनी इंदुमतीचे शिक्षण चालू ठेवले. डॉ. नाईक टिळकभक्त होते. त्यांचा शिष्य म्हणून त्यांना राजकारणातच जायचे होते. आपल्या स्वतःच्या व्यवसायात इंदुमतीने डॉक्टर होऊन मदत करावी असे त्यांना वाटले. या शिक्षणाकरिता इंदुमतीला पुण्यात राहावे लागणार होते. तेव्हा डॉक्टरांनी धारवाडचा व्यवसाय बंद करून पुण्यात व्यवसाय सुरू करण्याचे ठरवले. त्यामुळे इंदुमतीचे शिक्षण व स्वतः टिळकांच्या मार्गाने जाण्याचे स्वप्न साकार होणार होते.

1921 साली इंदुमती एलसीपीएस (Licentiate of the College of Physicians and Surgeons) ही त्या वेळची भारतातली डॉक्टरी परीक्षा पास झाली. भारतात राहून या परीक्षेत सर्वप्रथम येणारी ही पहिलीच मराठी कन्या. त्याशिवाय मेडिसीन व सर्जरी या दोन्ही विषयांत ती सर्वप्रथम आली. आपल्या पत्नीने वैद्यकीय व्यवसाय जरुरीपुरताच करावा व स्वातंत्र्यलढ्याच्या कामाला अग्रक्रम द्यावा, असा डॉ. रामचंद्र यांचा आग्रह होता. इंदुमतीने तो मानला. आणि न.चिं. केळकर यांच्याबरोबर त्या काँग्रेसच्या कामात सहभागी झाल्या. 1921 रोजी सुरू झालेल्या मुळशी सत्याग्रहात सहभागी झाल्या. गांधीयुगाच्या सुरुवातीस महाराष्ट्र काँग्रेसमध्ये वेगवेगळ्या विचारांचे गट होते. त्यांनी मुळशी सत्याग्रहास नेतृत्व दिले होते. 1920 मधील काँग्रेसनंतर असहकार आंदोलनाच्या महात्मा गांधी पुरस्कृत कार्यक्रमात फेरफार करावे, अशी मांडणी करणाऱ्यांना ‘फेरवादी’ म्हणत. महाराष्ट्र काँग्रेसअंतर्गत गांधींच्या असहकाराच्या कार्यक्रमाची तंतोतंत अंमलबजावणी करा, असे म्हणणाऱ्यांना ‘नाफेरवादी’ म्हणत. 1922 च्या अकोला येथे भरलेल्या महाराष्ट्र प्रांतीय काँग्रेसच्या अधिवेशनातून व अहमदाबादच्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात डॉ. इंदुमती नाफेर गटातून बाहेर पडल्या.

मुळशी धरणाच्या सत्याग्रहात स्त्रियांनाही सामील करून घेतल्याशिवाय तो सत्याग्रह खऱ्या अर्थाने सत्याग्रह होणार नाही, असे सेनापती बापट यांचे म्हणणे होते. मुळशी गावातील बायकांचा तो स्वतःचाच प्रश्न असल्यामुळे शेतकऱ्यांच्या बायकांमधून हळूहळू सत्याग्रहासाठी स्त्रिया नावे देऊ लागल्या. या सत्याग्रहात त्यांच्याबरोबर इतरही स्त्रिया सहभागी झाल्या पाहिजेत, असे इंदुमतीबाईंना वाटून त्यांनी 4 ऑक्टोबर 1921 रोजी पुण्यात स्त्रियांची सभा बोलावली. आश्चर्य म्हणजे त्या सभेला 1000 च्या वर स्त्रिया

जमल्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात इंदुमतींनी सत्याग्रह म्हणजे काय व त्याची गरज का?, हे अत्यंत प्रभावीपणे मांडले. त्यांच्या भाषणाने प्रभावित होऊन एकीने आपल्या हातातील चार सोन्याच्या बांगड्या काढून सत्याग्रहासाठी देणगी दिली. 23 ऑक्टोबरला सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली सर्वात मोठा सत्याग्रह झाला. त्यात इंदुमतीबाईंनीही एका तुकडीचे नेतृत्व केले. याच सत्याग्रहापासून त्या राजकारणाकडे पूर्णपणे वळल्या. याच सत्याग्रहामुळे गांधीप्रणीत चळवळ पुण्यापर्यंत पोहोचली. डॉ. नाईक व भुस्कुटे अशी दोन्ही दांपत्ये व 102 मावळे व इतर काही सत्याग्रही यात होते. यात प्रमुख 12 स्त्रिया होत्या. डॉ. इंदुमती यांचे अमोघ वक्तृत्व, रोजच्या व्यवहारातील व पुराणातील उदाहरणे यामुळे स्त्रिया त्यांच्या सभेला गर्दी करत. या सत्याग्रहात मुळशीची जाईबाई भोई ही पहिली महिला सत्याग्रही. उपलब्ध माहितीनुसार ही सत्याग्रहात भाग घेऊन तीन महिन्यांचा कारावास भोगणारी पहिली स्त्री. इंदुमती या सत्याग्रहात शेतकरी व मध्यमवर्गीय शहरी स्त्रियांमधील प्रमुख दुवा होता.

मुळशी सत्याग्रहानंतर डॉ. इंदुमतींनी असहकाराच्या संकल्पनेवर जोर देऊन काम केले. स्वदेशीचा प्रचार, सूतकताई वर्ग, राष्ट्रीय शिक्षण या कामात त्या पतीबरोबर डॉक्टर होण्यापूर्वीच होत्या. स्त्रियांमध्ये वैचारिक परिवर्तन होण्यासाठी कोणत्याही सभेत बोलण्याची त्या संधी सोडत नसत. गीतेचा व इतर आध्यात्मिक विषयांचा विद्यार्थीदशेपासूनच त्यांचा अभ्यास होता. भाषणे करताना त्या त्यातील उदाहरणांचा अचूक उपयोग करत. डॉक्टरीचा निकाल लागण्यापूर्वी त्यांना पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये नोकरी आली. इंदुमतीबाईंच्या वडिलांनी त्यांना ती नोकरी घेण्याचा सल्ला दिला. पण ससूनची नोकरी ही सरकारी नोकरी असल्यामुळे इंदुमतीबाईंनी ती नोकरी नाकारली. आणि पतीबरोबर स्वतःला स्वातंत्र्याच्या चळवळीत झोकून दिले.

डॉ. इंदुमतीबाईंनी पुण्यातील आपल्या घरात स्वदेशी बांगड्यांचे दुकान सुरू केले. प्रत्येक बाईपर्यंत पोहोचण्याचा तो एक यशस्वी मार्ग होता. या दुकानाची जाहिरात त्या वेळच्या 'इंदुप्रकाश' या वृत्तपत्रात दिली होती. 'डॉक्टरीण कासारीण झाली' अशी टीकाही त्याबद्दल झाली. त्याचबरोबर स्वदेशी, असहकार, हरताळ याचे तात्त्विक अधिष्ठान समजावून देण्यासाठी त्यांनी इंग्लिश व मराठीतून विपुल लेखन केले. ज्ञानप्रकाशात जाहिरात देऊन आपल्या राहत्या घरात सूतकताईचा वर्ग सुरू केला. तो अपेक्षेपेक्षाही मोठा झाला. त्यातूनच 'सूत कमिटी'ची स्थापना झाली. त्यात आनंदीबाई जोगळेकर, सत्यभामा कुवळेकर आदी स्त्रिया प्रमुख होत्या. या कमिटीतर्फे विकले जाणारे सूत अत्यंत तलम होते. त्यांनी विणलेली साडी बालगंधर्वांनी विकत घेतली होती. डॉ. इंदुमती यांनी राजकीय कामासाठी टिळक स्मारक फंड व स्वराज्य फंड जमवण्यात पुढाकार घेतला. त्यांच्या प्रभावी भाषणामुळे गावोगावी स्त्रियांनी काँग्रेसचे सभासदत्व घेतले. एकट्या बारामती गावात त्यांच्या भाषणानंतर 40 स्त्रिया काँग्रेसच्या सदस्य झाल्या व त्याच स्त्रियांनी आपली सूत कमिटी स्थापन केल्याचा उल्लेख इंदुमतीबाईंच्या चरित्रात सापडतो. डॉ. इंदुमतीबाई हिंदू-

मुस्लीम एकता व राष्ट्रीय कार्यासाठी प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने वीरमाता अम्मी (अलीबंधूंची आई) व त्यांची सून (मोहम्मद अलीची पत्नी) यांची उदाहरणे देत. मोहम्मद अलींची अम्मी मुंबईच्या एका जाहीर सभेत म्हणाल्या होत्या, "माझे दोन पुत्र देशकार्यासाठी देता आले. त्याचा मला मनापासून आनंद आहे. आणखीही असते तर तेही दिले असते." महंमद अलींच्या पत्नीही त्यांचे काम करण्यास पुढे आल्या. त्या देत असलेली ही उदाहरणे स्त्रियांसाठी फारच प्रेरक ठरली. त्यांच्या या कार्यामुळे डॉ. इंदुमतीबाईंची अ. भा. काँग्रेस कमिटीच्या कार्यकारी मंडळावर नेमणूक झाली. सरोजनी नायडू, कस्तुरबा, विजयालक्ष्मी नेहरू (पुढे पंडित) स्वरूपा राणी व डॉ. इंदुमती नाईक अशा फक्त पाच जणी सभेच्या कार्यकारिणीवर होत्या. त्यांना 'पंचकन्या कमिटी' म्हणत.

आठवा एडवर्ड (युवराज इंग्लंड)च्या भारत भेटीवर लोकांनी बहिष्कार घालावा म्हणून डॉ. इंदुमतींनी महाराष्ट्रभर दौरा करून भाषणे केली. जानेवारी 1922 मध्ये दारू दुकानावरील निदर्शनाकरिता आपल्या घरी स्त्रियांची सभा घेऊन गुत्त्यावर कोणी जावे, कोणी काय बोलावे, ते सर्व लिहून संबंधित स्त्रियांकडे दिले. वृत्तपत्रांनी इंदूताईंचे व त्यांच्या टीमचे 'पुण्यातील बहादूर स्त्रिया' असे वर्णन केले. डॉ. इंदुमतींचे असहकार आंदोलनातील हे काम सर्वत्र पोहोचले. 1921 ते 1923 पर्यंत त्यांना खूपच दगदग झाली व त्या सपाटून आजारी पडल्या. कर्नाटकातील ज्येष्ठ काँग्रेस नेते गंगाधरराव गाडगीळ यांनी त्यांना हवा व विश्रांतीसाठी बेळगावला बोलावले. कर्नाटकातील जनतेने त्यांना महाराष्ट्राप्रमाणेच कर्नाटकामध्ये महिला संघटन करण्याची विनंती केली. जरा बरे वाटते न वाटते तोच त्या परत कामाला लागल्या. स्त्रियांमध्ये राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार केला. त्यासाठी बेळगावमध्ये राष्ट्रीय कन्या शाळेची स्थापना केली. बेळगावमध्ये डिसेंबर 1923 ला काँग्रेसचे मुखपत्र म्हणून साप्ताहिक 'लोकपक्ष' सुरू केले. काँग्रेसचा कार्यक्रम, सरकारच्या दोषी कार्यक्रमावर टीका, स्त्रियांचे प्रश्न, हिंदू–मुस्लीम प्रश्न इत्यादी विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याचा या साप्ताहिकाचा उद्देश होता. पंडित नेहरूंनी याबद्दल डॉ. नाईक पती-पत्नीचे अभिनंदन केले होते. त्यांनी कर्नाटकात राहून पक्षबांधणी करावी, असे काँग्रेसचे मत होते. पण ते घडायचे नव्हते. याच सुमारास डॉ. इंदुमतींना कन्या झाली. एकाच ठिकाणी राहून व्यवसाय व काँग्रेसचे काम करण्याऐवजी देशभरात फिरून राजकीय व आध्यात्मिक प्रवचने, व्याख्याने व संघटना बांधणे हेच काम त्यांनी करायचे ठरवले. विंचवाच्या पाठीवर त्यांचे बिऱ्हाड झाले. इ. स. 1926 ते 1944 पर्यंत अशी भ्रमंती चालूच होती. 1928 मध्ये त्यांना पुत्ररत्न झाले. त्याच वेळी डॉ. रामचंद्रांची पुण्यातली एक सभा उधळली गेली. त्यांच्या पायावर लाठ्या बसल्यामुळे त्यांना कायमचे पंगुत्व आले. सतत फिरतीमुळे मुलांच्या शिक्षणाची आबाळ झाली. खाण्यापिण्याचेही हाल झाले. दोघांपैकी एकाने जरी व्यवसाय केला असता तरी हजारो रुपये मिळवता आले असते. हे सर्व दिसत असूनही त्यांनी ना आपली तत्त्वनिष्ठा सोडली, ना आपले ध्येय! अशाही परिस्थितीत त्यांनी महाराष्ट्रातील संस्थानांत प्रजा परिषदांची स्थापना केली. अशा राज्यांतून कीर्तने, प्रवचने यातून स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, स्त्रियांचा राष्ट्रकार्यात भाग असे विषय त्या मांडत. 1940 नंतर सातारा

जिल्ह्यातच ‘कराड’ गावी नाईक कुटुंब विसावले.

दोन्ही पायांनी अपंग पती व दोन मुलांचे शिक्षण व संगोपन करण्यासाठी त्यांनी डॉक्टर देशपांडे यांच्याकडे डॉक्टर म्हणून नोकरी केली. सकाळी 7 ते रात्री 9 पर्यंत काम करून त्या अपंग पती व मुलांचे शिक्षण यासाठी श्रम करत होत्या. याच सुमारास ‘भारत छोडो’ आंदोलन सुरू झाले. असहकाराच्या चळवळीच्या वेळी आपले जीवनच देशाला अर्पण करणाऱ्या महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीतील या अग्रणी महिलेला स्वस्थ बसणे किती यातनामय झाले असेल ते देवच जाणे! 1924 साली गांधीजींना ॲपेंडिक्सचा ॲटॅक आला. त्या वेळी त्यांना जेलमधून ससूनमध्ये आणले होते. डॉ. मोडक यांनी गांधीजींवर शस्त्रक्रिया करताना सर्जरीमध्ये प्रावीण्य असलेल्या डॉ. इंदुमतींना आपल्या मदतीला बोलावले होते. अशा धन्वंतरी डॉक्टरने आपल्या करिअरवर देशासाठी पाणी सोडले. मुलांच्या भविष्याचाही विचार केला नाही आणि त्याची कुठे नोंदही नाही.

1960 मध्ये यशवंतराव कराड यांच्या मतदारसंघातील मतदार क्षेत्रात फिरत असता, त्यांची डॉ. इंदुमतींशी भेट झाल्यावर त्या त्यांना म्हणाल्या, “आम्ही दोघांनी आमच्या घरसंसाराची होळी करून या स्वातंत्र्यसंग्रामात होरपळून घेतले. आमच्या बलिदानाने स्वातंत्र्य मिळाले. तुम्ही सत्ता चाखता. आमच्यासारखे उच्चशिक्षित स्वातंत्र्यसैनिक आज उपेक्षित जीवन जगत आहेत. त्यांचे सर्वच आयुष्य खर्ची पडले आहे.” पुढे वसंतराव नाईक 1966 साली मुख्यमंत्री झाले व त्यांनी डॉ. इंदुमतींना मानपत्र दिले. डॉ. इंदुमतींच्या मुलाने आपल्या 70 वर्षीय आईला निवृत्तिवेतन द्यावे, असा इंदुमतींच्या विरोधात जाऊन अर्ज केला. तोपर्यंत चव्हाण केंद्र सरकारात गेले. माधव नाईक यांना पत्राचे उत्तर आले – महाराष्ट्र शासन चौकशी करत आहे. ते साल होते 1971. त्यानंतर 1974 च्या 4 जानेवारीला महाराष्ट्र शासनाकडून 50 रुपये पेन्शन मंजूर झाल्याचे पत्र आले. आणि एप्रिल 1974 मध्ये वयाच्या 84 व्या वर्षी विसाव्या शतकातील या आद्य मराठी स्वातंत्र्यसैनिक डॉ. इंदुमती नाईक यांनी जगाचा निरोप घेतला. ■ ■

*गांधी माझा सखा गं । ओवी त्याला गाईन*
*ओव्या गाऊ कौतुके । तू येरे बा इट्टलों*
*नाना माझा भाऊ गं, ओवी त्याला गाऊया,*
*त्याच्यासंगे लढता लढता स्वराज्य मिळवूया.*
*जवाहर माझा धीराचा । वीर तो छातीचा*
*काटा काढी सोजीराचा । येरे बा इट्टला*
*जिकडे तिकडे झाले । गांधी गांधी गांधी*
*अंगावर साधी खादी । बाळगीती लोकं*
*गांधी हा गारुडी । वाजवितो पुंगी*
*तेणे येई गुंगी । जुलमी इंग्रजा*



# म. गांधींच्या प्रभावाने स्वातंत्र्य चळवळीत आलेल्या पारशी महिला

## गांधीवादी विधायक कार्यकर्ती मीठूबेन पेटिट (1892–1973)



बरोनेट दिबशा पेटिट. एक कुबेर पारशी व्यक्ती. त्यांची नात म्हणजे मीठूबेन पेटिट 1892 साली मीठूबेनचा जन्म मुंबईत झाला. त्या वेळच्या श्रीमंत घराण्यातील पद्धतीप्रमाणे मीठूबेनबरोबर एक कायम आया व अंगसंरक्षक असे. पेटिटांच्या घरातली राहणी पूर्ण पाश्चात्य पद्धतीची. कोणत्याही एका गोष्टीच्या खरेदीला म्हणून मीठूबेन बाहेर पडली की, दिसेल ती सुंदर वस्तू विकत घेत सुटे. घरी येताना पंचवीस-तीस वस्तूंची खरेदी करून येणे, हे मीठूबेनच्या बाबतीत नेहमीचेच. पेटिट कुटुंबीय अत्यंत सहृदयी व दयाळू होते. तोच वारसा मीठूबेनकडे आला होता. त्यामुळे दोन्ही हाताने पैसे उधळणारी ही मुलगी शाळेतल्या गरजू मुलींना शिकण्यासाठी नेहमी पैशांची मदत करत असे.

महात्मा गांधी 1915 मध्ये आफ्रिकेतून हिंदुस्थानात आले तेव्हा त्यांच्या सन्मानाकरता मीठूबेनचे काका जहांगीर पेटिट यांनी एक उपवन मेजवानी (गार्डन पार्टी) आयोजित केली होती. जहांगीर पेटिट व त्यांची पत्नी जायजीबेन यांनी आफ्रिकेत गांधीजींनी सुरू केलेली चळवळ अगदी जवळून पाहिली होती. गांधीजी काठेवाडी पोषाखात आले होते. त्यांचे एकूण व्यक्तिमत्व भारदस्त व प्रभावी होते. मीठूबेनवर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा फारच प्रभाव पडला व त्या दिवसापासून, 'गांधीजींना अभिप्रेत असलेल्या सत्य व राष्ट्रवादाच्या मार्गावरच चालायचे', असा मनोमन निश्चय मीठूबेनने केला व आयुष्याच्या अखेरपर्यंत या निश्चयाला त्या चिकटून राहिल्या. मीठूबेन या अभिजन वर्गातल्या, मात्र त्यांच्या मित्रमैत्रिणी सर्व वर्गातले होते. त्या वेळचे भारताचे दिग्गज नेते दादाभाई नौरोजी, दिनशा व फिरोझशहा मेहता हे सर्व पारशी समाजातील अभिजन वर्गातलेच. मीठूबेनचे काका जहांगीर पेटिट व जायजीबेन यांचे त्यांच्याशी घनिष्ठ संबंध होते. इतकेच नव्हे तर रविंद्रनाथ टागोर, गोपाल कृष्ण गोखले व सरोजिनी नायडू ही मंडळीही पेटिट परिवाराच्या मित्रमंडळींत होती. या सर्वांचा प्रभाव मीठूबेनवर पडला नसता तरच

नवल होते.

मीठूबेन राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी झाली ती 1919 सालापासून, गांधीजींच्या प्रेरणेमुळे. सरोजिनी नायडू व पेरिनबेन कॅप्टन यांनी राष्ट्रीय स्त्री सभेची स्थापना केली होती. या सभेतर्फे खादीचा प्रचार केला जाई, रौलेट ॲक्टला (काळा कायदा) विरोध करण्यासाठी गांधीजींनी स्वदेशी चळवळीचा नारा दिला. या सभेच्या मीठूबेन सदस्य झाल्या. स्वदेशी चळवळीची आवश्यकता त्यांना पटली. रेशमी मुलायम वस्त्रांचा वापर बंद करून त्या संपूर्ण खादीधारी बनल्या. आपल्या स्वतःचे सर्व कपडे त्यांनी होळीत टाकले. त्यांची खादी साडी फक्त एकवार पन्ह्याची होती. कारण 1919–20 साली खादीची साडी म्हणजे कापडच नेसावे लागे. जायजीबेनप्रमाणे गांधीजींच्या विचाराने मीठूबेनही प्रभावित झाल्या. आपल्या जायजीबेनबरोबर त्याही गांधीजींना सतत भेटायला जाऊ लागल्या आणि हां हां म्हणता त्या स्वातंत्र्य आंदोलनात सामीलही झाल्या.

आजच्या शब्दात सांगायचे तर, मीठूबेनचा अवतार 1919–20 साली पाहण्यासारखा होता. तोकडे खादीचे कापड साडी म्हणून वापरलेले व गळ्यात एक केरवा मण्यांची माळ. ही माळ दागिना म्हणून नाही, तर त्या मण्यांचा शरीराला होणारा स्पर्श हा आरोग्यदायी समजला जाई म्हणून त्या घालत. लहान मुलांच्या गळ्यात तर सर्रास केरवा मण्याची माळ असे. त्यांचा हा नवा अवतार पाहून पारशी मैत्रिणी त्यांना ‘धोबीण’ म्हणत. शरीरावर हा पोषाख व पायात मखमली चप्पल घातलेली मीठूबेन पाहून गांधीजींना हसू आवरले नव्हते. गांधीजींचे हसण्याचे कारण कळल्यानंतर मीठूबेनने साधी कातडी चप्पल वापरायला सुरुवात केली. खादी जर लोकप्रिय व्हायची असेल तर तिचा पोत बदलणे आवश्यक आहे, तसेच खादी निरनिराळ्या रंगात व छापील असली पाहिजे. तिच्यावर भरतकामही केले पाहिजे ह्याबद्दल मीठूबेन व नौरोजी भगिनी यांच्यात एकमत झाले. त्यांनी साड्याही काठापदराच्या व लांबरुंद विणून घेतल्या. घरातही वापरण्यासाठी नॅपकीन, टेबलक्लॉथ, चादरी, पलंगपोस इत्यादी विणायला सुरुवात केली. मिठूबेन स्वतः विधायक कार्यकर्ती असल्याने त्या 65 प्रकारच्या खादी विणायला शिकल्या आणि त्यांनी अनेकांना खादी विणायला शिकवले. लोकांची आवड निवड लक्षात घेऊन ‘स्त्री सभा’ खादी तयार करून घेऊ लागली. मीठूबेन व कॅप्टन भगिनी घरोघर जाऊन खादी विकू लागल्या. संपत्ती व सर्व सुखे पायदळी तुडवून हे श्रमाचे काम करणाऱ्या मीठूबेन व कॅप्टन भगिनी या सर्वांच्या आदराचा व कौतुकाचा विषय ठरल्या. मीठूबेनच्या केंद्रावरचीच खादी वापरणारे मोतीलाल व जवाहरलाल नेहरू, देशबंधू दास तसेच म्हैसूर, बडोदा व भावनगर येथील राजकुटुंबातही लोक होते.

गुजरातमध्ये खेडा जिल्ह्यात पुराने खूप मोठे नुकसान केले होते. विठ्ठलभाई पटेलांच्या नेतृत्वाखाली मीठूबेन इतर कार्यकर्त्यांबरोबर खेडोपाडी फिरल्या. रस्ते सगळे चिखलानी भरलेले. ते रस्ते पायी तुडवत त्या खेडोपाडी पोहोचल्या. इथे जे दैन्य, दारिद्र्य व दुःख पाहिले त्याचा मीठूबेनच्या संवेदनशील मनावर फार मोठा आघात झाला; पण एक

गोष्ट चांगलीही झाली की, वल्लभभाई पटेल, ठक्करबाप्पा यांच्यासारख्या निष्ठावंत गुजराती नेत्यांच्या त्या सहवासात आल्या. याच लोकांकडून देशातील राजकीय परिस्थिती व ग्रामीण जीवनावर होणारा त्याचा परिणाम या गोष्टींची समज मीठूबेन यांना होण्यास मोठीच मदत झाली. बार्डोलीच्या सत्याग्रहात मीठूबेनचा स्वयंसेवक म्हणून भाग होता. स्त्रियांमध्ये फिरून बार्डोलीचा लढा का व कसा हे त्यांनीच समजावून सांगितले.

मिठाच्या सत्याग्रहात स्त्रियांना सहभागी करून घेण्यास गांधीजी तयार नव्हते. सरोजिनी नायडूंबरोबरच मीठूबेन व पेरीनबेन यांनी त्याबाबत गांधीजींकडे आग्रह धरला. त्यांचा आग्रह व निग्रह पाहून अखेर गांधीजींनी स्त्रियांना मिठाच्या सत्याग्रहात भाग घ्यायला परवानगी दिली. त्याचा परिणाम मिठाचा सत्याग्रह व सविनय कायदेभंगाची चळवळ यांत हजारो स्त्रिया पुढे सामील झाल्या.



*गुजरातच्या किनारपट्टीवर भीमरड येथे मीठ उचलताना गांधींजी सोबत मीठूबेन आणि आणि त्यांचे पुत्र*

मीठूबेनने हे जीवन स्वीकारले खरे; पण तिच्या धनाढ्य माता-पित्यांना ते अजिबात आवडले नाही. तिने विधायक कार्य केले तर चालेल; पण सत्याग्रहाची बाब त्यांच्या समजाच्या पलीकडे होती. मिठूबेनचे वडील होरमसजी व आई पिरोजा पेटिट व सर्व कुटुंबीय अतिशय रागावले. त्यांनी मीठूबेनला मुंबईला घरी परत येण्याचे निरोप पाठवले. गांधीजींनाही ते नको ते बोलले. मीठूबेन आपल्या वडिलांना म्हणाली, “आपले काम सरकारमध्ये उठबस करावयाचे आहे; तर माझे काम या देशातील जनतेबरोबर राहायचे आहे.” मीठूबेनचे हे उत्तर ऐकून तिचे स्वतःचे दागिने सोडून इतर इस्टेटीतून तिला बेदखल केले. मीठूबेनवर त्याचा जराही परिणाम झाला नाही. तिचे खेडोपाडी हिंडून खादी प्रचाराचे काम आता अधिक जोराने सुरू झाले. खेड्यात राहत असताना तिने ग्रामीण जीवन अगदी जवळून पाहिले. दारूमुळे उद्ध्वस्त होणारी कुटुंबे पाहिली. खेड्यांमध्ये काम करतानाच त्यांनी याच भागात राहून विधायक कार्य करायचे ठरवले. 1929 साली दारूच्या दुकानावर निदर्शने करताना तिला अटक झाली. ही तीची पहिली अटक. तिचे आदिवासी व खेडूतांसाठी केलेले काम पाहून वल्लभभाई पटेल यांनी त्यांना ‘दीन भगिनी’ ही पदवी दिली. बार्डोलीच्या संघर्षात बेघर झालेल्या लोकांच्याकरता मीठूबेनने तात्पुरते तंबू ठोकून दिले. त्यांना औषधोपचाराची मदत मिळवून दिली. पुढे तर तिथे रीतसर दवाखानाच सुरू केला. मीठूबेनचे आजोबा

दिबशा पेटिट यांना औषधी वनस्पती जमवण्याचा नाद होता. त्यांनी त्यावर एक पुस्तकही लिहिले होते. मीठूबेनच्या मदतीला हे पुस्तक होतेच व शिवाय त्यांना स्वतःला पण औषधोपचारात रस असल्यामुळे तिने औषधी वनस्पती गोळा करायला सुरुवात केली. त्या औषधोपचारही करू लागल्या. सुरत जिल्ह्यातील आदिवासी व इतर ग्रामीण जनतेत त्यांना आदराचे स्थान प्राप्त झाले. लोक त्यांना 'माईजी' म्हणू लागले. त्यांच्या प्रेमामुळे व त्यांच्या अत्यंत हालअपेष्टेच्या जीवनाच्या दर्शनामुळे मीठूबेनंनी सुरत जिल्ह्यात राहायचा निश्चय केला.

1930 मध्ये मीठूबेन सुरत जिल्हा काँग्रेस कमिटीची उपाध्यक्षा म्हणून निवडून गेली. दांडी यात्रेवर निघालेल्या गांधीजींचे तिने या नात्याने 'उग्राची' गावात स्वागत केले. गांधीजींबरोबरच त्या पुढे दांडीला गेल्या. दांडी मार्चच्या बहुतेक फोटोत त्या गांधीजींच्या मागे किंवा बरोबर असताना दिसतात. गांधीजींनी स्त्रियांवर दारू व परदेशी वस्तूंच्या दुकानावर निदर्शने करण्याची जबाबदारी सोपवली. त्याकरता मीठूबेनच्या नेतृत्वाखाली सुरत जिल्ह्यात 'स्त्री स्वराज्य संघ' स्थापन झाला. सर्व जिल्ह्यात त्याच्या 500 च्या वर सदस्य नोंदल्या गेल्या. ह्या सदस्या दारूच्या व परदेशी कपड्यांच्या दुकानांवर निदर्शने करत. त्यांच्या शिबिरावर पोलिसांनी हल्ले केले. त्यांचे सर्व सामान जप्त केले. तरीही बायका हटल्या नाहीत. कँपवरची भांडीकुंडी जप्त केल्यामुळे या बायका निघून जातील असा पोलिसांचा समज होता; पण मीठूबेनच्या नेतृत्वाखाली शिबिरे झाडाखाली भरली. मातीच्या मोठमोठ्या मडक्यातून जेवण शिजले. त्यामुळे आता यांचे करावे तरी काय? हा प्रश्न पोलिसांना पडला. मीठूबेनंनी अशा शिबिरातून शिस्तबद्ध स्वयंसेवक घडविले. पुढे गांधी–आयर्विन करार होऊन सत्याग्रह मागे घेतला गेला. निदर्शने आणि गांधीवादी विधायक कार्ये थंडावली. मीठूबेन व तिच्या सहकाऱ्यांनी तयार केलेल्या स्वयंसेवक महिलांनी मात्र आपल्याला विधायक कार्याला वाहून घेतले. हे घडवून आणले मीठूबेनने. 1930 च्या सत्याग्रहाच्या काळात सुरत जिल्ह्यात अनेक ठिकाणी महिलांची शिबिरे घेण्यात मीठूबेन अग्रेसर होती. कस्तुरबा गांधीही तिच्या मदतीला धावल्या होत्या.

'तरुणांनो खेड्याकडे चला' हा आदेश गांधीजींनी दिला. शहरात व नगरात काम करायला स्त्रिया पुढे येत होत्या. खेड्यातच राहून काम करायला तयार होणाऱ्यांची संख्या नगण्य होती. महाराष्ट्रात पद्मावतीबाई हरोलीकर किंवा गुजरातमध्ये मीठूबेन अशा स्त्रियांनी जन्मभराचे ग्रामीण भागात काम करण्याचे व्रत घेतले. मीठूबेनने एकूण त्रेचाळीस वर्षे खेड्यातच आपले मुख्यालय स्थापले. 1 डिसेंबर 1930 रोजी आश्रमाच्या रूपाने हे काम सुरू केले. 1932 सालच्या सत्याग्रहात तिला कस्तुरबांबरोबर अटक झाली. चार महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. ती अहमदाबादमध्ये साबरमती कारावासात होती. तुरुंगातून सुटल्यावर ती पुन्हा आपल्या आश्रमात परतली.

मीठूबेनचा आश्रम सुरत जिल्ह्यात मरोली गावी होता. मरोली गावात मीठूबेन व कस्तुरबा यांनी आश्रम सुरू करायचा ठरविला. एक जरुरीपुरती झोपडी बांधून घेतली.

आजूबाजूला दहा-बारा कुटुंबांची वस्ती होती. ते सर्व आदिवासी होते. मीठूबेन तिथे राहायला गेल्यावर हळूहळू दुबळी, कोळी व इतर जमातीचे लोक येऊन राहू लागले. त्यांना मीठूबेनचा मोठा आधार वाटू लागला. त्यांच्यावर औषधोपचार होऊ लागले. त्या गावात ज्यांच्या जमिनी होत्या असे पन्नास लोक एकत्र आले. त्यांनी आश्रम दत्तक घेतला. आपली जमीन आश्रमाला दिली. मीठूबेनने आश्रमात 'कस्तुरबा वणतशाला' (वीणकाम केंद्र) सुरू केले. कोळी, हरिजन, दुबळी व तळागाळातील भूमिहीन पालकांच्या मुलांना नानाप्रकारचे जीवनोपयोगी शिक्षण इथे दिले जाऊ लागले. कापसाचे पेळू बनविणे, चरख्यावर व टकळीवर सूत कातणे, खादी विणणे, पशुपालन, चामड्याचे काम, दुधाची डेअरी असे खेडेगावातील लोकांसाठी रोजगार उत्पन्न होतील अशा शिक्षणाची सोय केली. या आश्रमाच्या भूमिपूजनाला गांधीजी आले होते. त्याचप्रमाणे खान अब्दुल गफार खान, सरदार वल्लभभाई पटेल, मीराबहेन हे नेतेही गांधीजींबरोबर आले होते. गांधीजींनी मीठूबेनना विचारले, “मीठू, मला तू भूमिपूजनाला बोलवलेस त्याबरोबर तुझ्यावर एक मोठीच जबाबदारी आहे याची जाणीव तुला आहे का?” मीठूबेनने उत्तर दिले, “होय बापू, निश्चीतच. माझ्या मृत्यूपर्यंत मी ते काम सोडणार नाही, असे मी आपल्याला वचन देते.” गांधीजींनी मीठूबेनना शुभेच्छा दिल्या. समारंभासाठी जमलेल्या जनतेला उद्देशून ते म्हणाले, “आज तुमच्यासमोर जी पारशी मुलगी उभी आहे, तिच्या परिवाराला ऐशोआरामात व सुखात राहण्याची गेल्या काही पिढ्या सवय आहे. अशा वातावरणात वाढलेली ही मुलगी, खादीचे जाडे-भरडे कपडे घालते, उन्हाची व पावसाची तमा न बाळगता अनवाणी गावोगाव फिरते, गरिबांच्या झोपडीत जाते, गरज असेल तेव्हा तिथेच राहते, त्यांच्या मुलांना शिकवते व या गरीब जनतेसाठी मदत गोळा करते. दहा वर्षांपूर्वी अशा प्रकारे कोणी पारशी मुलगी काम करेल, असे मला जरी कोणी सांगितले असते तरी मी त्यावर विश्वास ठेवला नसता; पण आज ते वास्तव आहे.”

ह्या आश्रमात आदिवासी मुलींच्या शिक्षणाची सोय केली गेली. आजूबाजूच्या गावांतून ग्रामीण मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून शाळेबरोबरच वसतिगृहाचीही सोय झाली. मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे व जीवनोपयोगी शिक्षण असावे हा शिक्षणाचा मूळ हेतू डोळ्यांसमोर ठेवून गांधीजींच्या 'नई तालीम'चा अभ्यासक्रम इथे शिकवला जात असे. आरोग्यशास्त्र व स्वच्छता यांना शिक्षणक्रमात प्राधान्य होते. मुलींच्या शाळेची व वसतिगृहाची स्वच्छता मुलींनाच पहावी लागे. 'मरोली गावाच्या आसपासची एकूण तेवीस खेडी या आश्रमाशी आजही जोडलेली आहेत. या सर्व खेड्यात हे सर्व विधायक कार्यक्रम आजही राबविले जातात. मीठूबेनने तसा पायाच पक्का केला होता. याशिवाय चार आश्रमशाळा सहशिक्षणाच्या स्थापन केल्या. तेवीस बालवाड्या सुरू केल्या. चार सार्वजनिक दवाखाने सुरू केले. या सर्व संस्थांच्या कारभारावर मीठूबेनची सक्त नजर असे प्रत्येक ठिकाणी उद्भवलेले प्रश्न ती जातीने सोडवी. तेवीसही खेड्यातील सर्व लोक तिच्या परिचयातले होते. ऊन, पाऊस, थंडी यांची तमा न बाळगता या सर्व खेड्यात फिरून ती

रोगी पहात असे. आपल्या औषधाने जे बरे होऊ शकणार नाहीत असे वाटे त्यांना ग्रामीण इस्पितळात हलविले जाई. या इस्पितळात पंचवीस रोग्यांची सोय केली होती. ह्या सर्व इमारती देणगी मिळालेल्या आठ एकर जमिनीवर बांधलेल्या आहेत.

काही स्वातंत्र्यसैनिकांना कारागृहात फारच क्रूर वागणूक मिळाली. त्याचा त्यांच्या शरीरावर तसेच मनावरही फार मोठा परिणाम झाला. हे मनोरुग्ण सच्चे स्वातंत्र्यसैनिक होते. अशा मनोरुग्णांना बरे करणे हे गांधीजींना महत्त्वाचे वाटत होते. त्यांच्यापैकी दोघा-चौघांना गांधीजींनी मिठूबेनकडे पाठवले. यातूनच मनोरुग्णांकरता इस्पितळ ही कल्पना हळूहळू फुलत गेली. आजच्या इस्पितळाच्या पद्धतीप्रमाणे इथे वार्ड, स्वतंत्र खोल्या वगैरे व्यवस्था नव्हती. अगदी छोट्या-छोट्या झोपड्या बांधून त्यात रोगी व त्याच्याबरोबरची त्याची काळजी घेणारी एक-दोन माणसे इतकीच त्यात राहू शकत. परिसरात रोगी फिरू शकत. लहान-सहान कामे करत, आपले छंद जोपासत, ते कुटुंबात राहत व भोवतालचा समाजही त्यांच्याशी आपुलकीने वागे. त्यामुळे रोगी लवकर बरे होऊन घरी जात. आज या मीठूबेनच्या मनोरुग्णालयाची प्रसिद्धी देश-विदेशात झाली आहे. तिथे नैसर्गिक उपचार पद्धतीने आजही मनोरुग्ण बरे होतात. मीठूबेनचे हे फार मोठे योगदान आहे. मिठूबेनला या कामात त्यांचे सहकारी कल्याणजीभाई यांची फार मोठी मदत झाली.

मीठूबेनचे विधायक कार्य सुरुवातीला जरी खादी व ग्रामोद्योगापर्यंत मर्यादित असले तरी जसजशी भोवतालच्या परिस्थितीची गरज वाटली तसतशी कामेही गरजेपोटी निर्माण केली गेली. 1941, 1959 व 1969 साली तापी नदीला महापूर येऊन त्याखाली सर्व सुरत जिल्हा बुडाला. आपल्या स्वयंसेविकांसहित मीठूबेन सर्वत्र पोहोचली. धान्य, भांडी, कपडे, औषधे व आश्रम या सर्वांची त्यांनी सोय केली. कुठे काही झाले असेल तिथे बोलावणे येण्यापूर्वीच मिठूबेन हजर होत असे. 1969 च्या पुराच्या वेळी तर त्यांनी वयाची पंच्चाहत्तरी ओलांडली होती; पण आपल्या वयाचा अगर प्रकृतीचा विचार न करता त्यांनी या पुराच्या वेळी काम केले, हे विशेष होय.

माणसांप्रमाणेच मीठूबेन प्राण्यांवरही प्रेम करत असत. त्यांनी मांजरे, कुत्री व कोंबड्याही पाळल्या होत्या. त्या सर्वांना सर्वत्र मोकळा संचार होता. त्यांच्या पाळीव प्राण्यांपैकी कोणीही आजारी असेल तर त्या जातीने त्यांची शुश्रुषा करत असत. त्यांना इस्पितळात पाठविण्याची गरज असेल तर तेही करत. सर्व प्राण्यांना नावे ठेवलेली होती. एखादा प्राणी मेला तर त्याला परिसरातच प्रेमाने गाडून निरोप देत. त्यांचे प्रेम फक्त मनुष्यप्राण्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते सर्व प्राणीमात्रांकरता होते.

आश्रमात येणाऱ्या पाहुण्यांचा भारतीय पद्धतीने, साधा व सन्मानाने पाहुणचार व्हावा यावर मीठूबेनचा कटाक्ष होता. मीठूबेनचे वैयक्तिक पाहुणे व आश्रमाचे पाहुणे, असे पाहुण्यांमध्ये दोन प्रकार होते. वैयक्तिक पाहुण्यांचे जेवणखाण त्या स्वतःच करत. आश्रमासाठी गरजेच्या वेळी त्यांनी आपले दागदागिने विकून वेळ निभावली. त्यांच्या काकांना त्यांच्या कामाचे कौतुक व अभिमान वाटला. त्यांनी आपली सर्व संपत्ती मीठूबेनला

दिली. त्याच्या व्याजातून त्या आपला व आपल्या पाहुण्यांच्या पाहुणचाराचा खर्च भागवत असत. ही शिकवण त्यांना गांधीवादातून मिळाली. मरोली आश्रमाचा खर्च देणग्या, त्यांच्या आईने त्यांच्यासाठी मरणापूर्वी दिलेले धन, काकांनी दिलेला संपत्तीचा वारसा या सर्वांचा वापर करून त्यांनी मरोलीला अद्ययावत ऑपरेशन थिएटर असलेले इस्पितळ आपले वडील 'होरमसजी पेटिट दर्दी निवास' या नावाने बांधले. मीठूबेनच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांचे वर्षातून एक-दोन दिवस मुंबईला घरी येणे-जाणे झाले, पण एकदा घर सोडल्यावर त्रेचाळीस वर्षे त्यांनी गुजरातेतच विधायक कार्य केले. गांधीजींना दिलेला आपला शब्द पाळला. 1942 च्या लढ्यात कितीही जीव गुंतला असला, तरी आश्रमातले कामही तितकेच महत्त्वाचे होते. लढ्यात त्या सहभागी झाल्या नाहीत.

मीठूबेनच्या सर्व विधायक कार्याची नोंद अखेर भारत सरकारने घेतली. गांधीजींची विश्वस्त संकल्पना प्रत्यक्षात उतरविणाऱ्या, दलित व तळागाळातील लोकांसाठी अव्याहत झटणाऱ्या या मीठूबेनना भारत सरकारने 1961 साली 'पद्मश्री' देऊन गौरविले.

16 जुलै 1973 रोजी मीठूबेन स्वर्गवासी झाल्या. त्यांच्या मृत्यूबद्दल 'पद्मविभूषण' डॉ. उषा मेहता लिहितात, "मीठूबेनने जीवनात एक मोलाचा संदेश दिला. सुख हे संपत्तीवर अवलंबून नाही तर दुसऱ्यांची सेवा करण्यात व दुसऱ्यांसाठी त्याग करण्यात आहे. स्त्रियांचे सौंदर्य हे कृत्रिम प्रसाधनेच्या वापरावर अवलंबून नाही, तर ते त्यांच्या निर्मल, पवित्र व संयमी चारित्र्यावर अवलंबून आहे. अशा मीठूबेन आज स्वर्गवासी होऊन जरी आपल्यातून गेल्या असल्या, तरी त्यांच्या कर्तृत्वाने त्या अजरामर आहेत. 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' या उक्तीप्रमाणे आज त्या शरीराने इथे नसल्या, तरी त्यांच्या कार्यामुळे अमर आहेत."

■ ■

## पेरीनबेन कॅप्टन (नौरोजी) (1888–1958)



पितामह दादाभाई नौरोजी यांची पेरीनबेन ही नात. दादाभाई यांचे एकुलते एक पुत्र डॉ. आरदेशर नौरोजी यांची कन्या. डॉ. आरदेशर यांना 5 मुली व 3 मुलगे अशी एकूण आठ अपत्ये. आठवे अपत्य खुर्शीदबेन नावाची मुलगी. ती आईच्या गर्भात असतानाच डॉ. आरदेशर यांचा अकाली मृत्यू झाला. दादाभाईंच्या पाच नातींपैकी गौशीबेन, पेरीनबेन व खुर्शीदबेन या भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आपल्या देशभक्तीचा ठसा उमटवून गेल्या. या तिघीही परदेशात जाऊन उच्च विद्याविभूषित होऊन आल्या होत्या. भारतात येण्यापूर्वीच त्यांचा परिचय मादाम कामा यांच्याबरोबर

झाला. साधारणपणे एक गैरसमज आहे, की पारशी लोक हे इंग्रज धार्जिणे. त्यांचे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात काहीच योगदान नाही. हे धादांत खोटे विधान आहे. याबाबत गांधीजींनी नवसारी येथील आपल्या भाषणात केलेले विधान अधिक बोलके आहे. ते म्हणाले, “Take the case of Dadabhai’s granddaughters. These sisters are just crazy and impatient to join the struggle. What more we then need to say about the assistance from Parsis?”

पेरीन कॅप्टन 12 ऑक्टोबर 1888 रोजी कच्छमधील ‘मांडवी’ बंदरात जन्मली. डॉ. आरदेशर कच्छच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये डॉक्टर होते. डॉ. आरदेशर 1893 मध्ये अकालीच कालवश झाले. कच्छच्या महाराजांनी कच्छची राजधानी भूज येथे श्रीमती आरदेशर यांना बोलावून घेऊन राजपुत्राचे शिक्षण त्यांच्याकडे सोपविले. एक-दोन वर्षे पेरीनबेनचे प्राथमिक शिक्षण व गुजराती भाषेचे शिक्षण भूजमध्ये झाले. 25 व्या वर्षी मुंबई सेंट कैथेड्रल गर्ल्स हायस्कूलमधून ती मॅट्रिकची परीक्षा पास झाली. त्यापुढच्या शिक्षणाकरता एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये पहिल्या वर्षाची परीक्षा पास झाल्यावर दादाभाईंनी तिला युरोपमध्ये पुढील शिक्षणाकरता पाठवायचे ठरवले. पॅरिसमधल्या सरबॉन विद्यापीठामध्ये तिने फ्रेंच भाषा, वाङ्मय यांचा अभ्यास केला. पेरीनबेनला शिक्षिका व्हावेसे वाटे. म्हणून शिक्षणक्षेत्रातील शिक्षक प्रशिक्षणाचा अभ्यासक्रमही पुरा केला, पेरीनबेनचा आवाज फारच मधुर होता. संगीताची आवड असलेली पेरीनबेन पॅरिसमधील सुप्रसिद्ध ऑपेरा गायिकेकडे संगीताचे शिक्षण घेऊ लागली. गाण्यातील शब्दाचे उच्चार ती फ्रेंच मातृभाषा असलेल्या व कसलेल्या गायिकेसारखे करत असे. शिक्षिकेला वाटत होते आपल्या कामासाठी आपल्याला वारसदार मिळाला; पण पेरीन मात्र संगीताकडे आपली आवड व छंद म्हणून पाहत होती. तिचे ध्येय वेगळेच होते. पेरीनबेन पॅरिसमध्ये असताना मादाम भिकाई कामा यांच्या फारच जवळ आली. दादाभाईंनी स्वतः मादाम कामा यांना पेरीनकडे जातीने लक्ष द्यायला सांगितले होते. मादाम कामांमुळेच पेरीनबेन सरदारसिंग राणा, सावरकर व श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या संपर्कात आली. मादाम कामा यांच्या विनंतीवरून पॅरिसहून लंडनपर्यंतच्या प्रवासात पेरीनबेन सावरकरांच्या बरोबर राहिली. सावरकरांना लंडनला उतरल्याबरोबर अटक होणार होती. म्हणून सावरकरांनी तिला आपण उतरल्यावर थोड्या वेळाने उतरायला सांगितले होते. लंडनच्या तुरुंगात ती कुमारी आरदेशर या नावाने सावरकरांना भेटूनही आली. सावरकरांना फ्रान्सला परत पाठवावे म्हणून मादाम कामानी जो ब्रिटिश सरकारबरोबर वैधानिक लढा दिला त्यात पेरीनबेनची मादाम कामा यांना मोठीच मदत झाली.

पेरीनबेन आणि महात्मा गांधी यांची भेट 1906 मध्ये लंडनमध्ये प्रथम झाली. त्या वेळी गांधीजी आपल्या दक्षिण आफ्रिकेतील कामासाठी पाठिंबा मिळवण्यासाठी लंडनमध्ये गेले होते. जमशेटजी टाटा यांनी लंडनमध्ये एक मेजवानी आयोजित केली होती. त्या

मेजवानीला गांधीजींना आमंत्रण होते. नौरोजी कुटुंबाला अर्थातच होते. गांधीजी आणि नौरोजी भगिनींची ओळख झाल्यावर त्यांनी त्या दोघींना द. आफ्रिकेला येऊन आपल्याबरोबर काम करण्याची विनंती केली. 1915 मध्ये त्यांची मुंबईला जहांगीर पेटीट यांच्या घरी गांधीजींशी परत भेट झाली. या भेटीनंतर 1918 मध्ये पेरीनबेन, गोशीबेन व खुर्शीदबेन या तिघीही नौरोजी भगिनींनी गांधीजींबरोबर काम करण्याचे ठरवले. तिघीही खादीधारी बनल्या. मादाम कामा आणि त्यांचे क्रांतिकारी मित्र यांचा पेरीनबेनवर खूपच मोठा प्रभाव पडला. हिंदुस्थानात जाऊन आपण क्रांतिकारकांनाच मदत करण्याचे त्यांनी ठरवले होते. क्रांतिकारकांशी होणाऱ्या त्यांच्या भेटीगाठी ब्रिटिश शासनाच्या नजरेतून सुटल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या सर्व पत्रव्यवहारावर नजर ठेवण्याच्या आज्ञा मुंबई पोलिसांना दिल्या गेल्या; पण हिंदुस्थानात आल्यावर त्या तिघीही बहिणीत एकदम आमूलाग्र बदल घडला तो गांधीजींमुळे. स्त्रियांना सर्व प्रकारच्या चळवळीत सामील करून घेण्यासाठी पेरीनबेन गांधीजींकडे आग्रह धरत. गांधीजींबरोबर चंपारण्यात जाण्यासाठीही त्यांनी हट्ट धरला. ब्रिटिश पोलीस महिलांशी जर मर्यादा सोडून वागले, तर ते आपल्याला चालणार नाही म्हणून आपण आपल्याबरोबर येण्याची परवानगी नाकारतो, असे गांधीजींनी त्यांना सांगितले. पण दांडी यात्रेच्या वेळी मात्र पेरीनबेन आणि सरोजिनी नायडू यांनी गांधीजींशी युक्तिवाद करून मिठाच्या सत्याग्रहात भाग घेण्यात यश मिळवलेच. त्यांचा आदर्श ठेवून अनेक ठिकाणी बायकांनी मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. यानंतरही गांधीजींनी सुरू केलेल्या अनेक प्रकारच्या सत्याग्रहात पेरीनबेन आग्रही राहिली. क्रांतिकारकांचा तिच्यावरचा प्रभाव पार पुसला गेला. हिंसेपेक्षा अहिंसा हाच स्वातंत्र्याकडे जाणारा मार्ग आहे, असा तिचा एकूण समज झाला. गांधीजींच्या प्रभावाखाली तिला अहिंसा, खादी, स्वदेशी व्रत यांचे महत्त्व पटले. सावरकर रत्नागिरीच्या तुरुंगात असताना आणि नंतर नजरकैदेत असताना तिने सावरकरांची कधी भेट घेतली नाही. ही गोष्ट तिच्या मनावरील क्रांतिकारकांचा प्रभाव पार पुसून गेल्याचेच लक्षण आहे.

गोशी, पेरीन व नरगीस या तीन नौरोजी भगिनींचे विवाह कॅप्टन कुटुंबातील तीन सख्ख्या भावांशी झाले. त्यामुळे स्वातंत्र्यलढ्यात त्या कॅप्टन भगिनी म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. गंमत म्हणजे, पेरीन व गोशीबेनचे पती सॉलीसिटर होते, कायद्याचे पालन करणारे होते, तर त्यांच्या बायका कायदेभंग करणाऱ्या होत्या; पण तरीही त्यांचे पती त्यांच्या कामाच्या आड कधी आले नाहीत, हे कौतुकमिश्रित आश्चर्यच. उलट गोशीचा नवरा सॉलीसिटर मानेकजी यांनी गांधीजींना काही महत्त्वाची कागदपत्रे तयार करायला मदत केली होती; पण तिघींचेही नवरे राजकारणात नव्हते.

स्त्रियांनी स्वातंत्र्याच्या लढ्यात उतरावे यासाठी 'राष्ट्रीय स्त्री सभा' नावाची सभा मुंबईत स्थापन करण्यात सरोजिनी नायडू यांचा पुढाकार होता. त्या सभेच्या पाच पदाधिकाऱ्यांत तीन पारशी महिला संस्थापक पदाधिकारी होत्या. पेरीनबेन त्या सभेच्या सहसचिव व गोशीबेन उपाध्यक्ष होत्या. या सभेची स्थापना एप्रिल 1921 मध्ये झाली.

सुप्रसिद्ध नेत्यांची भाषणे, खादीची घरोघर जाऊन विक्री, खादीची प्रदर्शने भरविणे, टिळक फंडासाठी देणग्या मिळविणे इत्यादी कामे राष्ट्रीय सभेने केली. या सभेचे महत्त्वाचे काम होते—स्त्रियांना राष्ट्रवादाची शिकवण देणे, समाजातील कुप्रथांना विरोध करणे, स्त्रियांना स्वावलंबनाचे धडे देणे आणि त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे तसेच खादीतून अर्थार्जन करणे. माटुंगा (मुंबईतील एक उपनगर) येथे हरिजन मुलांसाठी शाळा सुरू करून त्यांना सूतकताईचे शिक्षणही ह्या सभेने सुरू केले. विक्री व निर्मिती हे पेरीनबेनने आपले ध्येय मानले होते. खादीवर भरतकाम करण्यासाठी लागणारे धागे तिने तयार करून घेतले. संपूर्ण स्वातंत्र्याचा नेहरूंनी मांडलेला ठराव पास झाल्यावर राष्ट्रीय सभेने रचनात्मक कामाबरोबरच काही आंदोलनात्मक ठोस काम करावे, असे ठरवले आणि त्यासाठी 'देश सेविका संघ' नावाची एक स्वयंसेविका संघटना कॅप्टन भगिनींनी सुरू केली. या स्वयंसेविकांचा खादीची केशरी रंगाची साडी आणि पांढरा पोलका असा गणवेष होता. या सेविकासंघात सर्व जाती–धर्माच्या मुली असल्यामुळे साडी पाचवारीच असावी असे ठरले. (त्यावेळच्या समाजात त्याला गोल साडी म्हणत. गोल साडी ही 1942 नंतर हळूहळू महाराष्ट्रात सर्रास वापरली जाऊ लागली.) या स्वयंसेविकांची मुंबईत होणारी संचलने पाहण्यास लोक दुतर्फा उभे असत. या संघाने 1930 च्या मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. मुंबईच्या चौपाटीवर जाऊन मीठ तयार केल्याबद्दल एका पाठोपाठ एक सर्व स्वयंसेविका गजाआड झाल्या.

पेरीनबेन मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या 'वॉर काऊन्सिल'ची पहिली महिला अध्यक्ष नेमली गेली. मुंबईतील बायकांची सत्याग्रहासाठी संघटना तिने कौशल्यपूर्ण रितीने तयार केली. देशसेविका संघाच्या सदस्य महिलांना घेऊन दारूच्या दुकानांवर निदर्शने, परदेशी कापडांच्या होळ्या, प्रभात फेऱ्या, टकळी आणि चरखा चालविण्याचे शिक्षण इत्यादी कामे केली. राष्ट्रीय स्त्री सभा आणि देशसेविका संघ यांच्या या कार्यक्रमामुळे त्यांच्यावर बंदी आली. या बंदीच्या विरोधात पेरीन कॅप्टनच्या नेतृत्वाखाली गणवेषधारी स्वयंसेविकांचा मोर्चा मुंबई चौपाटीवरून आझाद मैदानावर गेला. राष्ट्रीय स्त्री सभा आणि देशसेविका संघ या संस्थांनी स्त्रियांच्या तत्कालीन महिला मंडळाकडून अपेक्षित असलेल्या कामापेक्षा वेगळे काम केले. स्त्रियांची शक्ती ही देशाच्या हितार्थ वापरण्याचा हा नवा मार्ग पेरीन कॅप्टन, गोशी कैप्टन, सोफिया खान या महिलांनी केला आणि गोशीबेन यानी 'गांधी सेवा संघ' स्थापन केला. विशेषतः खादी आणि ग्रामोद्योग यांना चालना देण्याचे काम या संघाने केले. आजपर्यंत गांधी सेवा संघ चालू आहे. मुंबईच्या अनेक चौकात खादी आणि ग्रामोद्योगाच्या सर्व वस्तूंचे दरवर्षी



*राजकीय सभेला संबोधित करताना*
*पेरीनबेन कॅप्टन मुंबईतील चौपाटीवर, 1930*

गांधी जयंतीच्या सप्ताहात गांधी सेवा संघातर्फे प्रदर्शन आणि विक्री होते. पेरीनबेन 1958 पर्यंत या संस्थेच्या संस्थापक सचिव या नात्याने कार्यरत होत्या. 1940 च्या वैयक्तिक सत्याग्रहात त्यांनी सत्याग्रह केला. 1942 च्या 'चले जाव' आंदोलनात पेरीनबेन, गोशीबेन आणि खुर्शीदबेन बरेच दिवस स्थानबद्ध होत्या.

कॅप्टन पेरीन 1910 साली भारतात परत आल्या त्या वेळीच त्यांना जुलमांचा अनुभव आला. दक्षिण भारताची ओळख करून घेत घेत त्या येणार होत्या. मद्रास स्टेशनवर गोशीबेन आणि पेरीनबेन पहिल्या वर्गाच्या डब्यात चढल्या. त्या डब्यात आधीच बसलेल्या पाच गोऱ्या मॅडम होत्या. पेरीन आणि गोशीबेनला डब्यातून खाली उतरायला सांगितले. फ्रान्स आणि लंडनमध्ये या दोघींना कधीही अशी वागणूक मिळाली नव्हती. या भूमीत हा प्रकार घडतो आहे ह्याची दोघी भगिनींना चीड आली. 'पहिल्या वर्गाचे तिकीट काढले आहे आणि काहीही झाले तरी उतरणार नाही', असे पेरीनबेनने गोऱ्या बायांना ठणकावले. गोऱ्या बायांनी स्टेशनमास्तरकडे तक्रार केली. योग्य तिकीट घेऊन योग्य डब्यात बसलेल्या प्रवाशांना आपल्याला उठवता येत नाही असे स्टेशनमास्तरनी सांगितल्यामुळे त्यांना नाइलाजने या बायांबरोबर प्रवास करावा लागला. या प्रसंगाचे साम्य गांधीजींना द. आफ्रिकेत मिळालेल्या वर्णद्वेषी वागणुकीसारखेच आहे.

पेरीन केप्टन यांनी स्वातंत्र्य मिळालेले पाहिले. स्वातंत्र्यानंतर एक दशक त्यांनी खादी व हिंदी भाषेच्या प्रचारार्थ देह झिजवला. विजापूरच्या जेलमध्ये त्यांना संधीवात झाला आणि त्याने जन्मभर त्यांची साथ सोडली नाही. असली अपंग करणारी व्याधी बरोबर घेऊन त्यांनी खादी व हिंदी भाषा प्रचाराचे काम केले. 17 फेब्रुवारी 1958 रोजी त्यांनी देह ठेवला. पेरीनबेन आणि त्यांच्या बहिणी यांनी ऐहिक सुखावर लाथ मारून स्वातंत्र्यलढ्यात झोकून दिले होते; पण आज त्यांची कर्मभूमी मुंबई इथेही त्यांचे नामोनिशाण राहिलेले नाही याचे फार दुःख होते.

■ ■

## जेठीबेन (1906–1978)

मुंबईचे 'मणिभवन' हे स्वातंत्रसैनिकांचे तीर्थक्षेत्र आहे. महात्मा गांधी मुंबईत आले, की त्यांचे वास्तव्य या वास्तूत असे. पद्मभूषण कै. उषा मेहता हयात असताना दिवसभर स्वातंत्र्यसैनिकांचा राबता त्यांची भेट घेण्यासाठी असायचा. अशा भेट घेणाऱ्यांपैकी नेहमी येणाऱ्या व उषाबेनशी प्रेमाचे नाते जपणाऱ्या एक स्वातंत्र्यसैनिक म्हणजे 'जेठीबेन' सिपाहीमलानी.

माझी व जेठीबेन यांची ओळख उषाबेननी 'मणिभवन'मध्येच करून दिली. बऱ्यापैकी उंच, शिडशिडीत व तरुणपणातील सौंदर्याची साक्ष देणारा चेहरा, गोरा रंग, खादीची सफेद

साडी, मनगटापर्यंत लांब हात असलेला व लहानशी कॉलर असलेला, साडीत पूर्णपणे खोचलेला पोलका घातलेल्या या बाईची समोरच्या व्यक्तीवर झटकन छाप पडे. जेठीबेन गांधीजींचे दर्शन घेण्याकरिता वारंवार 'मणिभवन'ला भेट देत व उषाबेनशी गप्पा मारून जात. प्रसंगाप्रसंगाने जेठीबेनची माहिती उषाबेनकडूनच कळत गेली.

हिंदुस्थानची फाळणी झाली व सिंध पंजाबमधून मुंबईत माणसांचे लोंढे आले. त्यातलेच एक सिपाहीमलानी कुटुंब. पण जरा आधी आलेले. सिंध प्रांतातल्या हैद्राबादचे. जेठीबेनचा जन्म विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात झाला. शालेय व कॉलेजचे शिक्षण हैद्राबादेतच झाले. 1925 साली त्या मॅट्रिक झाल्या व हैद्राबादच्याच कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला होता. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या मुली त्या वेळी कॉलेजमध्ये जात. खालमानेने त्या जात-येत. जेठीबेनसारखी आपला वेगळा ठसा उमटविणारी मुलगी त्या काळच्या समाजाच्या दृष्टीने अगदीच अनोखी होती. कॉलेजमध्ये शिकत असताना त्या गांधीजी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, जयरामदास दौलतराव, आचार्य कृपलानी, जमशेटजी मेहता, सिंध प्रांताचे आमदार गिडवानी इत्यादी काँग्रेस नेत्यांच्या संपर्कात आल्या व या श्रीमंत घरातील मुलीच्या जीवनाला एक नवीच दिशा मिळाली.

1922 मध्ये ब्रिटिश शासनाने 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया' कायद्यात सुधारणा का व कोणत्या कराव्यात हे पाहण्याकरिता सर जॉन सायमन व सहा ब्रिटिश सांसदांचे एक कमिशन नेमले. हिंदुस्थानच्या इतिहासात ते 'सायमन कमिशन' नावाने प्रसिद्ध आहे. हा कायदा हिंदुस्थानच्या राज्य-कारभारासाठी होणार असल्यामुळे त्यात एकही हिंदी माणूस नसणे, हा देशाचा अपमान होता. या सायमन कमिशनवर बहिष्काराची निदर्शने भारतभर झाली. त्याला काळे झेंडे दाखवून 'सायमन गो बॅक' अशा घोषणा देशभर दिल्या गेल्या. विद्यार्थ्यांनी सायमन कमिशनवर सर्वत्र जोरदार निदर्शने केली. हैद्राबादमध्ये जेठीबेननी अशा विद्यार्थ्यांना नेतृत्व देऊन स्वातंत्र्यसंग्रामात पहिली उडी घेतली. तिथून पुढे त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही.

1930 मध्ये गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहासाठी हाक दिली. या सत्याग्रहातही जेठीबेननी कराचीत सत्याग्रह केला. त्यांना अटक होऊन शिक्षाही झाली. गांधी–आयर्विन करारानंतर सत्याग्रहींची सुटका करण्यात आली. त्यात जेठीबेनचीही सुटका झाली. उच्च शिक्षण घेतलेल्या या मुलीला चांगल्या पगाराची नोकरी त्या वेळी मिळणे अगदी शक्य होते. पण जेठीबेननी मार्ग धरला तो देशसेवेचा. मिठाच्या सत्याग्रहात पोलिसांनी केलेल्या निर्घृण अत्याचाराने घायाळ झालेल्या जखमी सत्याग्रहींची शुश्रूषा करण्याला त्यांनी प्राधान्य दिले. या त्यांच्या कामामुळे सिंधी जनता त्यांना जेठीदीदी म्हणू लागली. जेठीबेन ही त्यांना उषा मेहता यांनी दिलेली गुजराथी पद्धतीची उपाधी.

1935 मध्ये ब्रिटिश सरकारने 'प्रांतिक स्वायत्ततेचा कायदा' पास केला. 1937 मध्ये हिंदुस्थानमध्ये अकरा प्रांतिक राज्ये निवडणुकीच्या तत्वावर निर्माण झाली. जेठीबेन या निवडणुकीत विजयी होऊन कराची लेजिस्लेटिव्ह असेंबलीच्या माननीय सदस्य बनल्या.

कराची म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्येही त्या निवडून आल्या तेव्हा त्या चोवीस वर्षांच्या होत्या. आपल्या मतदारसंघाची कामे करत त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला. आपल्या या सुंदर, सुशिक्षित व स्वतः निवडलेल्या कामात प्रस्थापित झालेल्या मुलीचा विवाह व्हावा असे माता-पित्यांना वाटणे साहजिकच होते. सिंधी समाजात त्या वेळी 'दहेज' द्यावा लागत असे. शिवाय सुखवस्तू घरातल्या मुलींची लग्ने नवाबी डामडौलात होत. त्यामुळे आई–वडील कर्जबाजारी होत. समाजात फक्त अशी आणि अशीच लग्ने होत. अशा लग्नाला जेठीबेनचा विरोध होता. आणि या पद्धतीला विरोध म्हणून त्यांनी स्वतः लग्नच केले नाही. इतर अशा प्रकारे होणाऱ्या नातेवाइकांच्याही लग्नावर त्या बहिष्कार घालत. अखेरपर्यंत त्यांनी सिंधी समाजात अशा लग्नाच्या विरोधात प्रचार केला. लोकप्रतिनिधी म्हणून सिंध प्रांतात काम करताना प्रत्येक वेळी त्यांच्या स्वतःच्या कार्यक्रमपत्रिकेवर महिला व बालकल्याण या विषयाला प्राधान्य असे.

1942 ला 'चले जाव'चे आंदोलन सुरू झाले. त्या वेळी प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांना स्थानबद्ध केले. जेठीबेनही त्यातून सुटल्या नाहीत. त्यांची कराचीच्या तुरुंगात रवानगी झाली. खटलाच चालला नाही. त्यामुळे सुटकाही झाली नाही.

1946 ला हिंदी स्वातंत्र्याचा कायदा झाला व हिंदुस्थानची फाळणी होण्याचे नक्की झाले. सिंध प्रांत ब्रिटिशांच्या लबाडीमुळे पूर्णपणे पाकिस्तानात जायचा होता. बंगाल व पंजाब या प्रांतांचेही तुकडे होऊन ते धर्मसंख्येप्रमाणे पाकिस्तान व हिंदुस्थानात वाटले जाणार होते. सिपाहीमलानी कुटुंबाला कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तानात राहायचे नव्हते. त्यामुळे स्वातंत्र्य मिळण्याची तारीख ठरण्यापूर्वीच त्या परिवाराने आपले बस्तान हैद्राबादहून मुंबईकडे हलवले. तो परिवार मुंबईत स्थायिक झाला. 14 ऑगस्ट 1947 पासून पाकिस्तानात रक्ताचे पाट वाहिले. अनेक निरपराध माणसांच्या कत्तली झाल्या. लोकांचा समज होता, की सत्तांतर शांतपणे होईल. क्रौर्याचा डोंब उसळेल असा विचारही कुणाच्या मनात न आल्यामुळे तिथेच पाळेमुळे असलेले लोक पाकिस्तान सोडायला कबूल नव्हते. त्यांची वित्तहानी झाली. यापेक्षा मोठे दुःख होते जिवलगांना बळी पडताना पाहावे लागल्याचे. मुले-बाळे, आजारी, म्हातारे यांचे काबिले घेऊन भारतीय हद्द गाठण्याच्या कसरतीतही अनेक जण प्राणाला मुकले. बहुसंख्य लोक दिल्ली व मुंबई शहराकडे वळले.

जेठीबेननी मुंबई व दिल्ली येथे निर्वासितांच्या पुनर्वसनाचे काम सुरू केले. राहायला घर नाही, हातात पैसा किंवा अंगावर दागिना तर सोडाच, पण अंगभर वस्त्र व अंथरूण-पांघरूणही नाही. अशा अवस्थेत निर्वासित छावण्यांमध्ये लोक मरण येत नाही म्हणून जगत होते. जेठीबेन मुंबईत त्यामानाने बऱ्याच सुस्थापित झाल्या. आपल्या समाजबांधवांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी कंबर कसली. 'नवजीवन सहकारी गृहसंस्था' स्थापन केली. आपल्या स्वतःच्या मालकीचा सर्व जमीनजुमला त्यांनी नवजीवन सोसायटीला दान केला. आजही मुंबई सेंट्रलच्या एका नाक्यावर ही प्रचंड सोसायटी उभी

आहे. मुंबईत पूर्वी आलेल्या सिंधी व इतर समाजांतील लोकांना बरोबर घेऊन जागोजागी मुंबईत जेठीबेननी नवजीवनच्या वसाहती उभारल्या. या वसाहतीतच जीवनावश्यक सर्व सुविधा देण्याचा जेठीबेन यांनी आटोकाट प्रयत्न केला. या वसाहतीत सिंधी माध्यमाची शाळा, सार्वजनिक आरोग्य केंद्र, बँक, पोस्ट ऑफिस, समाजकल्याण सभागृह, बगीचा अशा सुविधा देऊन या वसाहती परिपूर्ण करण्यावर जेठीबेननी भर दिला. जेठीबेनच्या या असामान्य कामगिरीमुळे सर्वस्व गमावून देशोधडीला लागलेल्या जवळ-जवळ पंधरा हजार परिवारांना रास्त दरात घरे मिळाली.

जेठीबेननी फक्त मुंबईतच नवजीवन सोसायटीच्या माध्यमातून निर्वासितांकरिता काम केले असे नाही, सिंधच्या लगत कच्छमध्ये नवजीवन सोसायटीच्या माध्यमातून विकलांग मुलांसाठी 'हॅपी होम' नावाची संस्था सुरू केली. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य वाखाणण्यासारखे आहे. तांत्रिक शिक्षणाची गरज त्यांनी ओळखली होती. अशा शाळा सुरू करण्यास त्यांची सक्रिय मदत असे. मुलींचे शिक्षण, महिला कल्याण व स्त्रियांचे अधिकार याबाबत त्या सदैव जागरूक असत. मुलींनी शिकून स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी त्या प्रयत्नशील असत. स्वतःच्या लग्नाचा निर्णय स्वतः विचारपूर्वक घ्यावा व साधेपणाने विवाह संपन्न करावा असे त्या मुलींना, विशेषतः सिंधी मुलींना सांगत. नोकरी करणाऱ्या मुलींना व स्त्रियांना राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी 'गांधीग्राम' येथे एका 'महिला वसतिगृहांची' स्थापना केली. इंजिनीअरिंग, वैद्यकीय आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थी आणि खासकरून विद्यार्थिनींसाठी शिष्यवृत्तीची सोय त्या करत असत. निरनिराळ्या हॉस्पिटलमधील गरीब, गरजू रुग्णांना औषध-पाणी व आहार यासाठी आर्थिक मदत देण्याचे काम त्या नवजीवन सोसायटीच्या माध्यमातून करत असत. साधनहीन वर्गाच्या सर्वांगीण विकासाकरिता काम करणाऱ्या नवजीवन सोसायटीने आपले 'नवजीवन' हे नाव जेठीबेनचे मार्गदर्शन व सक्रिय साहाय्यामुळे सार्थ केले.

स्वातंत्र्यानंतर मुंबई राज्याच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर त्या निवडून गेल्या. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर कायदेमंडळाची नावे विधानसभा व विधानपरिषद अशी झाली. विधान परिषदेत त्यांनी उपाध्यक्षा म्हणून काम केले. सर्व सिंधी समाजच मुंबईच्या समाजाशी फार लवकर एकरूप झाला. जेठीबेन तर त्यांची नेताच. ती त्यांना अपवाद कशी असेल? त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कार्याबद्दल श्रद्धांजली वाहताना त्यांचा गौरव मोरारजीभाई देसाई यांनी 'आदरणीय महिला सेनानी' या शब्दात केला. सामान्य जनतेच्या संपर्कात राहून त्यांच्यासाठी अविरत काम करण्याचे व्रत त्यांनी घेतले व पाळले. हुंडा देऊन नवरा विकत घेऊन स्वतः गुलाम म्हणून जगू नका. लग्न ही खाजगी बाब आहे. लग्न सोहळे करून संपत्तीचे प्रदर्शन (व खरे म्हणजे हौसेच्या नावाखाली कष्टाच्या पैशाचा नाश) टाळा. हा त्यांचा त्या काळात मुलींना केलेला उपदेश आजच्या मुलींपर्यंत पोहोचेल तीच जेठीबेनना खरी आदरांजली.

■ ■

# म. गांधींच्या प्रभावाने स्वातंत्र्य चळवळीत आलेल्या मुस्लीम महिला

इ.स. 1857 मधे भारतीयांनी इंग्रजांविरुद्ध मोठा उठाव केला. तो संघटित नव्हता तरीही या उठावात भारतातील स्त्री–पुरुषांनी भाग घेतला. सर्वांचे एकच ध्येय होते भारतातून इंग्रजांची सत्ता उलथवून लावायची आणि त्यांना त्याच्या देशात पाठवायचे. पुढे हा वणवा मोठ्या प्रमाणात भारतभर पेटला. वर्ष-दीडवर्ष तो विझला नाही. यात स्त्रियांचाही विशेषत्वाने सहभाग होता. 1975 साली आंतरराष्ट्रीय महिला दिन जगभर साजरा झाला. त्या वेळेपासून आजपर्यंत निरनिराळ्या क्षेत्रात स्त्रियांनी जी कामगिरी केली त्याकडे जगाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न अभ्यासक करू लागले. परंतु भारतीय स्वातंत्र्यलढ्यात ग्रामीण, दलित, आदिवासी, पारशी, ख्रिस्ती आणि मुस्लीम स्त्रियांच्या योगदानाबद्दल सांगोपांग अभ्यास अजून झालेला नाही.

तरीही गांधीजींच्या प्रेरणेने स्वातंत्र्यलढ्यात लाखो भारतीय महिलांनी आपले योगदान दिले आहे. मुस्लिम महिला त्याला अपवाद कशा असतील? गांधीजींच्या प्रेरणेने आपली ताकद, उत्साह आणि जिद्दीने स्वातंत्रलढ्यात झोकून दिलेल्या मुस्लिम महिलांचा परिचय करून देण्याचा हा प्रयत्न. ज्यांना फक्त बुरख्यात गुंडाळले जाते आणि कधीही घराबाहेर पडू दिले जात नाही त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात हिरीरीने भाग घेतला. ह्या लेखामध्ये अशा काही महिलांची ओळख करून द्यायचा प्रयत्न आहे ज्यांना तुम्ही ओळखत असाल पण स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचा संघर्ष फारसा आठवत नाही. या आता इतिहासाच्या संग्रहात हरवल्या गेल्या आहेत तर प्रत्यक्षात त्या अमर स्त्रिया आहेत. हा लेख म्हणजे 1857 ते 1947 या काळातील मुस्लिम भगिनींनी भारताच्या स्वातंत्र्याकरिता केलेल्या योगदानाचा एक संक्षिप्त आढावा.

1857 च्या स्वातंत्र्यसंग्रामात बेगाम हजरत महल, दिल्लीचा बादशहा जफर यांची बेगम 'झीनत महल', 'अजीजन' नावाची नर्तिका यांचा उल्लेख वर आलेलाच आहे. त्याशिवाय इग्रजांनी फाशी दिलेल्या उत्तर प्रदेशातील महिलांमध्ये हबीबा, जमाली आणि मेहरी अशा तिघींची नावे आढळतात. दिल्लीच्या मोहसिना नावाच्या क्रांतिकारी महिलेला 8 डिसेंबर 1857 ला फाशी दिली होती. मुजफ्फरनगरचा नेता काजी अब्दुल रहिमखाँची

आई असगरी बेगमला इंग्रजांनी जिवंत जाळले आणि बख्तावरीला फाशी दिली होती.

विसाव्या शतकात बेगम हसरत मोहानी यांचे नाव घेतले जाते. जनाब हसरत मोहानी यांना अटक झाल्यावर त्यांचा प्रेस चालवण्याचे काम तिने केले. हसरत मोहानी सुटून आल्यावर त्यांच्याबरोबर प्रत्येक राजकीय चळवळीत भाग घेतला. बेगम मोहमद अली याही आपल्या पतीबरोबर काँग्रेसच्या कामात उतरल्या होत्या. महात्मा गांधींचे मत त्यांच्याबद्दल फार चांगले होते. 'आपल्या पतीपेक्षाही तिचे वक्तृत्व फर्डे व हृदयस्पर्शी असते', असे गांधीजी म्हणत. मुसलमान स्त्रियांच्या सभा त्या घेतच, पण अन्य समाजातील स्त्री–पुरुषांच्याही सभा घेत. मात्र सभेत त्या बुरखाधारी असत. बेगम हसरत मोहानी व बेगम मुहम्मद अली यांनी सामाजिक, राजकीय कार्य करायला पडदा आड येत नाही हे सिद्ध केले. त्यांनी इतरांना आदर्श घालून दिला. याच काळात त्या दोघींनीही खादीचा प्रचार केला. त्या स्वतः खादीधारी होत्या. बेगम हसरत मोहानी यांचा काँग्रेसमधील जहाल गटाशी संबंध होता. त्यामुळे त्यांना सश्रम कारावासाची शिक्षा झाली होती. त्यानंतर त्यांनी बुरखा वापरणे बंद केले. 'समाजापुढे बिनाबुरखा येणारी व खुल्लमखुल्ला राजकीय कार्य करणारी ती पहिली मुसलमान स्त्री होती', असे मत इतिहास तज्ज्ञ आशारानी व्होरा यांनी व्यक्त केले आहे. स्त्रियांना मताधिकार असावा या मागणीसाठी 1897 मध्ये लॉर्ड माँटेग्यू यांना भेटलेल्या महिला समितीच्या त्या सदस्य होत्या. अरुणा असफअलींच्या सासूबाई अकबरी बेगम यांनी असहकाराच्या चळवळीत भाग घेतला होता. खिलाफत व असहकाराच्या चळवळीत मुस्लिम स्त्रियांनी भाग घ्यावा, याबाबत त्यांची आग्रही भूमिका होती.


रेहाना तय्यबजी

बद्रुद्दीन तय्यबजी हे मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले भारतीय न्यायाधीश. त्यांची मोठी मुलगी अमीना तय्यबजीने काँग्रेसच्या अधिवेशनात विषय नियामक समितीवरही काम केले. बडोदा येथील परदेशी मालाच्या होळीत त्यांचा पुढाकार होता. बद्रुद्दीन यांची दुसरी मुलगी सकीना लुकमानीला सविनय कायदेभंगाच्या चळवळीत 4 महिने सक्तमजुरी व 100 रुपये दंड झाला. सकीना त्यावेळी 65 वर्षांच्या होत्या. धाकटी बहीण सफिया जबीरअली, वहिनी अख्तर तय्यबजी यांचाही या आंदोलनात सहभाग होता. अब्बास तय्यबजी यांची मुलगी रेहाना तय्यबजी यांनी आजन्म देशसेवेला वाहून घेतले होते. त्या कडव्या गांधीवादी होत्या. रेहाना तय्यबजींना गांधीजी आपल्या मुलीप्रमाणे मानत. त्या दोघांचा पत्रव्यवहार प्रसिद्ध आहे. कुराणाबरोबरच त्यांची कृष्णावरही भक्ती होती. येरवडा जेलमध्ये त्या भजने गात. त्यांचे सर्व आयुष्य साबरमती आणि दिल्लीच्या गांधी आश्रमात गेले. तय्यबजी कुटुंबातील फातिमा तय्यबजी, हमीदा तय्यबजी यांनीही स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेऊन शिक्षा भोगली. अस्पृश्यता निर्मूलन आणि शिक्षणविषयक कामात तय्यबजी कुटुंबातील सर्वच स्त्रियांचा पुढाकार

दिसतो.



*आबादी बानो बेगम*
*('बी अम्मा')*

आबादी बानो बेगम (बी.अम्मा) या एक धाडसी, राष्ट्रवादी महिला आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्वातंत्र्यसैनिक होत्या. बी.अम्मा या भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील मुस्लिम महिलांमधील एक प्रमुख चेहरा होत्या. बी अम्मा यांचा जन्म 1850 मध्ये उत्तर प्रदेशातील रामपूर जिल्ह्यातला. त्यांचा विवाह रामपूरच्या अब्दुल अली खान यांच्याशी झाला होता. पण त्या लहान वयातच विधवा झाल्या. पतीच्या निधनानंतर बानोने आपल्या मुलांचे संगोपन स्वबळावर केले. त्यांचे मुलगे मौलाना मोहम्मद अली जौहर आणि मौलाना शौकत अली हे खिलाफत चळवळ आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे प्रमुख चेहरे बनले. 1917 मध्ये, जेव्हा त्यांच्या दोन्ही मुलांना तुरुंगात टाकण्यात आले, तेव्हा त्या श्रीमती ॲनी बेझंट यांच्याबरोबर चळवळीत सामील झाल्या. त्यांच्या वतीने मोठ्या मुक्ती सभेला संबोधित केले आणि ब्रिटिशांविरुद्ध अभूतपूर्व भाषण केले.

1920 मध्ये गांधीजींच्या आवाहनावरून बी.अम्मांनी असहकार आंदोलनात भाग घेतला. खिलाफत चळवळ आणि असहकार आंदोलनात निधी उभारण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्या हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक होत्या. पण दुर्दैवाने बी.अम्मा यांना स्वतंत्र भारत पाहता आला नाही आणि 13 नोव्हेंबर 1924 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांचे दफन खादीच्या कपड्यात झाले.



*हजारा बीबी इस्माईल*

हजारा बीबी इस्माईल आणि मोहम्मद इस्माईल हे आंध्र प्रदेशातील गुंटूर जिल्ह्यातील तेनाली येथील स्वातंत्र्यसैनिक होते. या जोडप्यावर महात्मा गांधींचा खूप प्रभाव होता. त्यांनी स्वतःला खादी अभियान चळवळीत समर्पित केले. गुंटूर जिल्ह्यात, त्यांचे पती मोहम्मद इस्माईल यांनी खादीचे पहिले दुकान (खद्दर स्टोअर) उघडले त्यामुळे त्यांना 'खद्दर इस्माईल' असे टोपणनाव मिळाले. राष्ट्रीय चळवळीत सामील झाल्याबद्दल त्यांच्या पतीला वारंवार अटक होत असे. पण हजारा बीबी हिंमत हरली नाही. गांधींच्या मार्गाने जात असल्यामुळे त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार घातला गेला. पण हजारा बीबी यांनी त्याची पर्वा केली नाही आणि त्यांनी स्पष्ट केले, की त्यांचे कुटुंब गांधीजींच्या आदर्शांचे अनुसरण करत आहे आणि पुढेही करत राहणार. वारंवार तुरुंगवासामुळे त्यांच्या पतीची तब्येत बिघडली व 1948 मध्ये त्यांचा मृत्यू झाला. पतीच्या पश्चात त्यांनी मुलांसह खादीचे दुकान चालवले आणि शेवटच्या

श्वासापर्यंत त्यांनी खादी परिधान केली.



*नोआखालीच्या दंगलग्रस्त भागातून जाताना (1947) (डावीकडून) अत्मुस सलाम, गांधीजी आणि सुशिला नायर*

बीबी अम्तुस सलाम यांना महात्मा गांधींच्या 'दत्तक कन्या' म्हणत. त्या सामाजिक कार्यकर्त्या होत्या. फाळणीनंतरच्या जातीय हिंसाचाराचा मुकाबला करण्यात आणि फाळणीनंतर भारतात आलेल्या निर्वासितांचे पुनर्वसन करण्यात त्यांनी विशेष भूमिका बजावली. कलकत्ता, दिल्ली आणि डेक्कन येथे झालेल्या जातीय दंगलींमध्ये संवेदनशील भागात पुनर्वसन आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी अनेक प्रसंगी आपला जीव धोक्यात घातला. इंग्रजांच्या गुलामगिरीतून केवळ गांधीवादी पद्धतीनेच स्वातंत्र्य मिळू शकते, असा त्यांचा ठाम विश्वास होता. बीबी अम्तुस सलाम यांचा जन्म 1907 मध्ये पंजाबमधील पटियाला येथे राजपुताना कुटुंबात झाला. त्यांचे वडील कर्नल अब्दुल हमीद आणि आई अमातुर रहमान. अम्तुस सलाम ही सहा मोठ्या भावांची धाकटी बहीण होती. त्यांची प्रकृती लहानपणापासूनच नाजूक होती. त्यांना चळवळीची प्रेरणा त्यांचा मोठा भाऊ, स्वातंत्र्य सेनानी मोहम्मद अब्दुर रशीद खान यांच्याकडून मिळाली. महात्मा गांधी आणि सेवाग्राम आश्रमाच्या अहिंसा तत्त्वांकडे त्या आकर्षित झाल्या. तिने सेवाग्राम आश्रमात जाण्याचा निर्णय घेतला आणि 1931 मध्ये तेथे गेल्या. त्यांनी आश्रमातील कठोर तत्वांचे पालन केले. त्यांच्या निस्वार्थ सेवेमुळे त्या गांधी आणि कस्तुरबांच्या खूप जवळ आल्या. गांधीजी अम्तुस सलाम यांना आपली लाडकी मुलगी मानत. भारतीय राष्ट्रीय चळवळीदरम्यान, गांधीजींच्या परवानगीने आजारी असतानाही 1932 मध्ये त्या इतर महिलांसोबत तुरुंगात गेल्या. तुरुंगातून सुटल्यानंतर त्या सेवाग्रामला पोहोचल्या आणि गांधीजींची स्वीय साहाय्यक म्हणून जबाबदारी स्वीकारली. स्वातंत्र्य मिळवण्याबरोबरच हिंदू-मुस्लिम यांच्यातील सलोखा, हरिजन आणि महिलांचे कल्याण ही त्यांच्या जीवनाची महत्त्वाकांक्षा होती.

सोफिया सोमजी/खान ही मुंबईतील विद्यार्थिनी. तिला 1930 च्या सविनय कायदेभंगाच्या लढ्यात 4 महिन्यांची शिक्षा झाली. नंतर त्या सरहद प्रांतात गेल्या. पती व मुलेही तिकडेच गेली. सोफियाने जाण्यास बराच विरोध केला. पण आईला मुलाशिवाय व मुलांना आईशिवाय राहणे कठीण होते. नाइलाजाने त्या पाकिस्तानात गेल्या आणि दोन-तीन वर्षातच त्या मुंबईला परत आल्या, त्या परत न जाण्याच्या निश्चयाने. मुंबईत जन्मले व मुंबईतच मरणार हा त्यांचा निर्धार त्यांनी खरा केला. 1962 साली त्या पैगंबरवासी झाल्या.

म. गांधींच्या चळवळीत ज्याप्रमाणे मुसलमान स्त्रियांचा मोठा सहभाग होता, त्याप्रमाणेच सुभाषबाबूंच्या आझाद हिंद फौजेतही मुसलमान स्त्रियांचा मोठा सहभाग होता.

आझाद हिंद फौजेच्या झांशी रेजिमेंटमध्ये नसिफा नावाची 15 वर्षांची मुलगी घरातून पळून जाऊन राणी झांशी रेजिमेंटमध्ये भरती होण्यासाठी आली. घरची परवानगी असल्याशिवाय रेजिमेंटमध्ये भरती होता येत नसे. तिला घरी परत नेण्यासाठी आलेल्या आईबापांनी तिला ती आपल्यासाठी मेली असे समजू, असे सांगितले. नसिफाने आपल्याकडील सर्व वस्तू बहिणीकडे दिल्या आणि म्हटले, "हे सर्व दफन करा. मी खरेच मेले आहे. आज माझा देशाच्या स्वातंत्र्यासाठी पुनर्जन्म झाला आहे."

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात 1857 पासून 1947 पर्यंत अनेक मुस्लिम महिला सहभागी झाल्या. त्यांचे घराबाहेर पडणे आणि लढ्यात सहभागी होणे, हे फार मोठे दिव्यच होते. सामाजिक बंधने, अंधश्रद्धा आणि अतिरेकी धार्मिक भावना यांची बंधने तोडून स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणाऱ्या या स्त्रियांचे देशप्रेम आणि काम हे इतरांपेक्षा जराही कमी नव्हते, देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या या ज्ञात व अज्ञात मुस्लीम भगिनींना मानवंदना देण्यासाठी हा प्रपंच!

■■

## भारतप्रेमी सोफिया खान (1916–1961)



न्यायाधीश सोमजी हे मुंबईचे रहिवासी. अतिशय प्रगत विचारांचे खोजा मुसलमान. त्यामुळेच त्या काळच्या न्यायमूर्ती तय्यबजी यांच्या घराण्याप्रमाणेच सोमजींनीही आपल्या मुलींना कॉन्व्हेंट गर्ल्स स्कूल मध्ये घालून शिक्षण दिले. सोफिया ही सोमजींची 1916 साली जन्मलेली, गोरीगोमटी व देखणी मुलगी. 1930 ची दांडी यात्रा व त्यानंतर सुरू झालेला मिठाचा सत्याग्रह ही शाळेत जाणारी मुलगी पाहत होती. कमलादेवी चट्टोपाध्याय, हंसा मेहता, लीलावती मुंशी यांनी मुंबईमध्ये केलेला मिठाचा सत्याग्रह तिने पाहिला होता. त्यांचे धैर्य, कणखरपणा, भाषणे वगैरेंचा फार मोठा प्रभाव सोफियासारख्या संवेदनशील मुलीवर पडला नसता तरच नवल.

मुंबईतील स्त्री सत्याग्रहींची कामगिरी पाहून आपणही काही केले पाहिजे, ही उर्मी सोफियाला स्वस्थ बसू देईना. वडील जरी न्यायाधीश व सरकारी नोकर असले, तरी अत्यंत प्रामाणिक विचारांचे असल्यामुळे त्यांनी सोफियाला तिच्या मनाप्रमाणे काम करायला मूक संमती दिली. 1934 मध्ये सोफियाने दारूच्या दुकानांवर निदर्शने, परदेशी वस्तूंच्या दुकानावर निदर्शने, परदेशी कपड्यांच्या होळ्या अशा कार्यक्रमांत भाग घ्यायला सुरुवात केली. या कार्यक्रमात भाग घेतल्यामुळे सोफीयाला 3 महिन्यांची साधी कैद झाली.

पुण्याच्या येरवडा कारागृहातच त्या वेळी सर्व महिला सत्याग्रहींना ठेवत असत. सोफियाचीही रवानगी मुंबईहून येरवड्याला झाली. सोफिया त्या वेळी फक्त अठरा वर्षाची तरुणी होती. सळसळते गरम रक्त होते. येरवडा जेलमध्ये मेट्रन आणि जेलर इंग्रज होते. त्यांना तर स्वातंत्र्यसैनिकांबद्दल अतिशय द्वेष असे. आपल्या हातात असलेल्या सत्तेचा जास्तीत जास्त उपयोग करून राजबंद्यांना त्रास देण्यात त्यांना भूषण वाटे. म्हणून स्वातंत्र्यसैनिकांना ते कायदे बाजूला ठेवूनही खूप त्रास देत. सोफिया अत्याचार सहन करणारी नव्हती. तीने मेट्रन व जेलर याना आपल्या खोड्यांनी सतावायला सुरुवात केली. तिच्या बरोबरीच्या वयाच्या तरुणीही त्यात सामील झाल्या. मेट्रन आणि जेलर यांच्या नाकी दम आला. सोफियाचे म्हणणे, 'आपण कायदेभंगाच्या चळवळीतल्या पाईक आहोत — जेलचेही कायदे न पाळणे आपला धर्म आहे.' या मुलीचे काय करावे? हा प्रश्न अधिकाऱ्यांना पडला. अवंतिकाबाई गोखले त्या वेळी 'अ वर्ग' च्या कैदी होत्या. त्यांच्या कानावर सोफियाचे जेलमध्ये चालू असलेले प्रताप गेले. त्यांनी सोफियाची चांगलीच कानउघाडणी केली. कारागृहाचे नियम हे कारागृहातील शिस्तीसाठी असतात, ते पाळणे हे आपले सत्याग्रही म्हणून कर्तव्य आहे. कितीही त्रास झाला तरी आपण त्या पवित्र कामासाठी व थोर महात्म्याच्या आवाहनावरून कारागृहात आलो आहोत. त्याला बाधा येईल असे आपण वागता कामा नये. सोफियाला हे म्हणणे पटले असे नव्हे; पण अवंतिकाबाईंचा मुंबईतील एकूण दबदबा आणि त्यांचे महात्मा गांधींशी असलेले जवळचे संबंध लक्षात घेऊन सोफियाने आपल्या कारागृहातील खोड्या कमी केल्या असाव्यात.

सोफिया शिक्षा भोगून मुंबईला परत गेल्यावर काँग्रेस सेविका दलात जाऊ लागली. अखिल भारतीय काँग्रेसची सदस्य झाली आणि यापुढे हेच काम करायचे असे तिने ठरवले. शिक्षण बहुतेक संपलेच. काँग्रेस सेवा दल ही काँग्रेसची स्वयंसेवक संघटना होती. या संघटनेत मुले आणि मुली होत्या. मुलींचे सैनिक दल हा स्वतंत्र भाग होता. वय वर्षे 7 पासूनच्या मुली, तरुणी, स्त्रिया आणि वृध्दा या सर्व काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र आलेल्या होत्या. ही संघटना काँग्रेसची असल्यामुळे जे ध्येयधोरण काँग्रेसचे, तेच या संघटनेचे असे. राष्ट्र सेवा दलासारख्या यांच्या दैनंदिन शाखा नसत. खादीचे काम करणे, साक्षरता प्रसार, हिंदी प्रसार, सभेच्या वेळी शांतता आणि इतर व्यवस्था बघण्यासाठी कामे करणे, पत्रके पोहोचवणे, साथीच्या रोगाच्या वेळी काँग्रेसचे स्वयंसेवक म्हणून काम करणे, सत्याग्रह करणे, सत्याग्रहींना मदत करणे ही आणि अशा प्रकारची विधायक कामे करणे हे काँग्रेस सेवा दलाचे उद्दिष्ट होते. स. का. पाटील, पुरुषोत्तमदास टंडन, युसूफ मेहरअली वगैरे त्या वेळचे तरुण नेते काँग्रेस सेवा दलाशी जोडलेले होते. सोफिया काँग्रेस सेवा दलात जाऊ लागल्यावर तिची तडफ, कामाविषयी तळमळ व निष्ठा पाहून सोफियाची काँग्रेस सेविका दलाची प्रमुख म्हणून मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीतच नियुक्ती केली. 1934 मध्ये मुंबईला डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाची पूर्ण तयारी सोफियावर काँग्रेस सेविका दलाची प्रमुख म्हणून सोपविली गेली.

तरुणपणात क्वचितच दिसणारा कणखरपणा, सोबतीला रुबाबदार व्यक्तिमत्व, अत्यंत शिस्तबद्ध कामगिरीमुळे हे अधिवेशन फारच यशस्वीपणे पार पडले. सोफियावर अभिनंदनाचा वर्षाव झाला.

काँग्रेस सेवा दलाच्या स्त्री विभागची प्रमुख म्हणून सूत्रे हाती घेतल्यावर त्यांनी शिबिरे योजायला सुरुवात केली. शिस्तपालनाचे महत्त्व हा भाग तर होताच, पण मुलींचे धैर्य वाढेल, त्यांच्यात धीटपणा येईल, गर्दी थोपविण्याचे कसब, महत्त्वाच्या व्यक्तींचे आगत-स्वागत करणे, त्यांना सलामी देणे; शांतता राखणे आणि आपले डोके शांत ठेवून काम करणे हा या शिबिरांचा मुख्य उद्देश होता. अशा शिबिरांतून सूतकताई, खादीच्या कपड्यांचे गड्डे बांधणे, प्रदर्शने आयोजित करणे, ग्रामोद्योगाच्या वस्तूंची विक्री केली जाई. या शिबिरांतून राष्ट्रीय वृत्ती वाढीला लागण्याचे शिक्षण दिले जाई. महात्मा गांधींनी दाखवलेल्या मार्गावर काँग्रेस सेवा दलाचे काम चाले.

सोफिया सोमजी यांचा विवाह सादुल्लाखान यांच्याबरोबर झाला. सादुल्लाखान यांचे वडील डॉ. खानसाहेब हे नामवंत आणि प्रसिध्द खान अब्दुल गफारखान यांचे सख्खे काका. सोफियाला दोन मुलगे झाले. शमीन आणि अन्वर, या दोन्ही मुलांनी खान खानदानाला शोभेल असा नावलौकिक मिळवावा, अशी इच्छा सोफियाबेन हिची होती आणि ती पुढे सफळही झाली. 1942 च्या ऑगस्टमध्ये काँग्रसचे अधिवेशन मुंबईला गवालीया टँक मैदानावर भरणार होते. या अधिवेशनांत गांधीजी ब्रिटिश सरकारला भारत सोडून जाण्यासाठी निर्वाणीचा इशारा देणार होते. भारतभरातून लाखो लोक येणार होते. शिवाय स्थानिक होतेच. होणाऱ्या प्रचंड गर्दीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सोफिया यांच्याकडे होती. शिवाय नेत्यांच्या राहण्याची व्यवस्था पाहणे, प्रतिनिधींची बसण्याची सोय, पाण्याची व्यवस्था नित्याच्या अधिवेशनात असणाऱ्या गोष्टी इथेही उपलब्ध जागेत बसवता येतील तशा बसवायच्या होत्या. हे सर्व काम काँग्रेस सेविका दलाचे होते. प्रमुख म्हणून ही जबाबदारी सोफिया खान यांची होती. या कामासाठी एकमेकींना संदेश देणे इत्यादींचे प्रशिक्षण दिले जाई. त्यातूनच धैर्य, धीटपणा आणि गर्दी थांबवून ठेवण्याचे शिक्षण मिळे. काम शिस्तीत करून घेण्याची तालीम अगदी कसून होई. संचलनासाठी त्यांनी स्वयंसेविकांचे गट पाडले होते. त्या गटांची परेड तीन-चार तास चाले. सोफिया सकाळीच डबा घेऊन घराबाहेर पडत. एक मुलगा दोन वर्षांचा दुसरा तान्हा 4-6 महिन्यांचा, अंगावरचे दूध पिणारा होता. त्यासाठी दाई वेळेवर सोफियाकडे त्याला घेऊन जात. 1942 च्या अधिवेशनाची सर्व व्यवस्था पाहण्यासाठी एक स्वतंत्र कमिटी होती. त्यांत स. का. पाटील, युसूफ मेहरअली होते. पाटील समितीप्रमुख होते. जयाबेन हिशोबाचे काम पाहत. दिवसभराचे काम संपले, की समितीचा प्रत्येक सदस्य आपापल्या कामाचा अहवाल देई. त्यानंतर सोफियाबेन रोजचा रोज हिशेब जयाबेनला देऊन घराकडे चिमण्यांना भेटायला परतत. आजच्यासारखा त्याकाळी येण्याजाण्याचा खर्च काँग्रेसकडून दिला जात नसे. सोफियाबेनसकट सर्वच आपापले डबे घेऊन येत असत. फक्त अधिवेशनात प्रत्येकीला

जेवण मिळाले की नाही याची गटागटात फिरून चौकशी करत. लोभस व्यक्तिमत्व, मृदू भाषण, हसतमुख सोफियाबेन सर्वांच्याच गळ्यातल्या ताईत होत्या.

अधिवेशन समितीची जशी जय्यत तयारी चालू होती तशीच सरकारचीही जय्यत तयारी चालू होती. पोलीस तुकड्याही निष्णात होत्या. पोलिसांनी एक महत्त्वाची काळी यादी बनवली होती. त्यात सोफियाबेनचे नाव होते. 8 ऑगस्ट 1942 ला अनेक कार्यकर्त्यांची धरपकड झाली. त्यात सोफियाबेन सहित सर्व समिती पकडली गेली. सोफियाबेनना स्थानबद्ध म्हणून येरवडा जेलमध्ये पाठवले गेले. सोफियाबेनच्या जेलमधील कार्याबद्दल आणि इतर स्वातंत्र्यसैनिकाशी त्यांचे संबंध याबद्दलची माहिती डॉ. कमला अष्टपुत्रे यांची जीवन गाथा, अनुताई लिमये यांचे चरित्र आणि डॉ. उषाबेन मेहता यांच्या आठवणीतून मिळते. डॉ. कमलाताईच्या म्हणण्याप्रमाणे, त्या मोठ्या घरच्या असूनही, अगदी साध्या होत्या. त्या थोडे, पण वेचक बोलत त्यांची विनोदबुध्दी तीव्र होती. तान्हे मूल आणि नुकतेच बोलू लागलेले मूल घरी ठेवून आल्याची उदासिनता त्यांच्या चेहऱ्यावर कधीच दिसली नाही किंवा मुलांच्या आठवणींनी कधी व्याकूळ होताना त्या दिसल्या नाहीत. यावरून त्यांचा त्यांच्या भावनांवर खूप मोठा ताबा असावा, असे दिसते. त्या सदैव हसतमुख असत. त्या फारशा उंच नव्हत्या. थोड्याशा स्थूल असूनही चपळ होत्या. त्या कुणाच्याही अध्यातमध्यात नसत. तरीही राजकरणावरच्या गप्पा, विनोदबुद्धी यामुळे त्यांनी कधीही कटुता निर्माण केली नाही. बेगम तय्यबजींकडे त्या कुराणचा अभ्यास करत. जेलमध्ये मुंबई, पुणे असे सत्याग्रहींचे आपसात गट पडले होते. सोफियाबेन मुंबई गटाच्या खूपच आवडत्या होत्या. काँग्रेस सेवा दलामुळे त्यांना लहान, मध्यमवयीन आणि प्रौढ बायकाशी चांगले जमवून घेता येत होते.

सोफियाबेन या महत्त्वाच्या व्यक्ती असल्यामुळे त्यांना राहायला प्रशस्त जागा होती. त्यांच्याबरोबर मुंबईच्या देशसेविका संघाच्या किसन घुमटकर राहत होत्या. (पुढे 'पद्मविभूषण' पदवी मिळालेल्या स्वातंत्र्यसैनिक) उषा मेहता यांचीही त्याच जागेत सोय केली होती; उषाबेनना जे आवश्यक सामान जेलकडून 'अ वर्गीय' कैदी म्हणून मिळणे हक्काचे होते, ते तुटवडा आहे या सबबीखाली न दिल्यामुळे सोफियाबेननी मेट्रनला फैलावर घेतले. सामानाचा तुटवडा दोन मिनिटांत दूर झाला. उषाबेनना हक्काचे सामान मिळाले. राजबंदिनींचे दोन प्रकार होते. एक उसळत्या रक्ताच्या तरुणी आणि दुसऱ्या प्रौढत्वाकडे व वृध्दत्वाकडे वळलेल्या स्त्रिया, तरुण मुली जेलमध्ये खूप दंगा आणि आरडाओरड करत. त्यांचे हे वागणे प्रौढांना पटत नसे. मग कडाक्याचे वादविवाद होत. सोफियाबेनचा वारसा न्यायाधीश पित्याचा होता. त्यामुळे त्या कायम मध्यस्थी करून शांतता राखण्याच्या मागे असत. स्वातंत्र्यसैनिकांनी फालतू गोष्टीवरून हाणामारी करणे हे स्वातंत्र्याच्या पाईकांना न शोभणारे वर्तन आहे असे त्यांना वाटे.

सोफियाबेन भरतकाम व विणकाम चांगले करीत. हे सर्वांना शिकवण्याचे काम दुपारी चाले. सश्रम कारावास झालेल्या बंदीनींना कापडही विणावे लागे, त्यांना ठरावीक कोटा

विणून द्यावाच लागे. अशा महिला बंदीनींसाठी त्यांनी सूतकताई आणि विणकामाचा वर्ग सुरू केला, ज्यांना कोटा पूर्ण करता येत नसे त्यांचा कोटा त्या पूर्ण करत. तुरुंगातून बाहेर पडणाऱ्या गुन्हेगार बाईला सूतकताई, विणकाम, भरतकाम यांतून थोडे पैसे मिळवता यावेत हाही त्याचा दुसरा उद्देश होता. सोफियाबेन कुराण समजून घेऊन वाचायला येरवड्याला शिकल्या. जेलमध्ये रमजानचा सण झाला तेव्हा त्यांनी रोजेही पाळले. रमझानमध्ये इतरांना खाऊ-पिऊ घालणे हे सर्वात पवित्र काम मानले जाते. एकमेकांना फळांच्या भेटी पाठवतात. सोफियाबेननाही फळांचे करंडे येत. हिंदू गरीब गुन्हेगार बायकांचे सोमवार, गुरुवार असे उपवास असले, की त्यांनाही सोफियाबेनच्या भेट करंडीतील फळे मिळत. कुराण वाचणाऱ्या आणि रोजे पाळणाऱ्या सोफियाबेन जेलमध्ये साजऱ्या होणाऱ्या गणपती, दिवाळी, मंगळागौर अशा हिंदू सणांतही तन्मयतेने भाग घेत. एका रमझानमध्येच त्यांचा मोठा मुलगा खूप आजारी पडला. त्याची प्रकृती गंभीर असल्याची तार आणि पाठोपाठ त्यांना घेऊन जाण्यासाठी त्यांची बहीणही आली. सोफियाबेनला सशर्त सुटका स्वीकारायला जेलरने सांगितले. अत्यवस्थ मुलगा, की आपण स्वीकारलेली जीवनमूल्ये असा संघर्ष सोफियाबेनच्या समोर उभा राहिला. प्रेमाताई कंटक, किसनताई घुमटकर यांनी, ‘आधी सुटका करून मुलाकडे जा. मातृभूमीप्रमाणे तू जन्म दिलेल्या मुलासाठी धावणे हेही तुझे कर्तव्य आहे. मुलगा बरा झाला की शर्तींचे काय करायचे ते पाहू’ असा सल्ला दिला. तरीही लगेच न निघता संध्याकाळची प्रार्थना करूनच निघायचे, असे त्यांनी ठरवले. तुरुंगाबाहेर बहीण वाट पाहत होती. सोफियाबेननी सर्वांबरोबर प्रार्थना केली, मुलासाठी शुभेच्छा घेऊन त्या बाहेर पडल्या तेव्हा रात्र झाली होती.

हिंदी स्वातंत्र्याचा कायदा झाला आणि हिंदुस्थान आणि पाकिस्तान असे अखंड देशाचे दोन तुकडे झाले. खान परिवार हा हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील पेशावरचा. घरदार, नातेवाईक हे सर्व तिकडेच. पुढे असे हिंदुस्थान पाकिस्तानचे संबंध कटू होतील असे या कुटुंबाला वाटले नाही. सोफिया सोडून सर्व पाकिस्तानला गेले. मुले आणि नवरा पाकिस्तानात गेल्यामुळे शेवटी सोफियाबेनला नाइलाजाने तिला प्राणप्रिय असलेला भारत आणि मुंबई सोडून सासरी पाकिस्तानात जावे लागले. त्यांनी तो देश आपला कधीच मानला नाही. 1961 मध्ये त्या भारतात परत आल्या व अवघ्या सेहेचाळीसाव्या वर्षी त्यांनी आपल्या प्राणप्रिय भारत देशातच आपला शेवटचा श्वास घेतला. सोफियाच्या ध्यानी, मनी, स्वप्नी भारत देश आणि ज्या मुंबईत त्या जन्मल्या, वाढल्या आणि स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला तेच होते. पाकिस्तानात त्या दुर्धर रोगाने आजारी पडल्या. भारतात ही बातमी पोचली तेव्हा इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या. त्यांच्यावर उपचार करण्याकरता त्यांनी सोफियाला मुंबईला पाठवण्याची पाकिस्तान सरकारची परवानगी मागितली. ती मिळाल्यावर त्यांना भारतीय विमानाने मुंबईला आणले (1961). सेहेचाळीसव्या वर्षी त्यांनी आपल्या देशात येऊन शेवटचा श्वास घेतला.

■ ■

# म. गांधींच्या प्रभावाने स्वातंत्र्य चळवळीत आलेल्या पाश्चात्य महिला

इंग्लंड मधली समाजकार्यकर्ती मेरी कार्पेंटर ही फक्त समाजमान्यच नव्हे तर राजमान्यही होती. हिंदुस्थानातून निवृत्त होऊन गेलेल्या अधिकाऱ्यांशी तिचे बोलणे होई. त्यांच्या तोंडून हिंदी स्त्रियांच्या सामाजिक परिस्थितीची ओळख तिला झाली. लोकशाही मानणारे ब्रिटिश सरकार हिंदी स्त्रियांच्या साध्या शिक्षणाचाही विचार करत नाही हे त्या संवेदनशील कार्यकर्तीला दुःसह झाले. वयाच्या 59 व्या वर्षी त्यांनी हिंदुस्थानात येण्याचे ठरवले. पहिल्यांदा आली ती निरीक्षणासाठी आली. दुसऱ्यांदा आली ते याच देशात कायमचे राहून स्त्री शिक्षणाचे कार्य करण्यासाठी. दुर्दैवाने तिला इथली हवा मानवली नाही. ती परत गेली आणि काही महिन्यातच तिचा मृत्यू झाला. स्वतःच्याच प्रेरणेने ती या देशात आली, तिचा इथे येण्याचा उच्च हेतू लक्षात घेऊन राणी व्हिक्टोरियाने या स्वयंप्रेरीत आणि स्वयंप्रकाशित सामाजिक कार्यकर्तीला सर्व प्रकारची मदत करण्याची आज्ञा भारतमंत्र्याला केली होती.

मेरी कार्पेंटर ही सामाजिक कार्यकर्ती होती, राजकीय नव्हे. तरीही तिला वंदन करूनच हा लेख लिहिणं मला उचित वाटतं. हिंदुस्थानात अनेक मिशनरी स्त्रिया आल्या आणि त्यांनी फक्त धर्मप्रचाराचे कार्य केले. मला भावल्या त्या गांधीजींच्या विचाराने प्रेरित होऊन या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊन शिक्षा भोगलेल्या काही मोजक्या इंग्रजी स्त्रिया.

लोकमान्य टिळकांच्या काळात ॲनी बेझंट (1847–1933) या शिक्षण आणि राजकीय जागृती करण्याच्या उद्देशाने एक स्वयंसेविका म्हणून आयर्लंड मधून हिंदुस्थानात आल्या. या आयरीश महिलेने टिळकांच्या बरोबरीने हिंदुस्थानात होमरूल चळवळीचा प्रसार आणि प्रचार केला. ‘कॉमनवुईल’ हे साप्ताहिक आणि ‘न्यू इंडिया’ हे दैनिक सुरू करून आपल्या राजकीय कामाची जणू मुहूर्तमेढच उभारली. ती राष्ट्रीय काँग्रेसची पहिली महिला अध्यक्ष निवडली गेली. होमरूल चळवळीचे समर्थन आणि वर्धन केल्यामुळे तिला तुरुंगवासही भोगावा लागला. हिंदी स्त्रियांनाही ब्रिटिश स्त्रियांप्रमाणे मताधिकार मिळावा म्हणून तिने सर्व देश ढवळून काढला. 1917 मध्ये त्या काँग्रेसच्या अध्यक्ष झाल्या. त्यावेळी

त्यांचे वय 72 वर्षे होते. महात्मा गांधींचा उदय हिंदुस्थानच्या राजकारणात झाला होता. गांधींचे आणि बेझंट बाईचे विचार आमूलाग्र वेगळे होते. तरीही त्यांना गांधीजींबद्दल आदर होता. वयही खूप झाले होते त्यामुळे त्या हलकेच राजकारणातून निवृत्त झाल्या. थिओसॉफीकल सोसायटी स्थापन करून त्याच कामात असताना त्यांचा मृत्यू झाला. ॲनी बेझंट ही पहिली परदेशस्थ महिला जी स्वतःच्या बुद्धीने हिंदुस्थानात आली. हिंदुस्थानच्या स्वायत्त कारभाराच्या (होमरूल चळवळ) मागणीसाठी 72 व्या वर्षी अटक झाली. सरकारने 'आम्ही हिंदुस्थानला जबाबदार सरकार देण्याचा विचार करत आहोत' असे जाहीर केले हा त्यांचा मोठाच विजय.

हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीत महात्मा गांधींचा उदय झाल्यानंतर गांधीजींच्या विचारामुळे प्रभावित होऊन या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या काही स्त्रियांची माहितीही उद्‌बोधक आहे. इ.स. 1920 मध्ये गांधीजींनी असहकाराचे आंदोलन सुरू केले. उच्चशिक्षा विभूषित आणि प्रतिष्ठित मोजक्याच स्त्रियांनी त्यात भाग घेतला. इथूनच गांधी युगाला सुरुवात झाली, असे इतिहासकार मानतात. ह्या चळवळीची आणि महात्मा गांधींच्या विचारांची माहिती सर्वत्र पोहोचली. युरोपातही लोक गांधींचा विचार ब्रिटिश सरकारचा एक विरोधक म्हणून न करता एक विचारवंत, नेता म्हणून करू लागले. इंग्लंड मधील स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण बरे होते. या सुशिक्षित स्त्रियाही गांधींबद्दल विचार करू लागल्या. अशाच काही स्त्रिया गांधीविचारांनी प्रेरित झाल्या. त्यातल्या काही जणींनी सरळ हिंदुस्थानचा रस्ता धरला. त्या स्त्रिया सुशिक्षित आणि संपन्न घरातल्या होत्या. त्या इथेच राहिल्या. त्यांनी आश्रमातील जीवन स्वीकारले. आपली मुळची नावे सोडून भारतीय नावे स्वीकारली. या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला, शिक्षा भोगल्या. अशा स्त्रियांची ओळख करून देणे अगत्याचे वाटले.

■ ■

## **मार्गारिट कुझिन्स** (1878–1954)



मार्गारिट कुझिन्स या ॲनी बेझंटच्या समकालीन. त्याही आयरीश नागरिक. दोघीही लंडनमध्ये शिकल्या. मार्गारिट कॉलेजमध्ये शिकत असताना लंडनमध्ये ॲनी बेझंटची भाषणे आस्थेने ऐकत. त्यांची भाषणे ऐकून मार्गारिटचा त्यांच्याबद्दलचा आदर वाढतच गेला. अशाच एका सभेला आलेल्या जेम्स कुझीन्स या समविचारी तरुणाची ओळख, पुढे प्रेम व त्यानंतर विवाह झाला.

मँचेस्टर येथे भरणाऱ्या नॅशनल कौन्सिल ऑफ

वुमेनच्या परिषदेचे त्यांना आमंत्रण होते. फार मोठ्या स्त्रियांच्या संख्येपुढे बोलण्याचा त्यांचा पहिलाच प्रसंग होता. स्त्रियांवर होणारे अन्याय आणि अत्याचार त्यांनी याच परिषदेत ऐकले. या माहितीचा मार्गारिटसारख्या तरुणीवर परिणाम झाला नसता तरच नवल. सामान्य स्त्रीला असाहाय्यतेमुळे सोसावा लागणारा अन्याय आणि पुरुषी वर्चस्व या विरुद्ध आवाज उठवण्याबद्दल तिच्या मनात काहूर उठले. त्याचवेळी कुमारी क्रिस्टाबेल मॅकहर्ट यांच्या नेतृत्वाखाली लंडनमध्ये सेफ्रेजेट नावाने स्त्री मताधिकाराची चळवळ जोरात चालू होती. ही चळवळ आक्रमक होती. रोज स्त्रिया मोडतोड, तोडफोड, जाळपोळ अशा काही बेकायदेशीर गोष्टी शासन व जनता यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी करत होत्या. त्यांची पोलिसांकडून मारहाण होई. काही पळून जाताना पकडल्या जात होत्या. या मारहाणीत आणि पकड सत्रात कितीतरी स्त्रियांना अपंगत्व आले. पहिले महायुद्ध सुरू झाले तेव्हा ही चळवळ तात्पुरती मागे घेतली. युद्ध संपल्यावर इ.स. 1918 साली ब्रिटिश स्त्रियांना पुरुषांप्रमाणे मताधिकार मिळाला. अनेक देशांनी त्यानंतर त्यांचे अनुकरण केले.

कुझीन्स दांपत्याने आपल्या कार्यासाठी हिंदुस्थानचे क्षेत्र निवडले. या देशाविषयी आणि समाजव्यवस्थेबद्दल खूप माहिती गोळा केली. 4 ऑक्टोबर 1915 या दिवशी त्यांनी हिंदुस्थानकडे कूच केले. त्यांच्यापूर्वी आलेल्या डॉ. ॲनी बेझंट हिंदुस्थानात खूप स्थिरावल्या होत्या. त्या दोघांना आपल्या अभ्यासामुळे हिंदुस्थानची सामाजिक–आर्थिक परिस्थिती ही 100 वर्षांपुर्वीच्या आयर्लंडच्या परिस्थितीच्या तीनशेपट अधिक तीव्र आहे, असे समजून आले. हे दांपत्य सर्व देशभर फिरले. हिंदी स्त्रियांना चांगले शिक्षण मिळावे या हेतूने त्यांनी शाळा आणि एक कॉलेज सुरू केले. मार्गारिटने मुलींकरता मद्रापल्ली (सध्या आंध्रप्रदेश) येथे एक वसतिगृह सुरू केले.

त्यांच्या शिक्षणसंस्थांत उर्दू, इंग्रजी आणि संस्कृत अशा तिनही भाषेत प्रार्थना म्हटली जाई. कुझीन्स दांम्पत्य आणि महात्मा गांधी साधारण मागे-पुढे हिंदुस्थानात पोहचले होते. आफ्रिकेतील त्यांच्या प्रयोगाविषयी मार्गारिटला माहिती मिळाली. तेव्हा हिंदी स्वातंत्र्याचा मुद्दा मार्गारिटच्या समोर आला. त्यांच्या विचाराचे वारे त्या दिशेने वाहू लागले. या दृष्टीने स्त्रियांचे सबलीकरण करावे म्हणून ‘अबला अभिवर्धिनी समाज’ या नावाची संस्था ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली सुरू केली. 1918 नंतर लॉर्ड एडविन मॉटपर्ड यांच्यामुळे 14 महिलांच्या प्रातिनिधिक समितीने स्त्री मताधिकाराबद्दल आपली मागणी मांडली. याचा सर्व तपशील मार्गारिटने तयार केला होता. कमिशनच्या भेटीपूर्वी व भेटीनंतर मार्गारिट सर्व देशात पायाला भिंगरी लागल्याप्रमाणे फिरल्या. भारत सरकार त्यावेळी 11 प्रांत होते. कमिशनने आपल्या प्रांतात स्त्री मताधिकार आणि निवडणूक लढवण्याला परवानगी देईल, असे जाहीर केले. पहिला कायदा मद्रास आणि दुसरा नंबर मुंबईचा लागून तो कायदा त्या दोन्ही प्रांतात व नंतर इतर प्रांतात होत गेला. स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळवून देणारी मार्गारिट कुझीन्स ही आयरीश स्त्री होती हे कोणालाच माहित नव्हते. मतदानाचा अधिकार जणू काही इंग्रजांनी बायकांच्या ओटीत आपोआपच टाकला या भ्रमात आपण नसतो तर

मार्गारेटची आठवण ताजीच राहिली असती. अर्थात सरोजनी नायडू, ॲनी बेझंट, लक्ष्मीबाई राजवाडे यांचे साहाय्य कमिशनपुढे मांडणीत होतेच.

मार्गारेट कुझीन्समुळे स्त्रियांना न्यायाधीश नेमण्याची प्रथा सुरू झाली. आपण हे काम घेतल्यामुळे आपल्या नंतर हिंदी स्त्रियांनाही ही संधी मिळेल, असे त्यांना वाटले. नंतर ते खरेही झाले. हिंदी स्त्री न्यायाधिशाचे पद पुढे खुले झाले हे मार्गारेटचे मोठे योगदानच होय. मार्गारेट कुझीन्सला हिंदुस्थानातील पहिल्या महिला न्यायाधीश होण्याचा मान मिळाला.

महात्मा गांधींच्या असहकाराच्या चळवळीचा कुझीन्स दांम्पत्यावर खूप मोठा परिणाम झाला. सत्य आणि अहिंसा हीच तत्वे सर्व चळवळीची पायाभूत तत्वे आहेत, असे त्यांना वाटू लागले. या चळवळीमुळे मुद्रण व भाषण स्वातंत्र्यावर बंदी होती. बंदी हुकूम मोडल्याबद्दल सरोजिनी, कमलादेवी, रुक्मिणी, लक्ष्मीपती या प्रत्येकीला 1-1 वर्षाची शिक्षा झाली. मार्गारेटलाही कस्तुरबांच्या सभेत भाषण केल्याबद्दल एक वर्षाची शिक्षा झाली. कोर्टात आपली बाजू मांडताना त्यांनी, 'यापुढे आपण आता गांधीजींच्या मार्गाने जाण्याचे ध्येय जाहीर केले.' शिक्षेनंतर त्यांना वर्तमानपत्रे, खाजगी पत्रे दिली नाहीत. लेखन साहित्यही दिले नाही. 'गॉड सेव्ह द किंग' या चालीवर 'गॉड सेव्ह द मदरलँड' हे प्रार्थना गीत त्यांनी शिकवले.

महात्मा गांधींबद्दल आदर असूनही मिठाच्या सत्याग्रहात स्त्रियांनी भाग घेऊ नये, या विधानाला त्यांनी विरोध केला होता. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. 1942 च्या 'चले जाव'च्या चळवळीत या दांपत्याला फारसे काही करता आले नाही. असे असले तरी त्या काळात इंग्लंडच्या पंतप्रधानांना गांधींचे वय लक्षात घेऊन त्यांना मुक्त करा अशा आशयाचा तारा ते सारख्या करत असत.

हिंदुस्थानच्या सामाजिक आणि राजकीय जीवनातील बदलासाठी त्यांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत काम केले. "कोणत्याही पाश्चात्याला हेवा वाटेल असे प्रेम, ज्ञान आणि सहकार्य आपल्याला हिंदवासीयांनी दिले; ते आपल्यावरचे त्यांचे न फिटणारे ऋण आहे", असे त्यांनी आपल्या 'इंडीयन वुमनहूड टूडे' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे.

मार्गारेट कुझीन्सना देशाची फाळणी मान्य नव्हती, तरीही मिळालेल्या स्वातंत्र्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. त्यांचे एक स्वप्न पुरे झाले होते. पण 30 जानेवारी 1948 रोजी अहिंसावादी नेत्याचा खून झाला. याचे त्यांना खूप दु:ख झाले. प्रकृती बिघडत गेली. 11 मार्च 1954 रोजी त्यांना प्रिय असलेल्या देशाचा आणि बांधवांचा त्यांनी अखेरचा निरोप घेतला.

कोण कुठली ही सातासमुद्रापलीकडील आयरीश कन्या हिंदुस्थानातील स्त्रिया, मुले आणि स्वातंत्र्यासाठी अविश्रांत श्रम करून याच देशाची नागरिक म्हणून इथेच अखेरची विसावते. हे एक आश्चर्यच नव्हे का!

■ ■

## मेडलिन उर्फ मीराबेन (1892–1982)



हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याला मीराबहनच्या कार्याशिवाय पूर्णत्वच येत नाही. ही ब्रिटिश नेव्हीमधील ॲडमिरल सर एडमंड स्लेड ह्यांची मुलगी. तिचा जन्म लंडनमध्ये 22 नोव्हेंबर 1892 मध्ये झाला. मीराबहनचे मूळ नाव 'मेडेलिन'. हिंदुस्थान पाहण्याची तिला खूप इच्छा होती. वडील सरकारी अधिकारी असल्यामुळे त्यांना सवड नसे. तीन वर्षांनी बदली होई. ही तीन वर्षे कशी संपली हे मेडेलिनला समजलेच नाही. मेडेलिनची आई मुलांना घेऊन परत लंडनला आणि तिथून त्यांच्या गावाला परत गेली.

लंडनला परत गेल्यावर फ्रान्सचे नोबेल पारितोषिक विजेते रोमां रोलां यांची मेडेलिनशी ओळख झाली. रोमां रोलां यांनी मेडेलिनला सांगितले की सध्या आपण महात्मा गांधींवर एक पुस्तक लिहिले आहे, ते छापले जात आहे. मेडेलिनला त्यांनी सांगितले, की महात्मा गांधी येशुचे दुसरे रूप आहेत. पुस्तक प्रकाशित झाल्यावर तिने ते वाचले. प्रभावित झालेल्या मेडेलिनने मनोमन गांधीजींना आपले गुरू मानले. तिचे लक्ष हिंदुस्थानकडे लागले. गांधीजींनी तिच्या पत्राला उत्तर देऊन, 'एक वर्ष तू आचरतेस ती आश्रमपद्धती चालू राहिली तर तू नक्की ये', असे कळविले. तिने आपल्या खोलीत भारतीय बैठक मांडली. पलंग, टेबल, खुर्च्या सर्व हलविले आणि भारतीय पद्धतीचे शाकाहारी जेवण घेतले. इतकी तयारी करून पूर्ण झाल्यावर ती मुंबईला पोहचली. बंदरावर सरदार पटेल, महादेवभाई देसाई स्वागताला आले होते. तिने आश्रमपद्धतीचे जीवन स्वीकारले. गांधीजींनी तिला आपली मानसकन्या मानून तिचे नाव ठेवले मीराबहन. मीराला काँग्रेस पक्षात सुरुवातीला सूत कातणे आणि गांधीजींना हवे-नको ते सर्व पाहणे इतकेच काम होते. 1930 च्या मिठाच्या सत्याग्रहात गांधीजी दांडीयात्रेत गेले. आश्रमाची पूर्ण जबाबदारी मीराबहनवर सोपविली. रोजचे काम रोज लिहून गांधीजींकडे पाठवावे लागे.

1931 साली गांधीजी आणि व्हाइसरॉय आयर्विन यांच्यात दिल्लीत बोलणी होऊन गांधी आयर्विन करार झाला त्यावेळी मीराबहननी गांधीजींच्या सेक्रेटरी सारखे काम केले. इ.स. 1931 मध्येच लंडनला दुसरी गोलमेज परिषद भरली होती. गांधीजींबरोबर मीराबहनही होती. या परिषदेत मीराबहननी गांधीजी व इंग्रज जनता यांच्यामध्ये उत्तम दुवा साधला. परिषद मात्र असफल झाली.

लंडनहून परत आल्यावर थोड्याच दिवसात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू होऊन गांधीजींना अटक झाली. या काळापासून मीराबहनचे कार्य लक्षात येऊ लागले. तिलाही अटक झाली. तिला सर्वसामान्य कैद्याप्रमाणे 'क' वर्गात सामान्य गुन्हेगार

स्त्रियांबरोबर ठेवले. सुटल्यावर तिला परत अटक होऊन एक वर्षाचा कारावास भोगावा लागला.

इ.स. 1938 मध्ये अहमदाबादच्या अंबालाल साराभाईंनी इंग्लंड व अमेरिका या विचार स्वातंत्र्य असलेल्या देशात प्रचारासाठी जाण्याचा खर्च मंजूर केला. इंग्लंडमधली खेडी-नी-खेडी त्यांनी भाषणे देऊन पिंजून काढली. इंग्रजी सत्तेच्या कारभाराचे पितळ उघडे झाले पाहिजे. अमेरिकेत तर त्यांनी बोस्टन व हार्वर्ड विद्यापीठातही भाषणे देऊन उच्चशिक्षितांचे ब्रिटिश अत्याचार व काँग्रेसचे धोरण याबद्दलचे लोकांचे गैरसमज दूर केले. त्यांचे वक्तृत्व फर्डे होते. कामगार वर्गावर त्यांची मोठीच छाप पडली. दोन्ही देशातील शक्य त्या सर्व नेत्यांच्या भेटी घेतल्या. दौरा अत्यंत यशस्वी आणि हिंदी स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाचा भाग बनला. आपल्या प्रत्येक सभेचा त्यांचा आठवडी अहवाल गांधीजींना पाठवला जात असे.

मीराबहेन यांना लोक गांधींच्या स्वीय सचिव मानू लागले. त्यांची रोजची खास व्यवस्था बघणे हे त्या करीतच. उरलेल्या वेळात लोकांत मिसळून त्यांना गांधीजींची जनतेसाठी आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी कशी धडपड चालू असते ते प्रभावीपणे सांगत. त्यांच्याकडे लोक आपणहून येऊन आर्थिक साहाय्य करत असत.

खान अब्दुल गफार खान — सरहद्द गांधी — सेवाग्राममध्ये गांधीजींच्या भेटीसाठी आले होते. मीराबहनचं काम, निष्ठा, फर्डे व परिणामकारक वक्तृत्व या गोष्टींनी ते ही चकित झाले. (1938 व 1939 चे काही महिने) गांधीजींची परवानगी घेऊन आपल्या मदतीसाठी ते त्यांना घेऊन गेले. तिथेही त्या लोकप्रिय झाल्या.

हरिजनमधील लेखावरून गांधीजी इंग्रजांविरुद्ध लढा लढण्याच्या मनस्थितीत आहेत असे मीराबहन यांना वाटू लागले. गांधीजींनी त्यासंबंधी एक पत्र तयार करण्याची जबाबदारी मीराबहनवर सोपविली. त्याची एक प्रत पंडित नेहरू व अब्दुल कलाम यांना दिली. तिसरी प्रत मीराबहनने अलाहाबादच्या काँग्रेस कार्यकारिणीत सादर केली. ते मुंबईला भरणाऱ्या काँग्रेस अधिवेशनात भारत छोडोच्या स्वरूपात पास झाले. ईशान्य भारतावर होणाऱ्या संभाव्य आक्रमणाचा जपान्यांशी असहकाराच्या मार्गाने सामना करावा, या संदर्भात त्यांनी व्हाईसरॉयची भेट मागितली. ती गव्हर्नर जनरलनी आपल्या सचिवाबरोबर आयोजित केली होती, तरीही सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. मीराबहनना गांधीजींचा आंदोलनाबाबतचा मुद्दा पटवून द्यायचा होता.

8 ऑगस्ट 1942 ला मुंबईला काँग्रेसच्या अधिवेशनात ‘भारत छोडो’ हा ठराव पास झाला. त्याबरोबर महत्त्वाचे सर्व नेते आणि मीराबहन यांना अटक झाली. गांधीजी, कस्तुरबा आणि मीराबहन यांना आगाखान पॅलेस, पुणे येथे ठेवले. आगाखान पॅलेस मध्ये मीराबहनचे व्हाईसरॉयशी बोलण्याचे प्रयत्न असफल झाले. गांधीजींच्या एकवीस दिवसांच्या उपासाच्या काळात मीराबहन एकभुक्त राहिल्या. 6 मे 1944 ला गांधीजींबरोबर मीराबहनचीही सुटका झाली. सुटकेनंतर त्यांनी खडकीला किसान आश्रम आणि हृषिकेश

येथे ‘पशुलोक’ आश्रम सुरू केला. शाळा-कॉलेजची पायरीही न चढलेल्या बाईची विद्वत्ता पाहून आपण नतमस्तक होतो.

15 ऑगस्ट 1947 ला दुभंगलेल्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याने त्या व्यथित झाल्या. 1948 च्या जानेवारी 30 रोजी गोडसेंनी गांधींचा खून केला. या घटनेने त्या मोडून पडल्या. आता फक्त सरकार बदलले पण सरकारी नोकर मात्र ब्रिटिशांनी घालून दिलेल्या यंत्रणेचाच उपयोग करत होते. चांगल्या कामासाठी सहकार्य मिळेना. फक्त कागदी घोडे नाचवणे चालू होते. मीराबहन किंवा गांधींचे हे स्वप्न नव्हते. हिंदुस्थानचे भारतात झालेले रुपांतर त्यांच्या कल्पनेपलीकडचे होते. जानेवारी 1959 मध्ये 30 वर्षे वास्तव्य केलेल्या या देशाचा त्यांनी निरोप घेतला.

ऑस्ट्रियातील व्हिएन्ना गावात हिमालयीन हवामान आहे आणि तिथे हिमालयातील औषधी वनस्पतींचे उत्पादन होऊ शकते म्हणून ते गाव राहण्यासाठी निवडले. तिथेही त्या आश्रमपद्धतीनेच राहिल्या. पेहरावही शुद्ध खादीचा, सलवार कमीज आणि डोक्यावर पातळ खादीच्या कपड्याचे पागोटे. घर म्हणजे सेवाग्रामच्या आश्रमातील पूर्ण छबी. व्हिएन्नातील जनता त्यांना ‘इंडियन लेडी’ म्हणत असे. अखेरपर्यंत गांधी मार्गावरच चालत त्या जगल्या. 1981 साली भारत सरकारने त्यांना ‘पद्मविभूषण’ ही पदवी सन्मानपूर्वक व्हिएन्नामध्येच दिली. त्यांच्या नावाने टपाल तिकीट काढलेल्या या थोर गांधीवादी भारतप्रेमी महिलेने 20 जुलै 1982 रोजी जगाचा निरोप घेतला.

■■

## म्युरिअल लेस्टर (1883–1968)



इंग्लंडच्या सामाजिक इतिहासात म्युरिअल लेस्टरला ख्रिश्चन शांततावादी या उपाधीने गौरविले आहे. ती बाप्टीस्ट घरण्यात जन्मली. हेन्री एडवर्ड लेस्टर आणि रेचेल मेरी गुडवीन ह्या दांपत्याची ही मुलगी. हेन्री एडवर्ड लेस्टर हे जहाज बांधणीचे मोठे उद्योगपती होते. प्रगतशील विचारांच्या या जोडप्याने आपल्या पाचही मुलांवर चांगले संस्कार होतील, याची काळजी घेतली. जहाजबांधणी उद्योग हा वडिलोपार्जित असल्यामुळे घरात लक्ष्मी पाणी भरत होती. भव्य वाडा, भव्य परिसर असा सर्व राजेशाही थाट होता.

म्युरिअलच्या शाळेत मुले व मुली होत्या. म्युरिअलची आई मुलांना निरनिराळ्या विषयावरची पुस्तके वाचून दाखवत असे त्यामुळे म्युरिअललाही पुस्तकं वाचण्याचा नाद लागला. सॉक्रेटिससारखी पुस्तके तिने लहान वयातच वाचली. रोमां रोलां या फ्रेंच लेखकाच्या म. गांधींवरील पुस्तकाच्या वाचनाने म्युरिअलवर गांधी विचारांचा फार मोठा प्रभाव पडला.

इ.स 1908 मध्ये म्युरिअल आणि तिची बहीण 'डोराथी' या लंडनच्या 'बाऊ' उपनगरात सामाजिक आणि शैक्षणिक प्रवृतींचा प्रसार करण्याकरिता गेल्या. थोड्याच दिवसांनी त्यांचा धाकटा भाऊ 'किंग्जले' हा त्यांना मदत करण्यासाठी दाखल झाला. दुर्दैवाने किंग्जले इ.स. 1914 साली ख्रिस्तवासी झाला. बाऊ गावातील लोकांनी संध्याकाळी रोज एकत्र जमावे आणि चर्चा करून आपापल्या प्रश्नांची उत्तरे शोधावी याची सोय तसेच भावाची स्मृती म्हणून 'किंग्जले' हॉल बांधला. 1929 साली आणखी एक हॉल 'डीननहॅम' या उपनगरात किंग्जलेच्या नावाने बांधला. याच काळात रोमां रोलां यांच्या गांधीजींवरील पुस्तकाचा तिच्यावर फार मोठा प्रभाव पडला. वर्तमानपत्रातून गांधीजींवरच्या येणाऱ्या बातम्या, माहिती ती बारकाईने वाचत असे. गांधीजींच्या अहिंसक आंदोलनाविषयी ब्रिटिश जनतेत फारच कुतूहल निर्माण झाले होते. या सर्वांचा म्युरिअलच्या विचारांवर फार मोठा परिणाम होऊन तिने हिंदुस्थानात जाण्याचे ठरवले.

त्यांनी बांधलेल्या किंग्जले हॉल नं. 2 येथे लोक येऊन राहू लागले. सभा घेऊ लागले. देशी आणि परदेशी व्याख्याते इथे आवर्जून हजेरी लावत. अशाच एका व्याख्यानासाठी रवींद्रनाथ टागोरांचे जावाई प्रा. गांगुली गेले होते. त्यांनी म्युरिअलला हिंदुस्थानात येण्याचे आमंत्रण दिले. म्युरिअल मोठ्या उत्साहाने आमंत्रण स्वीकारून (सोबतीला तिचा भाचा घेऊन) 1926 ला गांधीच्या जन्मदिनी सेवाग्राम आश्रमात पोहचली.

हिंदुस्थान भेटीत म्युरिअलचा गांधींबद्दलचा आदरभाव वाढला. हिंसक प्रवृत्तीचा तिटकाराही आला. परत गेल्यावर तिने किंग्जले हॉल मध्ये दारूबंदी, साधी राहणी इत्यादी गांधीजींच्या विधायक कार्यक्रमांवर आधारित कार्यक्रम सुरू केले.

1931 मध्ये गांधीजी गोलमेज परिषदेला गेले. म्युरीअलला कबूल केल्याप्रमाणे किंग्जले हॉल मध्येच परतण्याच्या दिवसापर्यंत राहीले. तिने अनेकांशी गांधीजींचा संवाद घडवून आणून, त्याला स्थानिक वर्तमानपत्रातून प्रसिद्ध केले. गांधीजींच्या प्रत्येक क्षणाची नोंद म्युरीअलने केली आहे. गांधीजी बाहेर पडले, की कधी कधी 2 वाजता परत येत. त्यानंतर इंग्लंडच्या कडक थंडीतही आपल्या हिंदुस्थानामधील दिनचर्याच करत. उदा. पहाटे 4 वाजता प्रार्थना, त्यानंतर थोडी झोप, 6 वाजता 1 तास फिरून येणे वगैरे. त्यांना हे झेपते कसे? याचे आश्चर्य वाटून ती त्यांची अधिकच काळजी घेई. ते कामाला बाहेर पडत तेव्हा किंग्जले हॉलच्या दोन्ही बाजूला नागरिक त्यांना अभिवादन करण्यासाठी उभे असत. गांधीजींचे सर्व संवाद तिने टिपले आहेत. म्युरीअलने 'पुण्यश्लोक गांधीजी' नावाचे पुस्तक लिहिले आहे. 1824–26 मध्ये जेव्हा ती प्रथम सेवाग्राममध्ये आली तेव्हा प्रथम

आश्रमवासीय जीवन जगण्याची पद्धत शिकली. त्यानंतर गांधीजींची भेट घेतली. त्यापूर्वी नाही. हे तिच्या गांधीवादी विचारसरणीवर प्रकाश टाकते.



*काँग्रेसच्या महिलांची बैठक (1939): (उजवीकडून) डॉ. मुथुलक्ष्मी रेड्डी, नेहरू आणि मार्गारेट कुझिन्स*

म्युरिअल शांततावादी होती. 2 वेळा तिला शांततावादी नोबेल प्राईझचे नामांकन झाले. 1941 साली तिच्या युद्धविरोधी भाषणाबद्दल तिला अटक झाली. तिच्या युद्धविरोधी भाषणांमुळे इंग्लंड मध्ये आणखी 2 वेळा तिला तुरुंगवास झाला. एखाद्या संताप्रमाणे तिचे आयुष्य होते. गांधीजींच्या विश्वस्त योजनेची ती प्रतीक होती. तिने आपली सर्व संपत्ती समाजार्पण केली.

ब्रिटिश नागरिक असूनही ती हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल आपल्या भाषणात हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात मदत करण्याचे आवाहन करत असे. ही मदत ती हिंदुस्थानात पाठव असे. व्हाईसरॉयला भेटून गांधीजींचे म्हणणे कधी लिखित तर कधी मौखिक मांडून गांधीजींना निष्कर्ष कळवे. हिंदुस्थान स्वतंत्र होईपर्यंत हे काम तिने केले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला तिने जी मदत केली त्याला जगात तोड नाही. ही मदत संपूर्ण राजकीय होती हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच गांधीजी तिच्याबद्दल म्हणाले — Of all my friends you are by no means the least. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यात एका अस्सल हिंदी माणसापेक्षाही तिचे कार्य आणि गांधीभक्ती ही अजोड आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील तिच्या योगदानाला हिंदवासियांचा दंडवत!

■ ■

## कॅथरीन हिलमन उर्फ सरलाबहन (1901–1982)

म. गांधीजींचा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिता चालू असलेला सत्य, अहिंसा आणि बहिष्कार या तत्वांच्या पायावर उभा असलेला लढा हा अनेक पाश्चात्य तरुण–तरुणींच्या मनाला आश्चर्याचा धक्का देत होता. 'कॅथरीन हिलमन' (पुढे सरला बहेन) ही अशीच एक इंग्रज महिला. पहिले महायुद्ध सुरू झाले तेव्हा कॅथरीन बारा-तेरा वर्षांची होती. राज्यकर्त्यांच्या स्वतःच्या प्रतिष्ठा आणि लालसेकरिता सामान्य माणसाने लढाईत प्राण का अर्पण करावेत? स्वतःचे आयुष्य आणि परिवार धुळीला का मिळवावे? असे तिचे सर्वांना



प्रश्न असत. त्या बालवयात सर्वच तिचे हे प्रश्न उडवून लावत असत. 75 व्या वर्षी लिहिलेल्या आपल्या चरित्रात ती लिहिते की, “आजही मला या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.” कॅथरीन पुढे गांधीवादी झाली, त्याचे मूळ इथेच सापडते.

कॅथरीनचे वडील जर्मन वंशाचे असल्यामुळे त्यांना अटक झाली. युद्ध संपल्यावर 1918 साली ते सुटले. तोपर्यंत कॅथरीन, तिचा भाऊ आणि आजी हा संसार चालवणे तिला अत्यंत कष्टप्रद गेले. आजीच्या मृत्यूनंतर कॅथरीनने पेईंग गेस्ट म्हणून राहायचे असे ठरवले. जम बसायला खूप वेळ लागला. घर मालकाने कॅथरीनच्या परवानगीने एका हिंदी विद्यार्थ्यालाही खोली दिली. त्याचे हिंदी मित्रही दर रविवारी तिथे जमू लागले. कॅथरीनच्या आता अनेक हिंदी विद्यार्थी व इतरांच्या ओळखी होऊन तिचे कार्यक्षेत्र विस्तारले. काही हिंदी संस्थांचाही परिचय झाला. त्यांच्याकडून तिला गांधीजींचे ग्रामविकासाचे कार्यही समजले. प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी बनवण्याच्या म. गांधींच्या योजनेचा तिच्यावर खूप परिणाम झाला.

हिंदी स्त्रियांच्या सहवासाने तिला इंग्रजांचे हिंदुस्थानला त्यांची संस्कृती हिंदी लोकांवर लादण्याचे आणि सामाजिक बदल घडवून आणण्याचे प्रयत्न निंद्य वाटू लागले. ती हिंदी लोकांच्या सर्व समस्यांची समर्थक बनली. गांधी सत्याग्रहात लोकांनी मिळवलेले यश तिलाही समजले. लाठ्या-गोळ्या खातात पण लोक जागचे हालत नाहीत हे ऐकून ती आश्चर्यचकित झाली. कॅथरीन 30 वर्षांची झाली तेव्हा गांधींच्या पद्धतीने हिंदी स्वातंत्र्याच्या दृष्टीने काम करण्यासाठी आपली इच्छा तिने गांधीजींना कळवली. उत्तरा दाखल गांधीजींनी तिला युरोपियनांना कसे जमेल? याचा पुनर्विचार करावा असे कळवले.

कॅथरीन आपल्याला आश्रमीय जीवनाची सवय लावून घेण्याच्या प्रयत्नाला लागली. त्याच सुमारास लंडनमध्ये शिकत असताना ओळखीचे डॉ. मोहनसिंग यांचे तिला पत्र आले. त्यांनी विद्याभवन नावाची संस्था सुरू केली होती. त्या शाळेत शिकवण्यासाठी तिला निमंत्रण दिले. कॅथरीनला शिकवण्याचा काहीच अनुभव नसल्यामुळे तिने प्रथम मॉन्टेसरी कोर्स पूर्ण केला. तिच्या जाण्यात मिशनरी आणि सरकारी अधिकारी यांनी फारच मोठे अडथळे आणले. शेवटी ते सर्व पार करून हिंदुस्थानात जन्मलेल्या येशूला म्हणजेच म. गांधींना भेटायचे होते. दुर्दैवाने तिला त्यांची भेट मिळू शकली नव्हती. आता ती विद्याभवन संस्थेत नोकरीसाठी निघाली तेव्हा मनातला सुप्त हेतू गांधीजींना भेटण्याचा होता.

कॅथरीन नोकरीवर रुजू झाली खरी पण तिथली शिक्षणपद्धती तिला आवडली नाही. गांधीजींच्या शिक्षण पद्धतीप्रमाणे आपल्याला शिकवता आले पाहिजे असे तिचे स्वप्न होते. मात्र ती या काळात अंतरबाह्य भारतीय बनली होती. तिचा पेहराव, खाणे-पिणे आणि

आश्रमीय पद्धतीने फक्त जमिनीचाच वापर करू लागली. पलंग, टेबल, खुर्ची अशा वस्तूंचा तिने आपल्या खोलीत वापर केला नाही. तिचा हा बदल पाहून उदयपूरच्या लोकांनी तिला नाव दिले 'सरला बहेन'. सेवाग्राममध्येही गांधीजींसह सर्व 'सरलाबहन' म्हणू लागले. स्वातंत्र्याच्या लढ्यातही ती याच नावाने प्रसिद्ध आहे.

इ.स. 1942 च्या ऑगस्टमध्ये चळवळ सुरू झाली. सर्व नेते 8 ऑगस्ट 1942 च्या रात्रीपर्यंत स्थानबद्ध झाले. शासनाने आश्रम आणि केंद्र जप्त केले. आश्रमाच्या बाजूने सरलाबहन उभी राहून त्यांनी आश्रमासाठी मदत कार्य सुरू केले. सरलाबहनला अटक झाली आणि त्या सलग 4 वर्षे स्थानबद्ध होत्या. 1946 ला सुटल्यावर त्यांनी कौसानी आश्रम सुरू केला. लोकांनी त्याचे नाव लक्ष्मी आश्रम असे ठेवले. या आश्रमात मुलोद्योग पद्धतीने शिक्षण दिले जात असे.

1966 साली त्यांना आपले काम ग्रामीण जीवनाशी अधिक एकरूप झाले पाहिजे असे वाटू लागले. आश्रमाची जबाबदारी कार्यकर्त्यांवर सोपवून त्या गावोगाव हिंडू लागल्या. विनोबांच्या चंबळच्या खोऱ्याचे काम करण्यासाठी एक वर्ष चंबळला राहिल्या. वयाची 75 वर्षे पूरी होईपर्यंत त्यांचे ग्रामोद्धाराचे काम अखंड चालू होते. वयाच्या 78 वर्षांनंतर जेव्हा अगदीच झेपेना तेव्हा त्यांनी लेखणी हातात घेतली. स्वातंत्र्य लोकांपर्यंत पोहोचायचे असेल तर गांधीजींचे विधायक कार्य हा एकमेव मार्ग आहे. 'संतुलनशास्त्र' या नावाचे एक पुस्तकही त्यांनी लिहिले. स्वतःचे आत्मचरित्रही 'व्यावहारिक वेदांत' या शिर्षकाखाली लिहिले. त्याचे हिंदी भाषेतील या पुस्तकाचे डेव्हिड हाफकिन्स यांनी *A Life in Two Worlds* असे भाषांतर केले आहे.


कॅथरीन उर्फ सरलाबहन 1932 मध्ये भारतात आल्या आणि पूर्ण 50 वर्षे त्यांनी गांधीजींच्या विचारावर काम केले. असे कष्टप्रद रचनात्मक विधायक काम सलग करणाऱ्या त्या इंग्रजी वंशाच्या एकमेव भारतीय होत्या. जमनालाल बजाज यांनी त्यांना गौरवाचा पुरस्कार आणि थैली दिली.

1942 च्या चळवळीत त्यांना अटक झाली तेव्हा अलमोड्याच्या पोलीस कमिशनरने सुटकेचा निश्वास सोडला. तो म्हणाला, "सबसे खतरनाक आदमी हमने आज बंद किया." भूदान, चंबळखोरे, उत्तराखंडातील नशाबंदी, चिपको आंदोलन या स्वातंत्र्योत्तर सर्व आंदोलनात सरलाबहनचा सिंहाचा वाटा आहे. भारत सरकारने त्यांना जानेवारी 1982 मध्ये 'पद्मविभूषण' पदाने गौरवले. ते त्यांच्या घरी जाऊन सरकारी अधिकाऱ्यांना द्यावे लागले. 50 वर्षांच्या अखंड धावपळीमुळे त्यांची प्रकृती ढासळली होती. 8 जुलै 1982 रोजी भारत माझा देश आहे असे अभिमानाने सांगणाऱ्या या थोर गांधीवादी कार्यकर्तीने अखेरचा श्वास भारतातच घेतला. सरलाबहनच्या मृत्यूमुळे गांधीयुगातील तेजस्वी प्रकरण अस्ताला गेले.

■ ■

# भाग 2

# पं. नेहरूंची महिला नीती



विसाव्या शतकातील अबालवृद्धांचे लाडके नेते व भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा 30 मे हा स्मृतिदिन! त्यांच्या मृत्यूला 60 वर्षे उलटून गेली तरी अजूनही नेहरू इतिहासात जमा झालेले नाहीत. प्रत्येक भारतीयाच्या मनातील एक कोपरा आजही नेहरूंबद्दलच्या आदर व प्रेमाने व्यापलेला आहे. पंडितजींच्या आयुष्यातील 12-13 वर्षे तरी तुरुंगात गेली. या कालावधीत त्यांनी राजकीय विचारांचे चिंतन तर केलेच, पण त्याचबरोबर सामाजिक विचारांचेही चिंतन केले, त्यांच्या लेखनात समाजातील अनिष्ट गोष्टींच्या निर्मितीची कारणे, सद्यपरिस्थिती व त्यावरील त्यांचे विचार निरनिराळ्या घटनांच्या संदर्भात मांडले गेले आहेत. स्त्रियांच्या स्थितीसंबधीचे विचारही त्यांच्या लेखनात सर्वत्र विखुरलेले आहेत.

विलायतेत ते शिकत असताना उत्तर प्रदेशात त्यांनी त्यांच्या बालपणी पाहिलेल्या स्त्रिया, त्यांची सामाजिक स्थिती आणि विलायतेतील स्त्रिया व त्यांचा सामाजिक मोकळेपणा यांची तुलना त्यांच्या अप्रकट मनात होत असावी. आपल्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या अमूल्य ग्रंथात ते म्हणतात, "प्राचीन भारतीय स्त्रीचा वैधानिक दर्जा व सामाजिक दर्जा कमी प्रतीचा होता, असे आपण त्याला आधुनिक मोजमाप लावून म्हणतो. परंतु प्राचीन ग्रीक, रोम वा ख्रिस्ती काळाचा आरंभ किंवा मध्ययुगीन युरोपच्या, इतकेच कशाला 19 व्या शतकाच्या आरंभीच्या काळातील जगातील स्त्रियांच्या दर्ज्यापेक्षा तो अधिक चांगला होता."

पडदा पद्धतीने स्त्रियांचा सामाजिक जीवनाशी पार संबंधच तोडून टाकला. हे का घडले?, याचे विश्लेषण जरी नेहरू करू शकले नसले तरी ही घटना ते आवर्जून मांडत. पडदा पद्धतीची वाढ मोगलकाळात झाली. पडदा पाळणे हे सामाजिक प्रतिष्ठेचे चिन्ह मानले

जाऊ लागले. भारतातील ज्या प्रदेशांत मुस्लीम राजवट होती, तिथे वरिष्ठ वर्गाने पडदा पद्धतीचा स्वीकार केला. हिंदुस्थानचे जे सामाजिक अवमूल्यन झाले, त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे स्त्रियांना पडदा वापरण्याची सक्ती करणे हे आहे, असे पंडितजी मानत. या रानटी पद्धतीचा संपूर्ण शेवट झाल्याशिवाय भारतातील सामाजिक जीवनात प्रगती होणार नाही, याबद्दल त्यांची खात्री होती. ही चाल फक्त स्त्रियांनाच हानी पोहोचवते असे नसून, ज्या उमलत्या कळ्या संस्कारक्षम वयात अधिक काळ आपल्या आईबरोबर असतात, अशा छोट्या मुलींच्या शारीरिक व मानसिक वाढीलाही ती हानीकारक आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते.

पडदा पध्दतीमुळे स्त्रियांना शिक्षणाचे दरवाजे बंद झाले. त्याचप्रमाणे योनीशुचितेच्या कल्पनेनेही पुरुषी समाजाने त्यांना जखडून टाकले. हिंदू–मुस्लीम पुरुष एकमेकांना भेटत, पण या दोन धर्मातील स्त्रियांची सहसा गाठ पडत नसे. त्यामुळे त्यांच्यामध्ये स्वतंत्र वैचारिक बैठक निर्माण होऊ शकली नाही. इंग्रजांच्या काळात बहुतेक संस्थानातून मूळ समाजापासून स्त्रियांच्या अलगीकरणाला खतपाणी घातले गेले. बडोदा, त्रावणकोर, कोचीन, म्हैसूर, कोल्हापूर अशी काही संस्थाने अपवाद. या संस्थानात स्त्रीशिक्षणाला चालना मिळाली. मद्रास येथील मुलींच्या कॉलेजमध्ये भाषण करताना नेहरूंनी पुस्तकी शिक्षणावर हल्ला चढवला. पुस्तकी शिक्षण हे आदर्शाच्या प्राप्तीबद्दल असफल ठरते. शिक्षणातून व्यक्तित्व व उत्पादकत्व यांचा विकास झाला पाहिजे. अशिक्षित स्त्रीने पुरुषासारखे शिक्षण घेऊन फक्त सुशिक्षितच झाले पाहिजे असे नाही, तर कुटुंब चालवण्याची आपली भागीदारी समर्थपणे पेलण्याची ताकद तिला शिक्षणातून मिळाली पाहिजे. आर्थिक अवलंबित्वामुळेच तिला समाजात कनिष्ठ दर्जा आहे. भारत स्वतंत्र झाला आहे. आता आपली बांधिलकी समाजवादी, लोकशाही राष्ट्राशी आहे. नव्या समाजव्यवस्थेत नवी जबाबदारी घेण्यास पुरुषांनी स्त्रियांना मदत केली नाही तर आपले अधिकार मिळवण्यासाठी स्त्रियांनी स्वतःच लढा दिला पाहिजे. स्त्रियांना शिक्षण देणं हे मुलांना सुसंस्कृत करण्याच्या दृष्टीने मूलगामी स्वरूपाचे आहे असे पंडितजी मानत.



*महिलांच्या सभेला संबोधित करताना नेहरू (1931)*

शिक्षणाप्रमाणे स्त्रियांना जीवनाच्या सर्वच क्षेत्रात समान अधिकार असले पाहिजेत. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाच्या आड येणाऱ्या प्रथा-परंपरांमुळे स्त्रियांचा दर्जा दुय्यम झाला आहे. त्यांनाही पुरुषाप्रमाणेच विशेषाधिकार असले पाहिजेत,

असे मत नेहरू आग्रहाने मांडत. 1930 च्या सविनय कायदेभंगात स्त्रियांनी फार मोठ्या संख्येने भाग घेतला, हे ऐकून नेहरूंना आनंदाचे भरते आले. त्यांची आई स्वरूपराणी व पत्नी कमला या झेंडा हातात घेऊन सामान्य स्त्रीप्रमाणे बाहेर आल्या, त्यांनी आपल्या भोवतीचा कोष फाडला, या बातमीने ते भारावून गेले. 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथात त्यांनी म्हटले आहे की, कमलाबाईच्या या कृत्याने त्या आपल्या आणखीनच जवळ आल्या.

1933 मध्ये भरलेल्या काँग्रेसमध्ये त्यांनी मांडलेल्या ठरावात स्त्रियांच्या कायदेभंगातील सहभागाची नोंद मोठ्या अभिमानाने केली आहे. 1947 मध्ये स्वातंत्र्यापूर्वी चार महिने त्यांनी ग्वाल्हेर येथे भरलेल्या महिला परिषदेला पाठवलेला संदेश नेहरूंच्या स्वातंत्र्यानंतरच्या स्त्रीविषयक भूमिकेवर प्रकाश टाकतो. या संदेशात ते म्हणतात, भगिनींनो, नीडर होऊन ताठ मानेने व अभिमानाने पुढे जा. अबला म्हणवून घेणे हा तुमचा स्वतःचा कमीपणा करवून घेणे आहे. जीवनात दुबळ्यांना स्थान नसते. पुऱ्या शक्तीनिशी नवे राष्ट्र निर्माण करण्याचे काम फक्त भारतीय माताच करू शकतात. नेहरूंच्या मते, लोकजागृती याचा अर्थ स्त्रियांमध्ये जागृती! भारतीय स्त्रीच्या हालअपेष्टांची त्यांना जाण होती. स्त्रियांची परिस्थिती सुधारायची असेल तर त्यांच्याकरिता कायद्याने सुधारणा दिल्या पाहिजेत, असे त्यांना वाटे. म्हणूनच हिंदू कोड बिल तयार करण्यासाठी त्यांनी आंबेडकरांना विनंती केली. पित्याच्या मालमत्तेत मुलीला अधिकार असलाच पाहिजे, हे त्यांचे मत त्यांनी आपल्या पित्याच्या मृत्यूनंतर आपली कनिष्ठ भगिनी कृष्णा हाथिसिंग हिला तिचा अधिकार देऊन खरे करून दाखवले. हिंदू कोड बिलाबद्दल नेहरूंना कितीही आत्मीयता असली तरी ते बिल होते त्या परिस्थितीत संमत होऊ शकले नाही. डॉ. आंबेडकराप्रमाणेच नेहरूंनीही राजीनामा दिला असता तर कदाचित या बिलाचा पुनर्विचार झाला असता, हा विचार भाबडा ठरू नये.

लोकसभेत घटस्फोटाच्या बिलावरील चर्चेला नेहरूंनी दिलेले परखड उत्तर स्त्रियांच्या वैवाहिक जीवनासंबंधीच्या प्रश्नासंबंधीची त्यांची आत्मीयता स्पष्ट करते. 'घटस्फोट', हा परस्परांच्या संमतीने झाला पाहिजे. विवाह हा धार्मिक विधी असला तरी एकमेकांशी सतत भांडणाऱ्या व एक-दुसऱ्याचे आयुष्य दुःखी करणाऱ्यांना एकत्र बांधून ठेवण्याला विवाह संस्कार कसे म्हणता येईल? जर मानवी संबंध ठीक असतील, तरच त्या मानवी संबंधांचे महत्त्व! तसे ते नसतील तर एकमेकांनी एकमेकांजवळ राहण्यासारखी भयानक स्थिती दुसरी कोणतीही नाही. म्हणून घटस्फोटाला पर्याय नाही.

स्त्रियांना सामाजिक जाचातून मुक्त करणे महत्त्वाचे आहे. त्यांना नोकऱ्यांचा, कायदेमंडळातील सदस्यत्वाचा व सामाजिक कार्याचा रस्ता खुला असला पाहिजे, हा जो काँग्रेसचा सूर होता तो नेहरू व गांधींच्या कंठातून आलेला होता. याचं उत्तम उदाहरण देता येईल. 1952 च्या लोकसभेच्या पहिल्या निवडणुकीवेळी महाराष्ट्रातून लोकसभेच्या उमेदवारांची यादी पक्की होऊन अखेरच्या मान्यतेसाठी पंडितजींकडे गेली. त्या यादीत

एकाही स्त्री उमेदवाराचे नाव नाही, हे पाहून पंडितजींना आश्चर्य वाटले. त्यावेळच्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षाना नेहरूंनी खडसावले, ‘महाराष्ट्रात मोठ्या संख्येने सुशिक्षित स्त्री कार्यकर्त्या असताना तुम्हाला तिकीट देण्यास एकही स्त्री मिळू शकली नाही का? स्त्रियांची नावे सुचविल्याशिवाय मी यादी पक्की करणार नाही.

12 जून 1948 च्या वर्तमानपत्रात आयएएसमध्ये तातडीच्या भरतीमध्ये इंदिराबाई मायदेव यांचे नाव होते पण ‘या जागेकरता स्त्री उमेदवार विचारात घेतले जाणार नाहीत’, म्हणून आले होते. ही बातमी राजकुमारी अमृत कौर यांनी नेहरूंच्या नजरेला आणून दिली. नेहरूंनी या बातमीकडे आपले लक्ष वेधल्याबद्दल अमृत कौरबाईंचे आभार मानले. आणि आंतरदेशीयच काय, पण विदेश सेवेतही स्त्रियांना नोकऱ्या द्याव्यात, असे आदेश दिले. परंतु गृहमंत्रालयावर अजून पूर्वीच्याच राजवटीचा ठसा आहे, हे त्यांच्या लक्षात आले. 18 जूनला परत आदेश काढून त्या जाहिरातीत बदल करून स्त्रियांना अर्ज करण्याची मोकळीक असल्याचे त्यांनी जाहीर केले. आयएएस व आयपीएसमधील नोकऱ्यांसाठी स्त्रियांनी पुढे यावे, असा त्यांचा आग्रह होता.

नेहरूंच्या महिला नीतीमध्ये एक उणीव भासते. ग्रामीण स्त्री संबंधातील खास संदर्भाची. डोक्यावर दोन हंडे व कमरेवर घागर घेऊन पाण्यासाठी पायपीट करणाऱ्या ग्रामीण बायकांचे कष्ट त्यांना बघवत नसत, असे ते इंदिराबाईना लिहिलेल्या एका पत्रात म्हणतात. परंतु हे कष्ट नाहीसे करण्याचे प्रयत्न मात्र त्यांच्या हातून झाले नाहीत. डॉ. लोहिया ग्रामीण स्त्रियांच्या प्रश्नाबद्दल सतत जागरूक असत व स्त्रियांसाठी सुविधा प्राप्त करून देणे हे सरकारचे कर्तव्य आहे, असे मानत असत. नेहरूंच्या हातात सत्ता व पाठीमागे प्रचंड लोकशक्ती व लोकप्रियता असूनही ग्रामीण स्त्रीसाठी खास असे नेहरूंचे प्रयत्न दिसत नाहीत. ग्रामीण स्त्रीचा वेळ पाणी व इंधन गोळा करण्यामध्येच जातो. म्हणून या सुविधा तिला सर्वप्रथम प्राप्त झाल्या पाहिजेत, तरच तिला फुरसतीचा वेळ मिळून तिची उन्नती होणे शक्य आहे. हा लोहियांचा विचार नेहरूंनाही अमलात आणता आला असता. कदाचित नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या देशाची घडी बसवत असताना ते त्यांना जमले नसेल. परंतु त्याचे नातू व राजकीय वारसदार कै. राजीव गांधी यांनी आजोबांचे हे अपुरे काम पुरे केले. 73वी घटनादुरुस्ती करून ग्रामीण स्त्रीला सत्तेत वाटा दिला आणि तिच्यासाठी तिच्याकडूनच तिचे जीवन सुधारण्याचा मार्ग दाखवला.

■ ■

# नेताजी सुभाषचंद्र बोस यांची महिला नीती



नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म 23 जानेवारी 1897 रोजी ओरिसा प्रांतातील 'कटक' या गावी झाला. वडील जानकीनाथ हे कटकमधील एक सुप्रसिद्ध वकील होते. आई प्रभावती ही एक पुरोगामी विचारांची गृहिणी. सुभाषबाबू मॅट्रिकची परीक्षा उत्तम गुणांनी इ.स. 1913 मध्ये पास झाले. लहानपणापासूनच त्यांना लष्करात जाण्याची ओढ होती. कॉलेजमध्ये शिकण्यापेक्षा आपण बंगाल पलटणीतच भरती व्हावे, असे त्यांना वाटले. त्यांचे डोळे अधू असल्यामुळे त्यांची निवड झाली नाही. कॉलेजमध्ये असताना त्यांनी त्या काळी मिळालेल्या विवेकानंदांच्या सर्व ग्रंथांची पारायणे केली. त्यातून त्यांचे पौरुषत्व आणि लिंगभाव या बद्दलचे विचार स्पष्ट होत गेले.

सुभाषबाबू चित्तरंजनदास यांना गुरुस्थानी मानत असत. त्यांची पत्नी बसंती देवी यांचे स्थान आई इतकेच महत्त्वाचे होते. चित्तरंजनदास यांच्या मृत्युनंतर बसंतीदेवींना नैराश्य आले. त्या निर्वाणीची भाषा बोलू लागल्या. त्यांनी स्वतःला सावरावे, चित्तरंजनदासांचे कार्य पुढे चालवावे, यासाठी सुभाषबाबूंनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. परिणामी बसंतीदेवींनी काँग्रेस स्वयंसेवकांबरोबर असहकाराच्या चळवळीत भाग घेतला. त्यांना अटक झाली. या अटकेनंतर, स्त्रियांनी राजकीय चळवळीत सक्रिय व्हावे आणि रस्त्यावर उतरावे, याबाबत सुभाषबाबूंच्या मनात विलक्षण फरक पडला. चित्तरंजनदास यांनाही स्त्रियांनी रस्त्यावर उतरून अटक करून घेणे ही कामे पुरुषांचीच आहेत असे वाटे. बसंतीदेवी, उर्मिलादेवी आणि सुनीतादेवी यांसारख्या स्त्रिया रस्त्यावर उतरल्या. कलकत्त्याच्या सामाजिक जीवनावर जणू वीजच कोसळली, सुभाषवरही त्याचा परिणाम झाला. चित्तरंजनदास जरी सुभाषबाबूंना गुरुस्थानी असले तरी त्यांनी चित्तरंजनदासांना विरोध केला.

परदेशी पत्रकारितेमधून भारतीय स्त्रियांची जी प्रतिमा रंगवली जात असे, त्यालाही सुभाषबाबूंनी हरकत घेतली. भारतीय स्त्रिया अबला आणि दुर्बल मनाच्या आहेत, हे इंग्रज

पत्रकारांचे म्हणणे त्यांनी खोडून काढले. त्यासाठी त्यांनी प्राचीन भारतातील काही स्त्रियांची उदाहरणे दिली. या उदाहरणांवरून दिसून येते, की भारतीय महिला तेव्हाही अबला आणि दुर्बल मनाच्या नव्हत्या. सबला आणि सक्षम तर आजही आहेत. तेव्हा त्यांच्या संदर्भात काहीही लिहिताना अगर वागताना ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतीय स्त्रियांत हे गुणही आहेत, असे मान्य करून त्यांना सन्मानानेच वागविले पाहिजे असा आग्रह सुभाषबाबूंनी धरला होता. काँग्रेसमध्ये काम करत असताना स्त्रियांना सामावून घेणारे अनेक कार्यक्रम सुभाषबाबूंनी केले. इ.स. 1928 मध्ये कलकत्त्याला काँग्रेस अधिवेशनात त्यांनी अडीचशे (250) गणवेषधारी स्त्रियांचे पथक उभारले. इतक्या मोठ्या संख्येने स्त्रिया मिरवणुकीने रस्त्यावर उतरल्या, हे हिंदुस्थानात प्रथमच घडले. या पथकातील स्त्रियांचे अधिवेशनातील सदस्यांनी आणि कलकत्त्याच्या वर्तमानपत्रांनी खूप कौतुक केले. स्त्रियांनीही सुभाषबाबूंचे मनोमन आभार मानले. गर्लगाईड सारखे हे पथक नक्कीच नव्हते. हे पथक तयार करण्यामागे सुभाषबाबूंचे अथक प्रयत्न होते. त्यासाठी त्यांनी जहाल गटाच्या मुलामुलींबरोबर चर्चा केल्या. महिला क्रांतीकारकांच्या गट बैठकीत आणि त्यांच्या निरनिराळ्या चर्चासत्रात सुभाषबाबूंनी भाग घेतला. कलकत्त्यात विद्यार्थिनींचा 'छात्रसंघ' होता. या संघात ब्राह्मोसमाज आणि काही मिशनरी कॉलेजमध्ये जाणाऱ्याही मुली होत्या. छात्रसंघातील काही मुलींना 'युगांतर रेव्होल्युशनरी पथकात' प्रवेश मिळाला होता. सुभाषबाबू या मुलींना कठोर प्रशिक्षण देत. त्यांची परीक्षाही घेतली जाई. कल्याणी आणि बीना या सुभाषबाबूंच्या गुरूकन्या. पुढे शिक्षणाकरता आलेल्या कल्पना दत्त, शांती आणि सुनीता या भगिनी होत्या. लतिका घोष या जहाल कार्यकर्तीला सुभाषबाबूंनी सायमन कमिशन समोर पडदानशीन महिलांचा मोर्चा घेऊन जाण्याची विनंती केली. स्वराज्य अहिंसेने मिळणे शक्य नाही यावर लतिका आणि सुभाषबाबू यांचे एकमत होते. त्यामुळे त्यांच्या कार्यात मदत करण्याचे लतिकाने मान्य केले. सनातनी विचारांच्या महिलांनीही या संस्थेत यावे म्हणून सुभाषबाबूंनी आपली आई प्रभावती देवी यांना या संस्थेचे अध्यक्षपद दिले. लतिकास घोषणा संस्थेचे सचिवपद दिले.

सुभाषबाबूंचे गुरू चित्तरंजन दास यांनी 'नारी कर्म मंदिर' नावाची एक संस्था स्थापन केली होती. त्यांच्या मृत्युनंतर ही संस्था बंद पडली. 'महिला राष्ट्रीय संघ' ही संस्था त्यांच्याच संस्थेची सुधारलेली आवृत्ती होती. महिला संघाच्या प्रत्येक शाखेत शारीरिक शिक्षण आणि स्वतःच्या बचावासाठी लाठी आणि जंबिया चालविण्याचे शिक्षण दिले जाई. याचबरोबर राष्ट्रीय आणि देशभक्तीपर गीते, स्फूर्ती देणारी नाटुकली करणे, असे शिक्षण दिले जाई. छात्रसंघ आणि राष्ट्रीय महिला संघात सायकल चालवणे, मोटार ड्रायव्हिंग, पोहणे इत्यादींचे शिक्षण, स्वस्वातंत्र्य आणि आत्मविश्वास वाढवण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे महिला संघाचे धोरण होते.

इ.स 1928 च्या कलकत्ता काँग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळी सुभाषबाबूंना स्त्रियांच्या निरनिराळ्या गटांशी असलेला संपर्क उपयोगी पडला. 'छात्रसंघ' हा त्यांपैकीच एक.

कल्याणी भट्टाचार्य नावाच्या मुलीने एक महिना प्रशिक्षण देऊन 100 मुली स्वयंसेविका म्हणून तयार केल्या होत्या. काँग्रेसच्या राजकारणात हळूहळू स्त्रियांचा प्रवेश जाणवत असला तरी लष्करी गणवेश घालून पुरुषांबरोबर संचलन करणाऱ्या स्त्रिया अपेक्षित नव्हत्या. लतिका घोष स्वयंसेविकांची ऑफिसर इन कमांड होती. तिला कर्नल लतिकादीदी म्हणत. तिने बेथून कॉलेज, व्हिक्टोरिया इन्स्टिट्यूट आणि कलकत्त्यामधील शिक्षिकांना स्वयंसेविका करून घेतले. अधिवेशन चालू असताना या स्त्रियांनी दिवसरात्र काम केले. प्रदर्शन मांडणे, विक्री करणे, खाण्याचे स्टॉल चालवणे यावर भद्र स्त्रिया अहोरात्र काम करताना पाहणे हे देशवासियांना अनोखे होते. आझाद हिंद फौजेची राणी झांशी पलटण करताना सुभाषबाबूंना हा सगळा अनुभव कामी आला. या स्वयंसेविकांपैकी अनेकींनी महिला विकास आणि स्वातंत्र्य संग्राहात आहुती देण्याची प्रतिज्ञा घेतली. त्याचा अनुभव इ.स. 1930 च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीतही आला. त्यांच्या स्वयंसेविका पथकातील लीला नाग हिने मिरवणूका काढल्या तर लतिका घोष हिने दारूच्या दुकानांवर आणि परदेशी कापडांच्या दुकानांवर निदर्शने करण्याकरिता मोर्चा बांधणी केली. लीला नागचे आझाद हिंद फौजेशी सबंध आहेत असा संशय घेऊन तिला 1943 मध्ये स्थानबद्ध केले होते. स्त्रियांना स्वातंत्र्याच्या चळवळीत आणणे हे प्रतीकात्मक नव्हते. तो त्यांचा ध्यास होता. लोकसंख्येचा अर्धा भाग असलेला स्त्रीवर्ग स्वातंत्र्याच्या लढ्यापासून दूर राहूच शकत नाही. त्या जर लढ्यात आल्या नाहीत तर देशाची प्रगती अशक्य आहे हे त्यांचे प्रामाणिक मत होते. आपले असे विचार तरुणांच्या मनावर बिंबवण्यासाठी ते कॉलेज आणि वसतिगृहे यांना भेट देत. मुलींसमोर भाषणे करून त्यांच्याशी चर्चा करत. त्यांना बोलते करत. आपल्या आईबद्दल प्रेम आणि आदर दाखवणारे पुरुष इतर स्त्रियांशी वेगळे कसे वागू शकतात? पुरुषांनी स्त्रियांना त्यांचा योग्य मान आणि दर्जा दिलाच पाहिजे. इ.स. 1929 च्या एप्रिलमध्ये सुभाषबाबू सिल्हेटच्या विद्या परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांच्या भाषणानंतर त्यांना काही प्रश्न श्रोत्यांनी विचारले. त्या प्रश्नांना उत्तर देताना सुभाषबाबू म्हणाले, “स्त्रियाच स्त्रियांना जागृत करू शकतात, स्त्रियांनो तुम्हाला स्वतःलाच हे काम करावयास पाहिजे. अडचणी येणारच, संकटेही येणारच, नव्हे अक्षरशः कोसळणारच. तुम्ही उच्च शिक्षण घेत आहात, या देशातल्या लिहू-वाचू न शकणाऱ्या स्त्रियांना तुम्ही वाचवू शकाल. त्यांना व्यावसायिक शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभ्या करू शकता ना? तरुण मुलींना शारीरिक शिक्षण देता येईल ना? या देशात स्त्रियांवर जितके जुलूम, अन्याय आणि अत्याचार होतात तितके जगात कुठेच होत नसतील.”

सुभाषबाबू 1938 साली काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्या वेळी त्यांनी स्त्रियांना राजकीय जीवनात सामावून घेण्यासाठी अनेक उपक्रम राबवले. प्रत्येक कार्यक्रमात स्त्रियांची नजरेत भरण्याइतकी उपस्थिती राहील याचे प्रयत्न त्यांनी केले. हरिपुरा काँग्रेसच्या अधिवेशनात मृदुला साराभाई यांच्याकडे मांडव, चहा, नाश्ता, भोजन व त्याचबरोबर मंडप सफाई आणि सांडपाण्याची व्यवस्था, अभ्यागतांची व्यवस्था ही कामे सोपवली. स्त्रियांना संधी मिळाली

तर त्या आपल्यावर सोपविलेली कामे अतिशय जबाबदारीने व सुंदर करू शकतात, हे मृदुला साराभाई व त्यांच्या स्वयंसेविका पथकाने सिद्ध केले.

काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून सुभाषबाबूंनी केलेली आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे नॅशनल प्लॅनिंग कमिटीची स्थापना करण्यासाठी त्यांनी घेतलेला पुढकार, जवाहरलाल नेहरू यांना त्या कमिटीचे अध्यक्ष नेमले. प्लॅनिंग कमिटीच्या चौकटीत स्त्रियांचे प्रश्नही अंतर्भूत करायचे असे सुभाषबाबू आणि नेहरू यांनी ठरवले. स्त्रियांना बाजूला ठेवून हिंदुस्थानचे स्वातंत्र्य अस्तित्वात येऊच शकत नाही असे सुभाषबाबूंचे मत होते.

महिला चळवळ आणि स्त्री अभ्यासक यांनी धरलेले आजचे मोजमाप पंचाहत्तर वर्षांपूर्वीच्या स्त्रियांच्या अगर पुरुषांसाठीच्या मानसिकतेला लावता येणार नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर सर्व जगातीलच सामाजिक व आर्थिक स्थिती बदलली आणि आंतरराष्ट्रीय महिला वर्षापासून तर ती झपाट्याने बदलत चालली आहे. सुभाषबाबूंना पंचाहत्तर वर्षापूर्वी ते जाणवले, हे महत्त्वाचे होते.

सुभाषबाबूंना आग्नेय आशियात आणण्यासाठी जपानने जर्मनीशी बोलणी केली. जर सुभाषबाबूंना तसे आणण्यात यश मिळाले तर त्यांच्या असीम लोकप्रियतेमुळे पूर्व आणि आग्नेय आशियातील जनता त्यांच्याभोवती गोळा होईल, याची जपानला खात्री होती. जर्मनीच्या 'यू' पाणबुडीतून सुभाषबाबूंनी जपानकडे प्रयाण केले. हा प्रवास सहा महिने चालू होता. जर्मनीतील आझाद हिंद फौजेतील त्यांचे सहकारी अधिकारी मेजर अबीद हुसन आणि मेजर स्वामी त्यांच्या बरोबर होते. सुभाषबाबूंची रोजची टिपणे लिहून घेण्याचे काम मेजर अबीद हुसेन यांच्याकडे होते. स्त्रियांनीही युद्धभूमीवर उतरले पाहिजे हा विचार सुभाषबाबूंच्या मनात कित्येक वर्षे घर करून होता. आग्नेय आशियात हिंदी लोकांची आणि युद्धकैद्यांचीही संख्या लक्षणीय होती. त्यामुळे आग्नेय आशियातील आझाद हिंद फौजेमध्ये या विचाराला त्यांनी मूर्त स्वरूप द्यावयाचे ठरवले. या प्रवासातच त्यांनी राणी झांशी रेजिमेंटची योजना तपशीलवार तयार केली. त्यातल्या अनेक गोष्टी हिंदी स्त्रियांना ओळखणाऱ्या आणि त्याच समाजात जन्मून वाढलेल्या अबीद हुसेन याला पटत नव्हत्या. सुभाषबाबूंनी त्यांच्याशी युक्तिवाद



*नेताजी सुभाषचंद्र बोस आणि कॅप्टन लक्ष्मी सहगल भारतीय राष्ट्रीय सैन्याच्या राणी झांशी रेजिमेंटच्या सदस्यांसह*

केला. हिंदी स्त्रिया लष्करी गणवेष घालतील, केस कापतील आणि एखाद्या सैनिकासारख्या वागतील हे सुभाषबाबूंचे विचार मेजर अबीदला पटत नव्हते. पण त्या हे सर्व करतीलच, असा विश्वास सुभाषबाबूंनी ठासून व्यक्त केला. नाट्यपूर्ण पद्धतीने निघालेले सुभाषबाबू हिंदी महासागराच्या मध्यावर पाणबुडी बदलून जपानी पाणबुडीतून 20 जून 1943 ला जपानला पोहोचले. 4 जुलै रोजी त्यांच्या स्वागतासाठी जमलेल्या सभेत त्यांनी के. मोहनसिंगनी स्थापना केलेल्या इंडियन नॅशनल आर्मीचे आझाद हिंद फौज असे भारतीय नामकरण केले. जर्मनीमधली फौज याच नावाने लढत होती. तसेच, या आझाद हिंद फौजेत इतर पलटणींबरोबरच झांशीची राणी नावाची महिला पलटण सुरू करण्याची घोषणाही सुभाषबाबूंनी केली. ही घोषणा लोकांच्या कल्पनेच्या बाहेरची असल्यामुळे श्रोत्यांनाही नेताजींना काय नेमके म्हणायचे आहे ते समजले नाही.

डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन आणि लीगच्या स्त्री विभागाच्या प्रमुख श्रीमती चिदंबरम आणि बॅ. यल्लप्पा यांनी 12 जुलै 1943 ला केवळ स्त्रियांची एक ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची सभा आयोजित केली. नेताजी सुभाष यांचा महिला पलटणीचा विचार स्त्रियांपर्यंत पोहोचवणे हा त्या सभेचा उद्देश होता. या सभेत मार्गदर्शनाकरिता नेताजींना बोलावले होते. स्त्रियांनी त्यांना लष्करी पद्धतीची मानवंदना दिली. या मानवंदनेकरिता मुलींना प्रशिक्षण देण्यासाठी आझाद हिंद फौजेतून दोन ज्येष्ठ हवालदार आणले होते. दोन दिवस कठोर परिश्रम करून सफेद गणवेषात मुलींनी दिलेली मानवंदना स्वीकारताना नेताजींना आनंदाचे भरते आले. एकूण मानवंदना फारच परिणामकारक झाली. राणी झांशी रेजिमेंट चांगला आकार घेईल याबद्दल नेताजींची खात्री झाली. 12 जुलैच्या या ऐतिहासिक सभेत नेताजींनी ‘राष्ट्रीय चळवळीतील स्त्रियांची भूमिका’ या विषयावर भाषण केले. “सार्वजनिक अगर राष्ट्रीय कार्यात अशी एकही जागा नाही की ज्यात हिंदी स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने आणि शौर्याने आपला भाग उचलला नाही. स्त्रियांची पात्रता केवढी मोठी आहे याची आपल्याला जाणीव आहे आणि म्हणूनच मी म्हणतो की, आमच्या भगिनी सहन करू शकणार नाहीत अशा यातना असूच शकत नाहीत. हिंदी स्वातंत्र्याच्या या शेवटच्या युद्धात आम्हाला झांशीची एक राणी पुरणार नसून हजार झांशीच्या राण्या हव्या आहेत. तुम्ही किती बंदुका घेऊन जाल? किती गोळ्या झाडाल? हा महत्त्वाचा मुद्दा नाही. तुम्ही जे उदाहरण घालून द्याल त्याचा होणारा नैतिक परिणाम महत्त्वाचा आहे.”

13 जुलै 1943 ला सुभाषचंद्रांनी डॉ. लक्ष्मी स्वामिनाथन यांना बोलावून घेतले. अहिंसावादी घरातून आलेल्या या मुलीला युद्धभूमीवर काम करण्यासाठी किती तयारी करावी लागेल काय काय आणि कोणकोणत्या आपत्तींना तोंड द्यावे लागेल? याचे स्पष्ट चित्र तिच्यापुढे उभे केले. इतिहासात गाजलेल्या स्त्रिया या आपल्या दृष्टीने आदर्श असल्या तरी घर, कुटुंबाचे पावित्र्य आणि एकजिनसीपणा याबाबत माता आणि पत्नीचीही भूमिका ते महत्त्वाची मानीत. आधुनिक जगात, विशेषतः राष्ट्रीय चारित्र्याचे अध:पतन होत असलेल्या आपल्या देशात स्त्रियांना फक्त आपल्या संसाराचा विचार करून चालणार नाही, शिक्षण,

सार्वजनिक आरोग्य, नागरी समस्या इत्यादी कामांमध्ये स्त्रियांनी आपली जबाबदारी ओळखून जबाबदारीचा अर्धा वाटा उचलला पाहिजे. देशाचे स्वातंत्र्य मिळवण्याची आपली जबाबदारी ओळखून शस्त्र हाती धरणे जरुरीचे आहे. डॉ. लक्ष्मीच्या घरचे वातावरण गांधीवादाचा पुरस्कार करणारे आहे आणि ते आपल्या विचाराच्या विरोधात आहे ही जाणीवही नेताजींनी डॉ. लक्ष्मींना करून दिली. के. लक्ष्मी सांगतात, की आपण काही नवे सांगतो असा नेताजींचा आविर्भाव नव्हता. राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांनी लाठ्या खाल्ल्या, अश्रूधुराला तोंड दिले, कारावासही भोगला. नेताजींची स्त्रियांकडून यापेक्षाही मोठी अपेक्षा होती. त्यांच्या मते, हातात बंदूक घेऊन स्त्रिया लढण्यासाठी सज्ज झाल्या की त्याचा दुहेरी फायदा होईल. महिला त्या देशाचे स्वातंत्र्य मिळवतीलच आणि मग त्यातूनच सामाजिक बेड्या तोडण्याचे सामर्थ्यही त्या मिळवतील हा त्याचा दुसरा फायदा असेल. स्वातंत्र्ययुद्धातील सहभागामुळे स्त्रिया आपल्या आधिकाराची मागणी करून शोषणमुक्त होतील, याचा विश्वास त्यांना होता. हे लक्ष्मीबरोबरच्या नेताजींच्या चर्चेतून स्पष्ट होते. म्हणूनच की काय डॉ. लक्ष्मी म्हणत, “नेताजी सुभाषचंद्र बोस हे सर्व भारतीय नेत्यांतील अग्रभागी असलेले स्त्रीवादी नेते होते. राणी झांशी पलटणीची स्थापना झाल्यावर आझाद हिंद फौजेतील गैर-आयुक्त अधिकारी (नॉन कमिशण्ड) अधिकाऱ्यांच्या मुलाखती नेताजींनी स्वतः घेतल्या. या प्रशिक्षकांना महिला जवान आणि पुरुष जवान यांच्यातील नेमका वेगळेपणा स्पष्ट केला. प्रशिक्षणात स्त्री–पुरुष असा भेद नाही. फौजेचे सर्व नियम आणि कडक शिस्त राणी झांशी पलटणीलाही लागू आहेत. महिला जवान नाजुक आहेत असे समजू नये, स्त्री सैनिकांबरोबर असंसदीय भाषेत बोलता कामा नये. आपण आपल्या बहिणींशी संवाद साधत आहोत हे ध्यानात ठेवा. त्यांचा मान आणि स्वाभिमान तुम्ही जपला पाहिजे. पुरुष जवानांवर जसा शारीरिक बळाचा वापर केला जातो तसा शारीरिक बळाचा उपयोग त्यांच्यावर करता कामा नये अशी समज त्यांनी शिक्षकांना दिली होती.”

नेताजी आणि डॉ. लक्ष्मी आपापले दौरे आटोपून सिंगापूरला परतले. पितृप्रधान जपान सरकारला महिला पलटण ही कल्पनाच मान्य नव्हती. अडचणीच्या काळात अशा पलटणीसाठी पैसा खर्च करणे हे तर अजिबातच मान्य नव्हते. त्यामुळे सिंगापूरमध्ये महिला पलटणीला जागा मिळण्याच्या कामी ते खोडा घालत होते. नेताजी दौऱ्यावरून परत आल्यावर ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. जपान्यांशी चर्चा न करता, त्यांची पूर्व संमती न घेता किंवा पूर्व सूचनाही न देता, योग्य वाटेल ती जागा ताब्यात घेण्याचे आदेश नेताजींनी इंडिया इंडिपेंडन्स लीगला दिले. आझाद हिंद फौजेला जपान्यांची महत्त्वाची मदत असूनही त्यांच्याविरोधात नेताजींनी घेतलेला हा निर्णय दोन गोष्टी स्पष्ट करतो. एक, आझाद हिंद सरकारचे सार्वभौमत्व; व दोन, स्त्रियांच्या पलटणीची त्यांना वाटणारी निकड आणि महत्त्व.

21 ऑक्टोबर 1943 ला हंगामी आझाद हिंद सरकारची स्थापना झाल्याची नेताजींनी घोषणा केली. या सरकारात स्त्रिया आणि मुले असे एक स्वतंत्र खाते निर्माण केले. त्या काळात जगातल्या कुठल्याच सरकारात असे खाते असल्याचा उल्लेख हाताशी

आला नाही. स्त्रियांना समजण्याच्या व त्यांच्या शक्तीचा पूर्ण उपयोग करून घेण्याच्या नेताजींच्या विचारातूनच या खात्याची निर्मिती झाली.

डॉ. लक्ष्मी यांच्याकडे त्यांनी हे खाते सोपवले. त्यांना कॅबिनेटमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा दर्जा दिला. यावरून नेताजींचे पुरोगामित्व हे फक्त बोलण्यापुरते नव्हते हे सिद्ध झाले होते. दुसऱ्याच दिवशी म्हणजे 22 ऑक्टोबरला राणी झांशी रेजिमेंटचे विधिवत उद्घाटन झाले. ही पलटण युद्धकैदी किंवा ब्रिटिश सैन्य सोडून आलेली नव्हती. ती शुद्ध भारतीय महिलांची होती. हंगामी स्वतंत्र हिंदुस्थान सरकारची पहिली महिला पलटण होती. नेताजी जे बोलत होते ते त्यांनी करून दाखवले. या प्रसंगी केलेल्या भाषणात ते स्त्रियांना उद्देशून म्हणाले, "भारतीय स्वातंत्र्यासाठी आझाद हिंद फौजेत भरती होऊन आपल्या बंधूंच्या खांद्याला खांदा लावून लढण्याचे मी तुम्हाला आवाहन करतो." सभेसाठी आलेल्या अबालवृद्ध स्त्रियांनी उभे राहून आणि आवाज उंचावून नेताजींचे आवाहन स्वीकारले. झांशीची राणी पलटणच्या सर्व अधिकारी स्त्रियाच असतील याची ग्वाही दिली. दुसऱ्याच दिवशीपासून सुशिक्षित आणि सुदृढ मुलींची मुलाखत, वैद्यकीय परीक्षा आणि पालकांचा परवाना या गोष्टी घडल्या. आझाद हिंद फौजेतील नॉन कमिशन्ड ऑफिसरांची अत्यंत काळजीपूर्वक मुलाखत घेऊन निवड केली. मेजर जनरल चटर्जी यांच्याकडे रेजिमेंटची सर्वसाधारण देखरेख सोपवली. नेताजी स्वतः जातीने या प्रशिक्षणात लक्ष घालत होते.

सुभाषबाबूंचे राणी झांशी पलटणीवरचे प्रेम अवर्णनीय होते. रोज दुपारचे जेवण ते ह्या पलटणीबरोबर करत. सर्वांना हात करून जात. राणी झांशी रेजिमेंटला माघारी जाण्याचा हुकूम मिळाला तेव्हा त्यांनी 'मेमियो'पासून रेजिमेंटबरोबर पायी प्रवास केला. रात्री सामान्य सैनिकाप्रमाणे ट्रकमध्ये झोपले.

राज्यापर्यंत असलेल्या नदीच्या पाण्यातून राण्यांबरोबरच उतरून पैलतीर गाठला. पोलसिमला (Moulmein) पोहोचल्यावर बँकॉकपर्यंतचा प्रवास आगगाडीने केला. त्यांना निरोप देताना त्यांच्या शौर्याचे आणि संकटांना तोंड देण्याचे कौतुक केले. आजही गांगुली भगिनी हे सांगत असताना नेताजींच्या आठवणीने व्याकूळ होतात. जपान्यांचा पराभव, आझाद हिंद फौजेची माघार व अवेळीचा पाऊस यांनी सुभाषबाबूंचे स्वप्न भंगले. हिंदुस्थानातील वेगवेगळ्या प्रातांच्या, भाषेच्या व धर्माच्या स्त्रियांना पुरुषांबरोबर काम करण्याची हिंमत सुभाषबाबूंनी दिली. शरीर सुदृढ ठेवण्यासाठी उत्तेजन दिले. स्त्रिया, दलित, शेतकरी आणि कामकरी या सर्वांना मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय लढ्यात आणण्याचे काम त्यांनी केले. ते करत असताना हिंदुस्थानच्या भल्यासाठी प्रत्येक क्षेत्रात आणि कामात स्त्री-पुरुषांची भागीदारी असली पाहिजे असा आग्रह धरला. हिंदुस्थानच्या प्रत्येक सामाजिक, आर्थिक व राजकीय बाबतीत स्त्रियांची हजेरी व सहभाग असलाच पाहिजे याबद्दल ते निश्चयी होते. स्त्रियांना वगळून भारताच्या विकासाचा व प्रगतीचा आराखडा बनूच शकत नाही, असे त्यांचे ठाम मत होते. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर राणी झांशी रेजिमेंट जेव्हा हिंदुस्थानात प्रवेश करेल त्या वेळी या राणी झांशी पलटणीतील सैनिक

राण्या आझाद हिंद फौजेत शिकलेली शिस्त कामाशी बांधिलकी ठेवूनच वागतील. स्त्रिया आणि मुले यांच्यासाठी निष्ठेने झटतील, असे स्वप्न नेताजींनी पाहिले होते. जाती व धर्मबंधने पाळणार नाहीत, कारण सर्वांनी एकाच प्रकारचे व एकत्र बसून जेवण्याचे संस्कार त्यांच्यावर पलटणीत झाले होते. त्याला नेताजी स्वतः ही अपवाद नव्हते. राणी झांशी रेजिमेंटमध्ये मुलींबरोबर हास्यविनोद करून आणि जमिनीवर बसून ते भोजन करत. सैन्याच्या शिस्तीत बसेल इतके मुलींचे कोडकौतुक करत. हीच शिकवण त्यांनी आपल्या वागणुकीतून राण्यांना दिली.

स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक दृष्ट्या सबल केले पाहिजे हा विचार त्यांनी प्रत्यक्षात आणला. स्त्रिया, दलित आणि श्रमिक हे तीन सामाजिक गट पीडित आहेत व ते मुक्त झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही, हे त्यांचे विधान त्या काळातल्यासारखे आजही खरे आहे. लष्कराच्या मुख्य प्रवाहाला जोडलेली स्त्रियांची स्वतंत्र पलटण, त्यातले सर्व अधिकारी फक्त स्त्रिया, त्यांनाही हवालदार ते कर्नलपर्यंतचे हुद्दे हेही त्या काळाने प्रथमच पाहिले. इतिहासात एखादी जोन ऑफ आर्क, ताराबाई, झांशीची राणी अशा हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या स्त्रिया होऊन गेल्या. पण पंधराशे स्त्रियांची पलटण, कर्नलपदापर्यंत पोहोचलेली डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन हे मात्र जगातील एकमेव उदाहरण आहे. त्याचे जनक भारतीय नेते नेताजी सुभाषचंद्र बोस होते ही आपल्याला अभिमानाची गोष्ट आहे.

आझाद हिंद फौजेची माघार, जपानचा दारुण पराभव व नेताजींचा अकाली मृत्यू ह्यामुळे सुभाषबाबूंची सर्व स्वप्ने प्रत्यक्षात पूर्ण उतरली नाहीत, पण त्यांच्या हिंदुस्थानातील राजकीय कारकिर्दीकडे पाहिले की स्त्रियांच्या राजकीय सहभागाकडे पाहण्याच्या त्यांच्या विचारसरणीत उत्क्रांती होत गेल्याचे जाणवते.

स्त्री-पुरुष समानतेचा धडा नेताजींनी घालून दिला. रेजिमेंटने तो अल्पावधीतच उत्तम गिरवला. महिला पलटण जगातल्या सर्व पराधीन देशांना आदर्श ठरेल. आज भारतीय स्त्रीलाही स्वतःची पलटण झाल्यामुळे आणि अधिकारपदे मिळाल्यामुळे ते सिद्ध झाले आहे. जगातील सर्व राज्यात आझाद हिंद सरकारनेच प्रथम महिला-बालकल्याण हे खाते कॅबिनेट खाते केले. जगातली पहिली कॅबिनेट मंत्री म्हणून कॅप्टन लक्ष्मी यांचा सन्मान केला. जगातली पहिली महिला पलटणीची प्रमुखही कॅ. लक्ष्मीच होत्या. या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या, की जगातल्या पहिल्या स्त्रीवादी नेतेपदाचा मानही नेताजींचाच आहे हे ले. कर्नल लक्ष्मी (लोकप्रिय नाव कॅप्टन लक्ष्मी) म्हणतात त्या विधानाची सत्यता पटते. आज त्यांच्या ‘जयहिंद’ या प्रभावी नाऱ्याने ते भारतीय मनात कायम आहेत आणि राहतीलही.

■ ■

# भाग 4

# डॉ. लोहियांची महिला नीती



डॉ. राममनोहर लोहिया हे भारतातील एक प्रतिभावंत समाजवादी विचारवंत. काँग्रेसमध्ये जो काँग्रेस समाजवादी गट होता त्या गटातील महत्त्वाच्या विचारवंतांपैकी ते एक होते. एक सच्चा स्वातंत्र्यसैनिक व देशभक्त. 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाले व 1948 ला काँग्रेस समाजवादी गटाने पाटण्याला परिषद घेऊन काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला व स्वतंत्र समाजवादी पक्ष स्थापन केला. डॉ. राममनोहर लोहिया त्यातले एक तरुण म्होरके होते.

स्वातंत्र्यापूर्वीचा भारत व नंतरचा भारत यात काही बाबतीत मूलभूत फरक पडणे आवश्यक होते. तो पडला का? तो पडत नसेल तर का पडत नाही? हा लोहियांच्या चिंतनाचा विषय होता. स्वातंत्र्य मिळून देशाची आपली स्वतःची राज्यघटना अस्तित्वात आली तरी लोहियांना समता कुठेही दिसत नव्हती. ही समता आणून समाजवादाची पाळेमुळे खोलवर रुजल्याशिवाय देश खऱ्या अर्थाने लोकशाही समाजवादी राष्ट्र होणार नाही, असा डॉ. लोहियांना ठाम विश्वास होता. त्यांच्या मते समाजवाद येण्याच्या आड येणारी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तळागाळातील जनता, दलित आणि स्त्रिया यांची होणारी सामाजिक व राजकीय छळवणूक होय. विशेषतः स्त्रियांचा उद्धार स्त्रियांनीच केला पाहिजे व पुरुषवर्गाने त्यांना जोरदार साथ दिली पाहिजे, ही समज आपल्या पक्षकार्यकर्त्यांना देण्याचा लोहियांनी प्रयत्न केला. 1952 मध्ये प्रजासत्ताक भारतातील पहिल्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात लोहियांच्या नेतृत्वाखाली बनलेला समाजवादी पक्षाचा एकमेव जाहीरनामा असा होता, की ज्यात श्रमिक व सामान्य गृहिणींचा विचार प्रामुख्याने झाला. या जाहीरनाम्यात ग्रामीण स्त्रियांना पाणी व इंधन यांच्या असुविधेमुळे होणारे कष्ट व वेळेचा व्यय याकडे लक्ष दिले होते. या सुविधा ग्रामीण स्त्रियांना मिळाल्या तर फुरसतीचा अधिक वेळ तिला मिळेल व ती शिक्षण घेऊन आपले जीवन संपन्न बनवू शकेल. पुढे संयुक्त समाजवादी पक्षाच्या जाहीरनाम्यात स्त्रियांची उन्नती साधण्याकरिता त्यांना मोफत शिक्षण

व नोकऱ्या देण्याच्या विचारांचा पाठपुरावा केला आहे. त्या गोष्टी स्त्रियांना सुलभ व्हाव्यात म्हणून सर्व थरांवरील स्त्रियांना मोफत शिक्षण देण्याचा आग्रह धरण्यास लोहियांनी स्वपक्षाला भाग पाडले होते.

1952 ते 1957 सालापर्यंत हिंदू कोड बिल घडले. समाजवादी विचारांच्या अनेक महिलांनीही या बिलाचे स्वागत केले. या बिलावर बोलताना डॉ. लोहिया म्हणाले की, हे बिल अगदी उथळ आहे. या बिलामुळे देशातल्या 80 टक्के स्त्रियांना काय फायदा होणार आहे? ज्यांच्याकडे निर्धनतेचा वारसा पिढ्यानपिढ्या आला आहे त्यांना या कायद्याचा काय उपयोग?

भारतीय समाजावर रूढी व परंपरेचे फार मोठे ओझे आहे. त्याला 'संस्कृती' हा गोंडस शब्द वापरला जातो. भारतात रामराज्य यावे, असे गांधीजी म्हणत. तर डॉ. लोहिया म्हणत, 'भारतात सीता-रामराज्य आले पाहिजे.' सीतेलाही रामाइतकेच किंबहुना थोडे अधिकच महत्त्व डॉ. लोहिया देत. महाभारतातल्या द्रौपदीबद्दल लिहिताना व बोलताना, पाच नवरे असूनही तिचे पतिव्रत्य कसे श्रेष्ठ होते यावरच सर्व जोर असतो. पण द्रौपदी ही अत्यंत बुद्धिमती, हजरजबाबी, विषयाचे संपूर्ण आकलन करून घेणारी व धैर्यवती स्त्री होती, याबद्दल मात्र आग्रहाने कोणी लिहीत नाही की बोलत नाही. कृष्णासारख्या राजकारणी पुरुषाने म्हणूनच तिला बहीण मानले असावे. गांधारीच्या पतिनिष्ठेचे व पत्नी म्हणून कर्तव्यपालनाचे गोडवे गायले जातात. पण हे कुणी गायले? पुरुषत्वाचे श्रेष्ठत्व नसानसातून वाहणाऱ्या पुरुषांनी, कुठल्याही बाईने नव्हे. गांधारीचे डोळे बांधून जगणे हा पित्याविरुद्धचा निषेध दाखवण्याचाही एक मार्ग असेल, हे कोणाला पटकन सुचत नाही. अर्वाचीन इतिहासाबद्दल डॉ. लोहिया म्हणत की, झांशीची राणी, सुलताना रझिया यांच्याबद्दल लिहिताना इतिहासकार म्हणतात, 'त्या पुरुषासारख्या लढल्या.' पण त्यांचे संघटनकौशल्य, राज्यकारभारातील नैपुण्य, लढाईतील नेतृत्व, पुरुषांनाही चार शब्द सुनावण्याची ताकद — याबद्दल मात्र कोणीच काही लिहीत नाही. हे गुण काही फक्त पुरुषांचे नाहीत. परिस्थिती, वातावरण व जिद्द यामुळे स्त्रीवरही कर्तृत्वाचे पैलू पडू शकतात, याची ही उदाहरणे आहेत, याकडे लोहिया लक्ष वेधत.

रूढी व परंपरेने स्त्रियांवर बंधने का घातली? यावर डॉ. लोहिया म्हणतात की, स्त्रिया घराबाहेर पडूच नयेत, त्यांनी जग पाहू नये म्हणून तर गोषा, पडदा, घुंघट या प्रथा आल्या. संस्कृतीच्या नावाखाली चुकीचा आदेश त्यांना दिला गेला आणि मग स्त्रियांनी आपल्यावर दबाव आणणाऱ्या तंत्राची साधने शोधू नयेत म्हणून त्यांच्या नाजूकपणा, सौंदर्य, मार्दवता, नम्रता, सहनशीलता अशा गोष्टींचा उदो उदो करून स्त्रियांना मंत्रमुग्ध केलं गेलं. सामान्य स्त्रिया त्यात अडकल्या. त्याचा एक कोषच त्यांच्या भोवती विणला गेला.

आपण काय करू शकतो हे जाणवण्याच्या स्त्रियांच्या कुवतीवरच पुरुषांनी प्रहार केला. अशी स्त्रियांची मानसिकता त्यांनी तयार केली.

1953 ते 1962 पर्यंतच्या दशकात डॉ. लोहियांनी जातीप्रथा व लिंगभेद हे दोन

लोखंडी पिंजरे आहेत, त्या पिंजऱ्यांतून बाहेर पडण्यासाठी काय करावं लागेल याचं केलेलं चिंतन, त्यांचे लेख व भाषणे यातून व्यक्त झाले आहे, त्यांच्या या चिंतनातून असे स्पष्ट होते की, स्त्रियांचे वेगवेगळे वर्ग जातीप्रथेमुळे पडतात. त्यांच्या त्यांच्या जातीची बंधने स्त्रियांवर येतात. त्यामुळे सर्व स्त्रियांवर सारखीच बंधने नसतात. त्याची तीव्रता कमी-जास्त असते. शहरी स्त्रियांपेक्षा ग्रामीण स्त्रीवर पारंपरिक बंधने अधिक. डॉ. लोहिया हे बदलण्यासाठी आंतरजातीय विवाहाचा मार्ग सुचवतात. ठाकूर व कुणबी, ब्राह्मण व तेली, क्षत्रिय व हरिजन असे विवाह झाले तर महिलांकडे बघायचा दृष्टिकोन बदलत जाईल आणि त्यांच्या त्या परिस्थितीत फरक पडत जाईल, असे डॉ. लोहिया यांनी मांडले होते.

19 व्या शतकात स्त्रियांच्या सामाजिक सुधारणांसंबंधी बरेच ललित व ललितेतर वाङ्मय प्रसिध्द झाले. ते विशेषतः मध्यमवर्गातील कुटुंबातील चार भिंतीच्या आड असलेल्या स्त्री-पुरुष संबंधांबद्दलचे आहे. या कुटुंबात डॉ. लोहियांच्या मते समानता नाही. अन्न, आरोग्य, शिक्षण, मुलांना वाढवणे, जोडीदार म्हणून असलेले नाजूक संबंध, बाहेरच्या जगाशी स्त्रियांचा संबंध नसणे, स्त्री-पुरुषांमध्ये फारच मोठे अंतर असणे यातून ते साहित्य निर्माण झाले होते. लोहिया म्हणत, की पाश्चात्त्य देशात जसे स्त्री व पुरुष घरातली सर्व कामे जोडीने करतात, तशी पद्धत भारतीय कुटुंबपद्धतीतही रूढ झाली पाहिजे. कमीत कमी वेळात व कमी श्रमात स्वयंपाक झाला पाहिजे. त्यासाठी स्वयंपाक करण्याचे नवे तंत्र आणि नव्या सोप्या पाककृती निर्माण केल्या गेल्या पाहिजेत, तरच स्वयंपाक कमी वेळात होऊन बाकीचा वेळ त्यांना इतर कामांकडे वळवता येईल. दुसरे वेळखाऊ व श्रमाचे काम म्हणजे पाणी भरणे. खेडेगावात लांबून तळ्यावरून किंवा नदीवरून पाणी आणावे लागते. कमेरवर व डोक्यावर हंडे घेऊन जाणाऱ्या पाठमोऱ्या बाईचे चित्र काढणे व तिच्या हालचालींवर कविता करणे या गोष्टी लोहियांना क्रूरपणाच्या वाटायच्या. त्यामुळे विहिरीवर पंप बसवणे लोहियांना जरुरीचे वाटायचे. इंधन व पाण्यासाठी पंप या दोन्ही गोष्टींचा समावेश त्यांनी आपल्या जाहीरनाम्यात केला होता.

मृणाल गोरे जेव्हा नगरसेविकापदासाठी निवडणूक लढवणार होत्या, त्यावेळी डॉ. लोहियांनी मृणाल गोरेंना निवडून आल्यावर मुंबईतील पाण्याच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करायला सांगितले. त्यातूनच 'पाणीवाली बाई' निर्माण झाली. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला तो म्हणजे स्नान व प्रातर्विधी यासाठी स्त्रियांना आवश्यक असणारा आडोसा मिळाला पाहिजे. आजपर्यंत अगदी 21 व्या शतकातही हा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही.

महिला पुरुषांच्या बरोबरीने शेतात काम करतात. पण मजुरी मात्र त्यांना कमी मिळते. घरी येऊन स्वयंपाकपाणी त्याच करतात. पुरुष जेवल्यावर बहुधा उरलेसुरले त्यांच्या वाट्याला येते. या गोष्टीला आपण कुटुंबातील समानता म्हणणार आहोत का?, हा प्रश्न लोहिया आपल्या पक्षसदस्यांना वारंवार विचारत. बाईला जर पुरेसे व पौष्टिक अन्न मिळाले नाही तर ती कुटुंबाचे स्वास्थ्य कसे राखू शकेल? मुलींची जन्मल्याबरोबर होणारी हत्या,

हुंडा व लग्नातील अफाट खर्च, बायकोला मारहाण या गोष्टी समाजवादी समाजरचनेच्याच नव्हे, तर मानवतावादाच्याही विरोधात आहेत. म्हणून स्वतःला समाजवादी म्हणवून घेणाऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी अशी वागणूक आपल्या घरातल्या स्त्रियांना देऊ नये व इतरांनाही अशी वागणूक देण्यापासून परावृत्त करावे, असे डॉ. लोहियांचे सांगणे असे.

विधवा, विशेषतः बालविधवा, आणि अविवाहित एकटी स्त्री या दोन्ही गटातील महिलांना समाजात फार वाईट वागवले जाते आणि याला फक्त पुरुषच जबाबदार असतात असे नाही, तर विवाहित व सुरक्षित असलेल्या स्त्रियाही तितक्याच जबाबदार असतात. ही स्त्रियांना मिळणारी क्रौर्याची वागणूक नष्ट होईल तेव्हाच स्त्री-पुरुषांतील असमानतेचे अंतर कमी होईल, असे लोहिया सांगत.

स्त्रियांच्या लैंगिकतेवरही लोहिया आपले विचार मांडतात. स्त्रियांच्या योनिशुचितेबद्दल ते म्हणतात, 'योनिशुचितेमुळे स्त्रीची नैतिकता किंवा शुद्धता लयाला जात नाही. त्यामुळे जर लयाला काही जात असेल तर स्त्रीत्वाची प्रतिष्ठा.' दोषी बलात्कार करणारा असतो. त्याला बळी पडणारी बाई आपण कशी दोषी ठरवितो? गृहिणीची लैंगिकता व घरकामाची जबाबदारी हेच फक्त तिचे अस्तित्व आहे हे मानणे चुकीचेच नव्हे, तर स्त्रीसमाजावर अन्याय करणारे आहे. बाई वंश वाढवण्यासकट अनेक उत्पादक कामात भाग घेते. तिचे हे काम अधिक प्रतिष्ठेचे आहे, असे ते मानत.

स्त्रियांचे दुय्यमत्व, त्यांना दिली जाणारी वागणूक यात बदल करण्याचा कायदा हा एक मार्ग आहे. पण तो एकमेव मार्ग नाही. म्हणूनच आपल्या सर्व चिंतनातून व त्याच्या प्रकटीकरणातून डॉ. लोहिया स्त्रियांच्या संघटनांनाही एक निश्चित संदेश देतात, "महिला संघटनांनी घटस्फोट, संपत्तीचा अधिकार याबरोबरच तिच्या प्रतिष्ठेच्या आड येणाऱ्या ज्या मूलभूत समस्या आहेत, त्यांचा विचार करावा. जात, वर्ग, घरातील न संपणारी कामे, नवे तत्त्वज्ञान, आरोग्य या बाबतीत ग्रामीण व नागरी असा भेद न करता ती एक 'स्त्री' आहे असा विचार करावा." डॉ. लोहियांनी स्त्रियांच्या सबलीकरणाकरता संपूर्ण समाजाने एकवट विचार केला पाहिजे, असे म्हटले आहे. समाजवादी म्हणवणाऱ्यांनी तर तो अधिकच केला पाहिजे हा त्यांचा मौलिक विचार त्यांचे अनुयायी आजही खऱ्या अर्थाने उचलून धरत नाहीत. हे समाजवादी विचारसरणी मानणाऱ्या स्त्रियांचेही दुर्दैव.

डॉ. लोहियांनी मांडलेले स्त्रियांचे प्रश्न आजही, म्हणजे सहा दशकांनंतरही पूर्णपणे सुटले नाहीत. त्यांनी 20 व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या सुरुवातीला ते मांडले होते. डॉ. लोहियांचे अपुरे असलेले स्वप्न पुरे करण्याचा निश्चय समाजाने करणे हीच त्यांना योग्य श्रद्धांजली ठरेल!

■ ■

# भाग 5

# डॉ. आंबेडकरांची महिला नीती

स्त्री मुक्तीची सध्या अस्तित्वात असलेली संकल्पना ही भारतात अगदी अलीकडे म्हणजे आंतरराष्ट्रीय महिला वर्षापासून रुजू लागली. गेल्या पन्नास वर्षात या कल्पनेचे रोपटे वाढून वृक्ष झाला आहे. गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रात व भारतात स्त्रियांच्या संदर्भात जे विचार मांडले गेले ते स्त्रीला एक स्वतंत्र अस्तित्व आहे या विचाराला धरून नव्हतेच. स्त्री पुरुषांचा दर्जा समान असावा ही कल्पना त्या विचारांत अंतर्भूत नव्हती. स्त्रीने शिक्षण घ्यावे व सुबुध्द व्हावे त्यातून तिचे व्यक्तित्व विकसित होईल आणि अशा स्त्रीचा कुटुंबाला उपयोग होईल. गरज पडलीच तर तिला तिच्या शिक्षणाचा उपयोग स्वतःच्या पायावर उभे राहाण्याकरिता करता येईल, अशी मर्यादित भावना स्त्री शिक्षणाच्या मागणीच्या मागे होती. 19 व्या शतकात महात्मा फुले आणि सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. विसाव्या शतकात महर्षी कर्वे यांना स्त्रीने सुगृहिणी आणि सुमाता बनावे यासाठी स्त्रियांनी शिकले पाहिजे याची आवश्यकता भासत होती. त्याचप्रमाणे अनाथ विधवांना व परितक्त्यांना आपल्या पायावर उभे करण्याचे माध्यम म्हणजे शिक्षण, असेही कर्वे मानत. आगरकरांना स्त्रीचे आर्थिक स्वातंत्र्य अपेक्षित होते. महाराष्ट्रातील 1975 पर्यंतचे सर्व समाज-सुधारक पुरुष हे स्त्री सुधारणावादी होते. त्यांना स्त्री मुक्तीची आधुनिक संकल्पना अभिप्रेत नव्हती. डॉ. आंबेडकरांचे निरनिराळ्या ठिकाणी व्यक्त केलेले स्त्रीविषयक विचार जर संकलितरित्या अभ्यासले तर केवळ स्त्री जीवनविषयक सुधारणावादी विचारवंतांपेक्षा त्यांचे वेगळेपण जाणवते का? हे तपासून पाहिले पाहिजे.



डॉ. आंबेडकरांच्या स्त्रीविषयक कार्याचे आपल्याला दोन विभाग पाडता येतील. पहिला भाग दलित स्त्रियांच्या संदर्भात त्यांनी मांडलेले विचार व दुसरा हिंदू कोड बिलाच्या साहाय्याने स्त्री जातिविषयीचा त्यांचा दृष्टिकोन. हे दोन्ही दृष्टिकोन त्यांचे चरित्र, भाषणे, लेखन व इतरांनी त्यांच्या संदर्भात केलेली निवेदने यातून आढळून येतात. प्रस्तूत शोधनिबंधात त्यांचे दलित

स्त्रियांच्या संदर्भातील विचारच प्रामुख्याने लक्षात घेतले आहेत.

डॉ. आंबेडकरांची पार्श्वभूमी: डॉ. बाबासाहेब हे अस्पृश्य, अडाणी व मागासलेल्या समाजात जरी जन्मले असले तरी त्यांचे स्वतःचे घराणे सुसंस्कृत होते. त्यांच्या वडिलांनी आपल्या मुलींना व बहिणीला लिहायला वाचायला शिकवले होते. आंबेडकरांची आत्या पांडवप्रताप, रामायणासारख्या ग्रंथाचे निरुपण करे. कुटुंबामध्ये तिचा रुबाब व दरारा असे. रामजी आंबेडकरही तिला मान देत. बाबासाहेबांनी स्त्रीचे असे रूप स्वतःच्या घरातच पाहिल्यामुळे एकूण स्त्री समाजात ते तसेच असावे असा विचार त्यांच्या मनात रुजला तर नवल नव्हे. दुसरी गोष्ट अशी की, महार जातीतील लष्करात असणाऱ्या पुरुषांतील नव्वद टक्के पुरुष साक्षर असत. त्यांच्या घरातल्या स्त्रियांनाही ते लिहिण्या-वाचण्यापुरते शिकवत. त्या काळीही त्या समाजातील स्त्रिया चांगल्याच बुध्दिमान होत्या. पुरुषांच्या भर सभेत त्या पुराणाचा अन्वयार्थ सांगत."

मुलींना मुलांबरोबर शिक्षण द्यावे याबाबत आंबेडकरांचा आग्रह होता. ते म्हणत, की कुठल्याही देशातील सुशिक्षितांचे प्रमाण मी त्यातील स्त्रियांच्या सुशिक्षिततेच्या प्रमाणात मोजतो. 4 ऑगस्ट 1913 ला आपले मित्र जमेदार यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, "मुलांच्या बरोबर मुलींच्या शिक्षणाची काळजी वाहिली तरच प्रगती होऊ शकेल." तुमच्या मुलीला तुम्ही शिक्षण देत आहात त्याची योग्य निष्पत्ती तुम्हाला दिसून येईल. यासाठीच मुलामुलींना शिक्षण द्यावे हे ध्येय असावे. महाडच्या सत्याग्रहाच्या वेळी जमलेल्या स्त्रियांना उद्देशून ते म्हणतात की, स्त्रियांनी आपल्या मुलीनांही शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान व विद्या या गोष्टी काही पुरुषांसाठीच नाहीत. त्या स्त्रियांनाही आवश्यकच आहेत. 'खाण तशी माती' ही म्हण ध्यानात ठेवून आपली पुढील पिढी जर सुधारायची असेल तर तुम्ही मुलींना शिक्षण दिल्या शिवाय राहू नका. ज्या ज्या वेळी त्यांना स्त्रियांसमोर भाषण करण्याचा योग आला होता, त्या त्या वेळी त्यांनी मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व स्त्रियांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. हिंदूंमध्ये स्त्री म्हणजे पुरुषाच्या चैनीची एक वस्तू आहे असा सर्वसाधारण समज असल्यामुळे शिक्षण घेऊन मन सुसंस्कृत करण्याचा अधिकारही स्त्रियांना दिला नाही. अबलाउन्नती प्रित्यर्थं झटणाऱ्या बऱ्याच सुधारकांनी 'स्त्रियांनी गृहलक्ष्मी तेवढे व्हावे' असे ध्येय डोळ्यासमोर ठेवले आहे असा आरोप बाबासाहेब करतात. अशाप्रकारचे संकुचित ध्येय स्त्री वर्गापुढे ठेवणे हे अनुदारपणाचे द्योतक आहे, असे प्रतिपादन ते करतात. हरएक व्यक्तीमात्राला पूर्णावस्थेत जाण्यात समाजाने अवसर दिला पाहिजे, हे तत्व जर एकदा मान्य झाले तर मग स्त्रियांपुढे असले हलके ध्येय ठेवण्यात येते याचे बाबासाहेबांना नवल वाटते. स्त्रियांच्याबाबत पुरुषांच्या मनात अनुदार भावना जागृत न होऊ देण्याचे मोठे साधन म्हणजे निरनिराळ्या प्रसंगी स्त्री पुरुषांनी एकत्र येऊन काम करणे हा आहे. त्यासाठीच ते सहशिक्षणाचा आग्रह धरतात. औरंगाबादच्या त्यांच्या मिलिंद कॉलेजमध्ये मुलींनाही प्रवेश देऊन सामाजिक-दृष्ट्या मागासलेल्या व सहशिक्षणाचा गंधही नसलेल्या या भागात त्यांनी सहशिक्षण सुरू केले. इतकेच नव्हे तर मुलींनी मोठया संख्येने

या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा व स्त्री शिक्षणाला उत्तेजन मिळावे म्हणून शहरापासून या कॉलेजपर्यंत त्यांच्याकरिता बस सेवा उपलब्ध करुन दिली. मुलींना एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्यासाठी शिक्षण देणे जसे त्यांना आवश्यक वाटे त्याचप्रमाणे त्या शिक्षणाबरोबर शीलही सुधारले पाहिजे असे वाटे. त्यांनी नुसते पोटभरू असू नये. त्यांचा दुसऱ्यास उपयोगही झाला पाहिजे, असे प्रतिपादन रावळी कँप, मुंबई मंडळासमोर दिलेल्या भाषणात त्यांनी केले होते.

डॉ. आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाची किंमत जाणली होती. त्यांच्या प्रथम पत्नीला त्यांनी लिहिणे-वाचणे शिकण्यास उत्तेजन दिले. लंडनहून रमाबाईंना पाठवलेल्या पत्रात त्यांच्या अभ्यासाची ते आस्थेने चौकशी करतात. परंतु न्या. रानडे यांनी आपल्या पत्नीच्या शिक्षणासाठी व बौध्दिक विकासासाठी जसे खास प्रयत्न केले तसे आंबेडकरांकडून झाले नाहीत. त्याचे एक कारण असे असावे की या दोघांची सामाजिक पार्श्वभूमी व संस्कृती यातील भिन्नता, व दुसरे न्या. रानडे व बाबासाहेब यांच्या दैनंदिन कामाच्या स्वरूपातील भिन्नता ही असावीत. असे असले तरी दलित स्त्रीला शिक्षणाकडे अभिमुख करण्याचे सर्व श्रेय बाबासाहेबांनाच आहे, हे नि:संशय.

**दलित स्त्रियांची राहणी सुधारावी:** दलित स्त्रिया या त्यांच्या राहणीच्या पध्दतीमुळे सवर्ण स्त्रियांपेक्षा वेगळ्या दिसतात. त्यांचा पोशाख, त्यांचे दागिने सर्व ओंगळवाणे आहे असे त्यांना वाटत असे. दलित स्त्रिया त्यांच्या पोशाखामुळे वेडगळ दिसतात, त्या राहतातही गलिच्छ याचे त्यांना वैषम्य वाटे. पुढे बाबासाहेबांच्या सतत उपदेशामुळे ही स्थिती सुधारली. त्याबद्दल त्यांनी 28 ऑक्टोबर 1954 ला पुरंदरे स्टेडियमवरील भाषणात आनंद व्यक्त केला. ते स्वतः अत्यंत नीटनेटके व पोषाखाबद्दल चोखंदळ असत. त्यामुळे त्यांच्या नात्यातल्या बायका त्यांना 'बामण' म्हणत. आपल्याला असा झकास पोषाख घालून 'बामण' बनायचे नाही असेही म्हणत. स्त्रिया ज्या सभेत हजर असतील अशा सर्व सभांत ते स्त्रियांना नीटनेटके राहण्याचा उपदेश करतच. मुंबई येथे स्त्रियांच्या एका सभेत मार्गदर्शन करताना ते म्हणाले, की आपल्या पोषाखावरून आपण अमुक जातीचे आहोत हे ओळखता येता कामा नये. स्वतःचे चेहरे पदराने झाकून ठेवणे सोडून दिले पाहिजे. त्याशिवाय निर्भयतेने जीवन जगण्यास शिकता येणार नाही.

अशा प्रकारचा पहिला उपदेश त्यांनी चवदार तळ्याच्या सत्याग्रही स्त्रियांना केला होता. दागिन्यांपेक्षा कपड्याला अधिक शोभा असते. दागिना घालायचाच असला तर तो सोन्याचा घाला. कथलाचे व चांदीचे दागिने आणि लुगडी नेसण्याची पध्दत ही अस्पृश्यता ओळखण्याची चिन्हे स्त्रियांनी टाकली पाहिजेत. या उपदेशाचा परिणाम म्हणून अस्पृश्य स्त्रियांनी हे अवजड दागिने वापरणे सोडले आणि साडी नेसण्याची पध्दतही बदलली. आपल्या जीवनाला वेगळे वळण लावणारे म्हणून प्रत्येक स्त्रिला बाबासाहेब आपले उध्दारक वाटतात.

**विवाह पध्दतीचा स्त्री जीवनावर होणारा परिणाम:** अस्पृश्य समाजातील विवाह

पध्दतीवर बोलताना ते मुलींच्या जीवनाच्या दृष्टिकोनातून आपले विचार मांडताना आढळतात. मुलाचे व मुलीचे लवकर लग्न करून पालक नुकसानच करतात. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर पालक मुलीचे मातेरे करतात. लग्न ठरविताना मुलगी सुंदर आहे का याचा विचार मुलगा करतो तोच अधिकार स्त्रियांनाही दिला पाहिजे. बऱ्याच सुंदर स्त्रिया कुरुप पुरुषांच्या स्वाधीन झालेल्या दिसतात. याचा अर्थच मुलींना हा अधिकार नाकारला गेलेला आहे. बाबासाहेबांनी हा विचार 1938 साली विद्यार्थ्यांसमोर केलेल्या भाषणातून मांडला आहे. स्पृश्य समाजात या पध्दतीचे विचार गेल्या 15–20 वर्षातच मूळ धरू लागले आहेत ही गोष्ट लक्षात घेतली की बाबासाहेबांचे महत्त्व लक्षात येते. अज्ञानाच्या मर्यादा ओलांडून सज्ञान होणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थी वर्गाला अशाप्रकारचा उपदेश करून स्त्रियांना मन, अस्मिता व स्वतंत्र अस्तित्व आहे आणि ते विद्यार्थ्यांनी मान्य केले पाहिजे ही जाणीव त्यांनी करून दिली, हे त्यांचे फारच मोठे कार्य आहे.

1942 च्या नागपूरच्या महिला परिषदेत बोलतानाही आंबेडकरांनी या मुद्यावर भर दिला आहे. त्याकरता मुलामुलींचे विवाह लवकर करू नका. ती आपल्या पायावर उभी राहीपर्यंत तरी नकोच नको. त्यांना अधिक मुले होण्याचे दुष्परिणामही समजून सांगा. विवाह हा मुलींच्या विकासातील अडसर आहे तो त्यांच्यावर लादू नका. मुलगी लग्नानंतर नवऱ्याची सखी व समान अधिकार असलेली गृहिणी ठरली पाहिजे. बायको नवऱ्याची गुलाम होता कामा नये, असे त्यांचे सांगणे होते.

**कुटुंब नियोजनाचे महत्त्व:** विद्यार्थ्यांसमोरील वरील भाषणात त्यांनी कुटुंब नियोजनाचाही उपदेश केला असून त्याची जबाबदारी पुरुषांप्रमाणेच स्त्रियांवरही आहे आणि त्यांनी ती आता ओळखलीच पाहिजे, असे बजावले आहे. 1938 साली आजच्या सारखा कुटुंब नियोजनाचा प्रचार नव्हता. महाराष्ट्रात र.धों. कर्वे, शकुंतला परांजपे इत्यादी कार्यकर्ते झटत असूनही यश येत नव्हते. अशावेळी बाबासाहेब स्वतःची 14 भावंडे ही वडिलांचे दारिद्र्य वाढवण्यास कशी कारणीभूत झाली हे सांगतातच पण त्याही पुढे जाऊन आपल्या पाच मुलांपैकी चार दगावली हे एका परी बरेच झाले असे सांगतात. एकाचेच संगोपन आपण चांगले करू शकतो हे त्यांनी स्पष्ट केले. कमी मुले झाल्यामुळे स्त्रियांची जीवघेण्या बाळंतपणापासून थोडी सुटका होईल. त्यांची शक्ती त्यांना इतर कामाकडे लावता येईल असे त्यांना अभिप्रेत होतेच. स्वतंत्र मजूर पक्षाचे आमदार प्रभाकर रोहम यांनी आंबेडकरांच्या प्रेरणेने कुटुंबनियोजनाचा ठराव विधीमंडळात 10 नोव्हेंबर 1938 रोजी मांडला होता व त्यात स्त्रियांच्या आणि विशेषतः अल्पवयीन मुलींच्यावर लहान वयातच मुलाला जन्म देण्याची सक्ती केल्यामुळे किती अनर्थ घडतात हे समजण्यासाठी त्यांचे भाषण मुळातूनच वाचून पहावे. स्वतंत्र मजूर पक्षाचे बाबासाहेब अर्ध्वयू असल्यामुळेच रोहम यांना असा ठराव बाबासाहेबांच्या सांगण्यावरून मांडावा लागला.

1938 साली विधीमंडळात स्त्री कामगारांच्या हिताच्या दृष्टीने मांडलेल्या विधेयकाला त्यांनी जोरदार पाठिंबा दिला. स्त्री कामगारांना कमी पगार देऊन चालतो म्हणून त्यांची

नेमणूक होते. म्हणूनच त्यांच्या शारीरिक स्वास्थ्याच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतरच्या काळात स्त्रियांना विश्रांती मिळण्याचे दृष्टीने त्यांच्या या काळातील पगाराचा खर्च मालकांनी सोसलाच पाहिजे या मुद्यावर त्यांचा भर होता.

अस्पृश्योन्नतीच्या संदर्भात स्त्रियांची जबाबदारी मोठी आहे, असे बाबासाहेब मानत. घर प्रपंचाच्या अडचणी ज्याप्रमाणे स्त्री व पुरुष मिळून सोडवितात, त्याचप्रमाणे समाजातील अडचणी स्त्री पुरुषांनी मिळून सोडवावयास पाहिजेत. एकट्या पुरुषांकडून स्त्रियांच्या सहकार्याशिवाय अस्पृश्योन्नतीचे काम होऊ शकत नाही. अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न काय स्त्रियांचाच आहे? या विचारावरून स्त्रियांची शक्ती त्यांनी ओळखली होती हे निश्चितच स्पष्ट होते. महाडच्या सत्याग्रही स्त्रियांना उद्देशून त्यांनी जे भाषण केले त्याचे दलित स्त्रियांच्या एकाच नव्हे तर अनेक पिढयांवर परिणाम झालेले दिसतात. ते म्हणाले, “या सभेत बसलेल्या कायस्थ व इतर अस्पृश्य बायांच्या पोटी जन्मलेल्या मुलात व तुमच्या पोटी जन्मलेल्या मुलात काय अंतर आहे? तुम्ही विचार केला पाहिजे की ब्राम्हणाच्या स्त्रियांत जेवढे शील आहे तेवढेच तुमच्यातही आहे, तुमच्यात जेवढे मनोधैर्य, करारीपणा आणि धमक आहे तितकी ब्राम्हण स्त्रियांत नाही. असे असताना तुमच्या मुलाला साधे माणूसकीचे हक्क का असू नयेत? याचा विचार तुम्ही केलाच नाही. तुमच्या पोटी जन्म घेतल्याचे पातक त्यांनी केले त्याची त्यांना शिक्षा भोगावी लागते. या प्रश्नाचा जर तुम्ही विचार केला तर तुम्हाला एक तर प्रजा उत्पत्ती बंद करावी लागेल किंवा तुमच्यामुळे लागत असलेला कलंक तरी तुम्हांस धुऊन टाकावा लागेल. या दोहोंपैकी कोणती तरी एक गोष्ट तुम्हाला करावीच लागेल.”

अस्पृश्यता का पाळावी हे सांगत असताना अस्पृश्य मेलेल्या जनावराचे मांस खातात हा मुद्दा जोरदार मांडला जातो. तो लक्षात घेऊन बाबासाहेबांनी, ‘जो नवरा मेलेल्या जनावराचे मांस घरात आणील त्याच्या बायकोने त्याला असले प्रकार माझ्या घरात चालणार नाहीत असे ठणकवावे’ असा उपदेश केला. अस्पृश्यता ज्या ज्या गोष्टीतून व्यक्त होते त्या त्या सर्व गोष्टी स्त्रियांनी त्याजाव्या हे बाबासाहेबांनी स्त्रियांना दिलेल्या शिकवणुकीचे सार होते.

दलित देवदासींची एक सभा मुंबईला 16 जून 1946 रोजी भरली होती. या सभेत डॉक्टरांनी वेश्याव्यवसाय सोडण्याची विनंती केली आणि जर त्या तो व्यवसाय सोडणार असतील तरच आपण आपल्या दलित मुक्ती संग्रामात त्यांना बरोबर घेऊ नाहीतर नाही, असे सांगितले. याही पुढे जाऊन असेही बजावले, की जर त्या आपला आयुष्यक्रम पूर्ववत चालू ठेवून महार जातीस बट्टा लावण्याचे कार्य सोडणार नसतील तर हजारों स्वयंसेवकांच्या साहाय्याने त्यांचे कामाठीपुरातून उच्चाटन केले जाईल. हा व्यवसाय सोडावा असे जेव्हा आधुनिक स्त्री मुक्तीवादी म्हणतात त्यावेळी त्या त्यांच्या पुनर्वसनाचीही योजना आखतात. आंबेडकरांना वेश्यांनी या नरकातून बाहेर यावे असे कळकळीने वाटत असले तरी काबाड कष्ट करून उपजिविका करा असा त्यांनी केलेला उपदेश करावा वाटत


नाही. अस्पृश्यांना कामे मिळण्याचा तो काळच नव्हता. त्यातून या स्त्रिया वेश्या. जर आंबेडकरांना स्वतःलाच त्यांचा धंदा महार जातीला लाज आणणारा वाटत होता तर बाया गावाला गेल्यावर त्यांना काम-धंदा कोण देणार होते? अस्पृश्यतेबरोबरच त्यांचा वेश्या व्यवसायही त्यांना काम मिळविण्यात अडसर होणार होताच. आंबेडकरांच्या डोळ्यासमोर जर फक्त स्त्री मुक्तीचे कार्य असते तर यापेक्षा वेगळे चित्र दिसले असते असे वाटते. आंबेडकरांचे कार्यक्रम “दलित या संपूर्ण समाजासाठी” होते. सर्व दलितांचा उध्दार होणे म्हणजे स्त्रियांचाही उध्दार त्यात आलाच असे त्यांना अभिप्रेत असले तरी दलित समाजापुढे मात्र ते स्त्रियांच्या संदर्भात त्यांना समान वागणूक देण्याबद्दल हडसून खडसून बजावत असत.

दलितांच्या मुक्ती लढ्याचे ध्येय या विषयावर बाबासाहेबांनी दलित पुरुषांना बजावले आहे, की ‘जोवर आपल्या वर्गातील स्त्रियाही आपल्या या संघर्षात भाग घेत नाहीत तोपर्यंत आपला संघर्ष शिखरावर पोहचू शकत नाही. आपल्यातील महिला या आंदोलनात मागे राहणार नाहीत ना याची तुम्ही काळजी घेतली पाहिजे.’ आपल्या चळवळीत स्त्रिया पाहिजेत याबद्दल त्यांचा आग्रह होताच. म. गांधींच्या हाकेला ओ देऊन स्त्रिया सत्याग्रहात उतरल्या त्या 1930 साली पण त्याही पूर्वी 1927 मध्ये महाडच्या सत्याग्रहात मोठ्या संख्येने स्त्रिया सामील झाल्या होत्या. दुर्दैवाने या मोठ्या संख्येने सत्याग्रहात सामील होणाऱ्या स्त्रियांची नोंद कुठेच घेतली गेली नाही. स्त्रिया आणि सत्याग्रह म्हटला, की सविनय कायदेभंगातील स्त्रियांच्या सहभागाबद्दल बोलले जाते. दलित स्त्रियांची सामाजिक स्थिती लक्षात घेता त्यांनी 1930 पूर्वी सत्याग्रहात सामील झाल्याची नोंद होणे आवश्यक होते. पण ते झाले नाही. या स्त्रिया आंबेडकरांचे आवाहन स्वीकारूनच सत्याग्रही झाल्या हे लक्षात घेतले पाहिजे. यानंतर पर्वतीवरील सत्याग्रह, नाशिकचा मंदिर प्रवेश सत्याग्रह वगैरे प्रत्येक सत्याग्रहात स्त्रियांची संख्या मोठी होती. आज दलित चळवळीत स्त्रियांची मोठी संख्या दिसते, त्याची सुरुवात 60 वर्षांपूर्वी आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झाली. दलित चळवळीतील स्त्रियांचे प्रेरणास्थान बाबासाहेबच आहेत. अस्पृश्यांना समाज सुधारणेच्या स्तरावर प्रवेश करण्याचे श्रेय खुद्द बाबासाहेबांच्या मते दलित स्त्रियांना जाते.

बाबासाहेबांनी दलित स्त्रिची अस्मिता जागृत केली व त्यांना दलित चळवळीसाठी तयार केले. हिंदू स्त्री आणि दलित स्त्री यांचा त्यांच्या त्यांच्या समाजातील दर्जामध्ये फरक आहे. हिंदू स्त्री ही पुरुषाची मालमत्ता समजली जाते. लग्नातील कन्यादान विधी हे त्याचे मोठे उदाहरण. हुंडा पध्दतीमुळे हजारों हिंदू स्त्रियांचे आजही बळी जात आहेत. या उलट दलित स्त्री ही अशा सामाजिक दास्यत्वाच्या बंधनापासून पूर्ण मुक्त आहे. या वर्गातील स्त्रीला बरेच व्यापक सामाजिक स्वातंत्र्य होते. दलित समाजात घटस्फोट पूर्वीपासूनच मान्य आहे. तिला घटस्फोटानंतर पाट लावण्यासही मोकळीक आहे. कन्यादान या समाजाला मान्य नसल्यामुळे तिला कोणत्याही वेळी आपल्यावर अन्याय होतो असे वाटले तर ती आईबापाकडे परत येऊ शकते. त्यांचा आधार तिला मिळतो. त्यामुळे निराधार

राहण्याचा प्रसंग तिच्यावर येत नाही. घटस्फोट, पुनर्विवाह अशा प्रसंगांनी तिच्या सामाजिक प्रतिष्ठेला उणेपणा येत नाही. या दृष्टीने पहाता दलित स्त्री ही पूर्वीपासूनच सामाजिक दृष्ट्या अधिक स्वतंत्र होती व आहे. पर्यायाने हेही मान्य करावे लागेल, की तिला पुरुषांच्या बरोबरीचे स्वातंत्र्य हवे होते. आर्थिक क्षेत्रातही ती पुरुषांच्या बरोबरीने मेहनत-मजुरी करण्यास कधीही मागे राहिली नाही? दलित स्त्रीचा दलित समाजातील दर्जा हा पुरुषांच्या बरोबरीचा होता. म्हणून त्यांना स्वतःच्या सामाजिक दास्यत्वाच्या मुक्तीची स्वतंत्र चळवळ उभारण्याची गरज वाटली नाही. दलित स्त्री व पुरुष यांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय प्रश्न एकच असल्यामुळे दलित समाजाच्या सर्वव्यापक उत्थानाच्या चळवळीत दलित स्त्री समरस व सहभागी होऊ शकली.

दलित काँग्रेसबरोबर दलित महिला परिषद भरवली जाऊ लागली. त्याची सर्व अधिकारपदे स्त्रियाच सांभाळीत. या सर्व परिषदांतून दलित वर्गाच्या मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न प्रामुख्याने पुढे येत असल्यामुळेच दलित मुलींच्या शिक्षणाला मोठीच चालना मिळाली. अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लास फेडरेशनच्या महिला संघटक कु. वीरेंद्रबाई तीर्थंकर होत्या. विदर्भातील दलितांच्या चळवळीत व एकूण दलित समाजाच्या सुधारणा आंदोलनात स्त्रियांचा वाटा सिंहाचा आहे. या सर्व स्त्रियांनी बाबासाहेबांना आपले प्रेरणास्थान मानले आहे. दलित स्त्रियांसंबंधी बाबासाहेबांनी जे कार्य केले त्याचे स्वरूप त्यांना 1942 साली भरलेल्या अखिल भारतीय दलित महिला परिषदेमध्ये दिसून आले.



*अखिल भारतीय महिला अस्पृश्य महिला परिषद, नागपूर (1942)*

आपण आपल्या स्त्री समाजाकडून ज्या ज्या अपेक्षा निरनिराळ्या वेळी व्यक्त केल्या होत्या त्या बऱ्याच प्रमाणात फलद्रूप झाल्याचे त्यांना जाणवते. स्त्री-वर्गात जागृती झाली तर त्या अस्पृश्य समाजाची फार मोठी प्रगती घडवून आणू शकतात, याची त्यांना जाणीव झाली. सामाजिक दुर्गुण नाहीसे करण्यात स्त्रियांची फार मोठी सेवा आहे हे त्यांनी मान्य केले व स्त्रियांनाही पुरुषांच्याबरोबर पुढे नेले पाहिजे अशा निर्धारानेच आपण दलित चळवळ सुरू केली होती, असे बाबासाहेब म्हणत. बाबासाहेब स्त्री समाजाने किती प्रमाणात प्रगती केली त्यावरूनच दलित समाजाचे मोजमाप करत. 1927 पासून आजपर्यंत दलित स्त्रियांमध्ये बरीच मोठी सामाजिक व वैचारिक क्रांती घडून आली. त्यांनी सामाजिक व राजकीय लढ्यात पुरुषांपेक्षाही अनेक वेळा अधिक सहभाग घेतला आहे. विचार जागृतीबरोबरच त्यांच्यातील स्वाभिमान व आत्मविश्वास बळावला याचे श्रेय आपल्याला बाबासाहेबांना द्यायला पाहिजे. महाडच्या सत्याग्रहापासूनच स्त्रियांच्या मनावर

बाबासाहेबांच्या विचाराची पकड बसली. बाबासाहेबांनी ज्यावेळी धर्मांतर केले त्यावेळी हजारोंच्या संख्येने स्त्रियांनी धर्मांतर केले. दर महानिर्वाण दिनाला लाखोच्या संख्येने महिला मुंबईला येतात बाबासाहेबांचे ऋण त्या मानतात. आपल्या स्त्रियांची नैतिक उन्नतीही झाली पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच त्यांनी पठ्ठे बापूराव सारख्या कलावंताने दलित वर्गातील पवळाबाईला बोर्डावर नाचवून मिळालेल्या पैशाने आर्थिक मदतीचा पुढे केलेला हात, 'मला नको', म्हणून सांगून नाकारला. अशा रीतीने दलित स्त्रीच्या सर्वांगीण उन्नतीचे माझे ध्येय आहे असा ढोल न बजावता बाबासाहेबांनी हे कार्य केले हे विशेष.

दलित स्त्री समाजाची प्रगतीच्या दृष्टीने आज घोडदौड चालू आहे. सामाजिक अगर राजकीय जीवनाचे असे एकही क्षेत्र नाही, की ज्या क्षेत्रात दलित स्त्रीचा प्रवेश नाही. पूर्वीची मरगळ, अज्ञान त्यांनी जोरात झटकले आहे. दलित स्त्री कोणत्याही क्षेत्रात असली तरी ती जागृत व स्वाभिमानी दिसते. त्यांच्यातील परिवर्तनाचा वेग मोठा असला तरी खूप मोठा रस्ता अजून त्यांना पार करायचा आहे. आज सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक कार्यकर्त्या स्पष्टपणे कबूल करतात की आंबेडकर चळवळीतील स्त्री शक्ती फार मोठ्या प्रमाणावर संघटित आहे. ही किमया फक्त बाबासाहेबांनीच केली आहे.

स्त्री मुक्ती चळवळीमध्ये आजही सामान्य सवर्ण स्त्री पाय घट्ट रोवून उभी राहिल्याचे दृश्य दिसत नाही. या उलट आंबेडकर चळवळीतील हजारो स्त्रिया प्रचंड संख्येने मोर्चात सामील होतात. गावातील असुरक्षितता, घरावर रात्री पडणारे दगड, चारित्र्यहननाची भिती या सर्व परिस्थितीला तोंड देत दलित स्त्री ताठ कण्याने उभी आहे. हा ताठपणा ती आबेडकरांकडे शिकली.

दलित स्त्रियांच्या उत्थानाच्या प्रश्नाबरोबर एकूण स्त्री जातीच्या प्रश्नांसंबंधी व त्यांच्या सामाजिक दर्जाविषयी त्यांना आस्था वाटत होती. हिंदू स्त्रीच्या सामाजिक अवनतीस मनुस्मृती जबाबदार आहे असे ते मानीत व म्हणूनच ती जाळून टाकली पाहिजे असे प्रतिपादन करत. मनुस्मृतीने केलेले अन्याय दूर करण्याचे साधन म्हणजे हिंदू कोड बिल. परंपरागत व सनातनी धर्म संकल्पनांच्या प्रती पूज्य बुध्दी ठेवून स्त्री दास्याचा प्रश्न सुटणार नाही असे आंबेडकरांना वाटे. ते स्वतः स्त्री-पुरुष समानतेच्या सिध्दांताचे व व्यवहाराचे कट्टर समर्थक होते आणि म्हणूनच त्यांनी हिंदू समाजातील स्त्री-पुरुष असमानता, विषमता समाप्त करण्याकरिता हिंदू कोड बिल तयार करणे निकडीचे मानले होते. हिंदू कोड बिल ही स्त्रीमुक्तीची गाथाच आहे. या प्रश्नावर त्यांनी मंत्रीपदाचा राजिनामा दिला यावरून या प्रश्नाचे महत्त्व किती होते ते लक्षात येईल. बहुपत्नीवाद, दत्तक विधान, घटस्फोट याबाबतचे अधिकार व सर्वात महत्त्वाचा म्हणजे मालमत्तेतील स्त्रियांचा अधिकार यांनी स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक दर्जात महत्त्वाचे फरक घडून आले. म्हणूनच आंबेडकरांचे स्त्रियांविषयीचे कार्याचे स्वरुप हे स्त्रीमुक्तीच्या कार्याचे स्वरूप आहे असे मानले जाते.

■ ■

# आमच्याबद्दल: अभिव्यक्ती

आज देशात महिलांच्या स्थितीमध्ये खूप मोठा बदल झाला आहे. पूर्वीच्या काळी ‘चूल आणि मूल’ या चौकटीत कैद असलेल्या महिलांना संविधानाने सन्मान दिला. संविधानामुळेच महिलांना शिक्षण घेणं, घराबाहेर पडणं, नोकरी करणं शक्य झालं. म्हणूनच आज विविध क्षेत्रात त्या जबाबदारीच्या जागा सांभाळत आहेत. पण नुसतं बोलल्याने किंवा लिहिल्याने समाज बदलत नाही आणि समाज बदलल्याशिवाय, त्याची मानसिकता बदलल्याशिवाय स्त्री-पुरुष समानता येऊ शकत नाही. एका बाजूला देशातील विशेषतः शहरांतील महिलांची स्थिती स्वातंत्र्याच्या काळापेक्षा खूपच सुधारली आहे हे जरी खरे असले, तरी अजूनही कधी आर्थिक, कधी सामाजिक, कधी सांस्कृतिक, तर कधी अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी आणि बहुतांशी वेळेला घरगुती हिंसा, आणि इतर अत्याचाराच्या विरोधात महिला संघर्ष करतच आहेत.

आज आपण जी प्रगती केली आहे, हक्क आणि अधिकार मिळालेले आहेत ते आपल्या पूर्वीच्या बहिणींनी लढलेल्या संघर्षामुळेच शक्य झाले आहे. आपण या संघर्षाला पुढे नेण्याची, त्याला नव्या उंचीवर नेण्याची गरज आहे. केवळ कायदे करून सुरक्षा मिळणार नाही, मग ते कितीही कठोर असले तरी. जोपर्यंत समाजात पितृसत्ता अस्तित्वात आहे, तोपर्यंत महिलांवरील अन्याय आणि हिंसा कायम राहतील. एकटी स्त्री याचा मुकाबला करू शकत नाही. सर्वांनी मिळून उघडपणे विरोध करणे हाच यावरचा उपाय आहे. याला थांबवण्यासाठी एक मजबूत स्त्री-चळवळ उभी करायला लागेल, ज्यात स्त्रियांबरोबरच संवेदनशील पुरुषही सामील असतील.

‘अभिव्यक्ती’ हे असेच एक महिला संघटन (लोकायतची महिला आघाडी) आहे. आम्हीही तुमच्यासारख्याच सामान्य मुली आणि महिला आहोत. महिलांच्या मुक्तीविषयी जनजागृती करण्यासाठी आम्ही विविध कार्यक्रम आयोजित करतो—स्त्यावरील प्रचार मोहिमा, व्याख्याने, चित्रपट प्रदर्शन, गीते आणि रस्त्यावर पथनाट्ये—सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच निदर्शने, धरणे आणि मोर्चेही करत असतो.

सातत्याने स्त्री मुक्तीचा, स्त्री-पुरुष समानतेचा विचार निरनिराळ्या माध्यमातून समाजाच्या सर्व विभागांपर्यंत नेण्याचा प्रयत्न करतो. समाजातील सर्व थरातील व वयोगटातील सुशिक्षित किंवा अशिक्षित स्त्रियांपर्यंत पोचण्याचे कलापथक हे एक प्रभावी माध्यम आहे. महाराष्ट्राच्या थोर परंपरेचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न आम्ही

करत असतो. छोटी छोटी पथनाट्ये, मुलगी झाली हो सारखं नाटक, आणि विशेषत्वाने गाणी ज्यात स्त्रियांच्या समस्या, त्या विरुद्ध पुकारलेला संघर्ष, त्यासाठी उगारलेले एकजुटीचे हत्यार आणि भविष्यासाठीची स्वप्ने आहेत अशांचा आम्ही वापर करतो. तसेच पोस्टर्सच्या माध्यमाचाही वापर करतो. स्त्रियांच्या प्रश्नावर फिल्म फेस्टिवल घेत असतो. याशिवाय आम्ही स्त्री मुक्ती यात्राही काढल्या.

हे सर्व करत असताना कौटुंबिक समस्येवर मदत मिळण्याच्या अपेक्षेने काहीजणी आम्हाला भेटायला येत. ही गरज लक्षात घेऊन आम्ही कौटुंबिक सल्लागार केंद्र चालू केले. काही विषयांवर आम्ही पुस्तिका प्रकाशित केल्या आहेत.

आमचे कार्यक्रम केवळ महिलांसाठीच नाहीत, तर पुरुषांसाठीही आहेत. आम्हाला विश्वास आहे की पुरुषांनाही महिलांच्या मुक्तीबाबत जागरूक करणे आवश्यक आहे, कारण महिलांची मुक्ती केवळ महिलांनीच मिळवता येणार नाही; त्यासाठी संवेदनशील पुरुषांचाही सक्रिय पाठिंबा आणि सहभाग गरजेचा आहे.

तसेच, महिलांची मुक्ती अशा समाजात शक्य नाही, जिथे कामगार आणि श्रमिक वर्गाचे शोषण केले जाते. म्हणूनच, ‘अभिव्यक्ती’ समाजातील सर्व शोषित वर्गांशी—कामगार, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याक—सहकार्याचे नाते जोडण्याचा प्रयत्न करते.

देशभरात अनेक महिला आणि पुरुष असा पुढाकार घेत आहेत. चला, आपणही आपले छोटेसे प्रयत्न सुरू करूया. एकमेकांपर्यंत पोहोचूया, समजून घेऊया, हातात हात घालून पुढे निघूया. जसजसे आपण पुढे जाऊ, तसतसे अधिकाधिक लोक आपल्या प्रवासात सहभागी होतील.

जर तुम्हाला वरील विचारांशी सहमती वाटत असेल आणि आमच्याबद्दल अधिक जाणून घेण्याची किंवा आमच्या उपक्रमांमध्ये सामील होण्याची इच्छा असेल, तर खालील पत्त्यांवर आमच्याशी संपर्क साधा.

अभिव्यक्ती, c/o लोकायत, कॅनेरा बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉप, पुणे–4

*(या पत्त्यावर दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सकाळी 10 -12 या वेळेत अभिव्यक्तीची मीटिंग होते (फक्त महिलांसांठी), आणि दर रविवारी संध्या. 5 - 7 या वेळेत लोकायतची मीटिंग होते.)*

अलका जोशी: 90670 03838 मोनाली चं.अ.: 93701 95213

abhivyakti.pune lokayat.india@gmail.com

lokayat.india lokayatpune @lokayat

KafilaOfficial www.lokayat.org.in

# असे नेते, अशा अनुयायी
## स्वातंत्र्यलढ्यातील सहभागी महिला


स्वातंत्र्यसेनानी डॉ. रोहिणी गवाणकर

### ■ महात्मा गांधींची महिला नीती

म. गांधींनी स्त्रीमुक्तीला नवी दिशा दिली. स्त्रियांना त्यांच्या नैतिक शक्तीची, कर्तबगारीची, अंगभूत गुणांची ओळख करून दिली. त्याच गुणांचा उपयोग करून घेऊन त्यांना देशाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीकडे आकर्षित केले.

गांधीजींनी स्त्रियांच्या भूमिकेला नव्या स्वरूपात मांडले. स्त्रीला दुबळी मानणे हा पुरुषांनी स्त्रीवर केलेला अन्याय आहे. शक्तीचा अर्थ जर नैतिक शक्ती हा असेल तर स्त्रिया पुरुषांपेक्षा कितीतरी पटीने सशक्त आहेत. स्त्रियांची सहनशक्ती, स्वार्थत्याग, अतुलनीय धैर्य हे गुण त्यांच्या सशक्ततेची उदाहरणे आहेत. गांधीजी म्हणत, 'स्त्रीचे खरे सौंदर्य अलंकारात नसून उत्तम चारित्र्य आणि डोळ्यांतील जरब यात आहे.'

परिणामी मिठाच्या सत्याग्रहापासून ते 'चले जाव' चळवळीपर्यंत लाखो स्त्रियांनी भाग घेतला.

### ■ नेताजी सुभाषचंद्र बोस यांची महिला नीती

स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने बौद्धिक, मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या सबल केले पाहिजे, हा विचार सुभाषबाबूंनी प्रत्यक्षात आणला. स्त्रिया, दलित आणि श्रमिक हे तीन सामाजिक गट पीडित आहेत व ते मुक्त झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही, हे त्यांचे विधान त्या काळातल्यासारखे आजही खरे आहे. पंधराशे स्त्रियांची पलटण, कर्नल पदापर्यंत पोहोचलेली डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन हे मात्र जगातील एकमेव उदाहरण आहे. त्याचे जनक भारतीय नेते नेताजी सुभाषचंद्र बोस होते ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

### ■ डॉ. लोहियांची महिला नीती

जात, वर्ग, घरातील न संपणारी कामे, नवे तत्त्वज्ञान, आरोग्य या बाबतीत ग्रामीण व नागरी असा भेद न करता ती एक 'स्त्री' आहे असा विचार करावा. डॉ. लोहिया यांनी स्त्रियांच्या सबलीकरणाकरता संपूर्ण समाजाने एकवट विचार केला पाहिजे, असे म्हटले आहे.

### ■ डॉ. आंबेडकरांची महिला नीती

दलितांच्या मुक्तीलढ्याचे ध्येय या विषयावर बाबासाहेबांनी दलित पुरुषांना बजावले आहे की जोवर आपल्या वर्गातील स्त्रियाही आपल्या या संघर्षात भाग घेत नाहीत तोपर्यंत आपला संघर्ष शिखरावर पोहचू शकत नाही. आज दलित चळवळीत स्त्रियांची मोठी संख्या दिसते त्याची सुरुवात 60 वर्षांपूर्वी आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झाली.